महाराष्ट्र शासन

Govt. of Maharashtra

GOM-mahaeoffice1
GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
GAD-(DESK-6)

SUBJECT

Main Category	: General
Sub Category	:
Description	: महाराष्ट्र माहिती अधिकार नियम 2005 मध्ये सुधारणा करणे बाबत...

OTHER DETAILS

Language	: मराठी
Remarks	: .
Previous References	:
Later References	:

Note # 1

सा.प्र.वि/माहिती(का-6)

महसूल व वन विभागाची टिपणी व त्यासोबतचा विभागीय आयुक्त पुणे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा **"नागरिकांचे जीवनमान सुकर करणेबाबत उपाययोजना"** या विषयाच्या अनुषंगानेमाहिती अधिकार अधिनियम 2005 मध्ये सुधारणा करण्याबाबतचा अहवाल कृपया पहावा.

2. नागरिकांचे जीवनमान सुकर करण्याबाबत उपाययोजना सुचविण्याच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने दिनांक 22 मे 2025 रोजी आपल्या अहवालाद्वारे विविध विषयांवरील उपाययोजना महसूल व वन विभागास सादर केल्या आहेत.सदर अहवालामध्ये पृष्ठ क्रमांक 178 ते 180 वर माहिती अधिकार अधिनियम, 2005 मध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने प्रस्तावित सुधारणा, त्यासाठीची मंत्रिमंडळ टिपणी आणि निर्गमित करावयाच्या अधिसूचनेचे प्रारूप शासनास सादर करण्यात आलेले आहे. माहिती अधिकार अधिनियम हा सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित विषय असल्याने महसूल व वन विभागाने सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविला आहे.

3. उपरोक्त अहवालामध्ये माहिती अधिकार अधिनियमातखालील प्रमाणे सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत

(1) अधिनियमामध्ये "वैयक्तिक माहिती" या शब्दाची व्याख्या समाविष्ट करावी.

(2) अर्जदाराची ओळख पटविण्यासाठी अर्जाबरोबर ओळखीचा पुरावा अनिवार्य करावा.

(3) अर्जामध्ये माहिती मागण्याचे प्रयोजन नमूद करणे बंधनकारक करावे.

(4) पूर्वी दिलेली माहिती पुन्हा मागितल्यास, पूर्वीच्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देऊन अर्ज निकाली काढण्याची तरतूद करावी.

(5) वारंवार व मोठ्या संख्येने अर्ज करणाऱ्या नागरिकांना"काळ्या यादीत" समाविष्ट करण्याचे अधिकार राज्य माहिती आयुक्तांना द्यावेत.

(6) अर्जामध्ये मोबाईल क्रमांक नमूद करणे अनिवार्य करून, सदर क्रमांकावर व्हॉट्सअॅपद्वारे दिलेली माहिती ग्राह्य मानावी.

4. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की उपरोक्त परिच्छेद 3 मधील अनुक्रमांक 1, 3 व 5 येथील तरतुदीसाठी माहिती अधिकार अधिनियम 2005 यामध्ये सुधारणा करावी लागेल. अनुक्रमांक 2, 4 व 6 येथील तरतुदी महाराष्ट्र माहिती अधिकार नियम 2005 मध्ये सुधारणा करून लागू करता येतील. माहिती अधिकार अधिनियम, 2005 हा केंद्र सरकारद्वारे तयार करण्यात आलेला आणि भारताच्या संसदेने संमत केलेला कायदा आहे. त्यामुळे अधिनियमामध्ये थेट दुरुस्ती करणे ही बाब राज्य शासनाच्या

आधिकारकक्षेत येत नाही. तथापि,आधीनियमाच्या कलम 27 अन्वये राज्य शासनास या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक नियम तयार करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे ज्या बाबी मूळ अधिनियमाशी विसंगत नाहीत, त्या राज्य शासनाच्या स्तरावर नियमांमध्ये दुरुस्ती करून लागू करता येतील. तसेच ज्या बाबींसाठी मूळ अधिनियमात सुधारणा आवश्यक आहे, त्याबाबत केंद्र शासनास शिफारस सादर करता येईल.

5. सामान्य प्रशासन विभागातील"माहिती" कार्यासनामार्फत माहिती अधिकार अधिनियम, राज्य माहिती आयोग तसेच ऑनलाईन RTI पोर्टल या संदर्भातील कामकाज हाताळले जाते. या कामकाजादरम्यान असे निदर्शनास आले आहे की माहिती अधिकार अधिनियमाचा काही नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग केला जात आहे. माहिती अधिकार अर्ज प्रथम व द्वितीय अपील यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून गरजवंतांना माहिती मिळण्यास विलंब होत आहे.सदर वस्तुस्थिती विचारात घेता, माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त यांनी सुचविलेल्या सुधारणा व्यतिरिक्तही आणखी काही सुधारणा करणे आवश्यक आहे.

6. माहिती अधिकार अधिनियमाच्या दुरुपयोगाची खालील उदाहरणे निदर्शनास आलेली आहे

(1) एकाच व्यक्तीकडून वारंवार अर्ज करणे :- काही विशिष्ट नागरिक विविध विभागाकडे वारंवार माहिती अधिकार अर्ज सादर करत आहेत. उदा. राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठाने दिनांक 26 जून 2024 रोजी श्री. केशवराज निंबाळकर या एकाच व्यक्तीचे 2788 द्वितीय अपील एकाच आदेशाने निकाली काढलेले आहेत. आयोगाच्या एकाच खंडपीठात जर इतके अपील दाखल होत असतील तर सदर नागरिकाने संपूर्ण राज्यभरात दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जांची संख्या हजारोच्या संख्येमध्ये असण्याची शक्यता आहे. सदर बाब केवळ उदाहरणादाखल नमूद केली असून असे अनेक नागरिक मोठ्या प्रमाणावर अर्ज सादर करत आहेत.

(2) अवास्तव आणि व्यापक माहितीची मागणी करणे :-"सर्व फायली", "संपूर्ण नोंदी", "सर्व निर्णय" अशा शब्दप्रयोगांचा वापर करून मोठ्या प्रमाणावर तसेच खूप जुन्या अभिलेखाची मागणी केली जाते. अशी माहिती तयार करणे अत्यंत वेळखाऊ आणि कधी कधी अशक्यप्राय असते.

(3) वैयक्तिक स्वार्थासाठी माहिती मागविणे :- काही अर्जदार प्रशासकीय कामकाजातील त्रुटी शोधून अधिकाऱ्यांना दबावाखाली आणण्याचा प्रयत्न करतात. काहीजण वैयक्तिक लाभ अथवा व्यावसायिक स्पर्धात्मक फायद्यासाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज सादर करतात. "कर नाही त्याला डर कशाला" हे तत्व मान्य केले तरी अशा अर्जांवर कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाचा खूप मोठा वेळ खर्च पडतो.

(4) प्रतिशोधात्मक हेतूने अर्ज करणे :- काही व्यक्ती माहिती अधिकार अर्जाचा

वापर एखाद्या अधिकाऱ्याला त्रास देण्यासाठी करतात.

(5) दारिद्र्य रेषेखालील कार्डाचा दुरूपयोग :- बरेचसे नागरिक वीस ते पंचवीस वर्षांपूर्वीचे दारिद्र्यरेषेच्या यादीतील नावाचा दाखला सादर करून मोठ्या प्रमाणावर माहिती मागतात. किंवा काही नागरिक मुद्दामहुन दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींच्या नावाने माहिती मागतात. दारिद्र्य रेषांच्या याद्या अनेक वर्षापासून अद्यावत झालेल्या नाही. तसेच सदर प्रमाणपत्राची खातरजमा करण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांच्याकडे नसते.

7. उपरोक्त कारणांमुळे कोणतेही जनहित साध्य न होण्याऱ्या माहिती अधिकार अर्जांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून त्याचे खालील दुष्परिणाम आढळून येत आहे.

(1) प्रशासकीय ताण :- प्रशासनातील अधिकाऱ्यांना मोठ्या प्रमाणात वेळ व मनुष्यबळ माहिती अधिकार अर्जावर खर्च करावे लागते. अनेक अधिकाऱ्यांचा 50 ते 75 टक्के वेळ माहिती अधिकार अर्जांवरील कार्यवाहीत जातो. त्यामधून कोणतेही सार्वजनिक हीत साध्य होणार नसले तरी अधिकाऱ्यांना शास्तीच्या भीतीपोटी माहिती अधिकार अर्जांना वेळ द्यावा लागतो. परिणामतः ज्या कामासाठी करदात्यांच्या पैशातून अधिकाऱ्यांना वेतन देण्यात येते त्या कामाला न्याय मिळत नाही. हा करदात्यांच्या पैशाचा एक प्रकारचा अपव्यय आहे

(2) अपीलांच्या संख्येत वाढ :- मोठ्या प्रमाणावर अर्जांमुळे प्रथम व द्वितीय अपीलात प्रचंड वाढ झाली असून, सध्या राज्य माहिती आयोगाकडे जवळपास 1 लाख अपील प्रलंबित आहेत. अपील निकाली लागण्यासाठी सरासरी 2 ते 3 वर्षांचा कालावधी लागत आहे.

(3) जनतेतील अविश्वास: मोठ्या प्रमाणात अर्ज व अपील यामुळे खऱ्या गरजवंतांना माहिती मिळण्यास अडचणी निर्माण होतात. अपील वेळेत सुनावण्यासाठी येत नसल्यामुळे अपीलाची तरतूद प्रभावी ठरत नाही. अपीलाच्या विलंबामुळे नागरिकांचा कायद्यावरील विश्वास कमी होत आहे.त्यामुळे नागरिक संपूर्ण व्यवस्थेवरच शंका उपस्थित करतात.

8. माहिती अधिकार अधिनियमाचा दुरुपयोग होत असल्याची बाब माननीय सर्वोच्च न्यायालय, विविध उच्च न्यायालय व केंद्रीय माहिती आयोग यांच्या सुद्धा निदर्शनास आलेली असल्याचे आढळून येते. याबाबत विविध न्यायालय तसेच केंद्रीय माहिती आयोगाने खालील प्रमाणे निरीक्षणे नोंदविली आहेत.

(१) माननीय सर्वोच्च न्यायालय – CBSE & Anr. v/s Aditya Bandopadhyay (Civil Appeal No. ६४५४/२०११)

"The act should not be allowed to misuse or abuse or to become a tool to abstract the national development and integration or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens, nor should eat be converted into a tool of oppression or intimidation of honest official striving to

their duty. Nation does not want scenarios where ७५ % of the staff of public authorities spend ७५% of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging there regular duties. The threat of penalties under the RTI act and pressure of the authorities under the act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties"

(२) माननीय उच्च न्यायालय, आंध्र प्रदेश – Writ Petition No. २०१८२/२००९:-

"The act is an effective device which if utilise judiciously and properly, would help the citizens to become more inform, It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to high he wants the information. However in discriminate efforts to secure information just for the sake of it. and without their being any useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources for this task would obviously, be at the cost of ordinary functioning. Beyond a point it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in the direction to impart sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic.."

(3) केंद्रीय माहिती आयोग – Shailesh Gandhi (१७.०१.२०१२):"The commission at several appellate hearing has explained to the complainant that under RTI act only the information as per records can be made available, multiple RTI applications and apples would not provide him any information beyond the records that exist. The complainant by repeatedly filling similar RTI application and Apple with the respondent public authority and the commission is wasting public resources."

(4) केंद्रीय माहिती आयोग – S.K. Lal v/s Ministry of Railways (29 डिसेंबर,2006)

"केंद्रीय माहिती आयोगाने एस के लाल विरुद्ध रेल्वे मंत्रालय या अपील प्रकरणात दिनांक 29 डिसेंबर 2006 रोजी दिलेल्या निर्णयात असे निरीक्षण

File No. GAD-12020/4/2025-GAD(DESK-6)-GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT (Computer No. 1421575)

नोंदवले आहे की माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा जरी नागरिकांना कलम 8 अन्वये वगळण्यात आलेल्या दहा बाबींशिवाय इतर अशी कोणती माहिती प्राप्त करून घेण्याचा अधिकार प्रदान करीत असला तरी याचा अर्थ असा नव्हे की संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांनी अशा प्रकारच्या शुल्लक व अर्थहीन माहिती अर्जाची दखल घ्यावी. रेल्वे विभागाच्या विविध सेवा व कर्मचारी वर्गाची संबंधित संपूर्ण अभिलेख यांच्या माहितीची मागणी करणे हे केवळ माहिती अधिनियमाची थट्टा उडविणे आहे.."

9. उपरोक्त सर्व वस्तुस्थिती विचारात घेता माहिती अधिकार अधिनियमाचा दुरुपयोग रोखुन कायदा अधिक सक्षम व प्रभावी बनविने आवश्यक आहे. त्यासाठी राज्य शासनाच्या स्तरावर खालील उपाययोजना करता येतील.

(1) माहिती अधिकार फी व माहितीच्या शुल्कात वाढ करणे :-माहिती अधिकार अर्जासाठी अगदीच नाममात्र (रुपये दहा) इतकी फी विहित केलेली असून माहितीसाठी आकारले जाणारे शुल्क देखील खूप कमी आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर माहितीची मागणी केली जाते. कोणताही अभिलेख न जोडता एक पानाच्या पत्रांन्वये अर्जदारास नोंदणीकृत डाकेने माहिती पाठवायची असली तरी शासनास 25 ते 30 रुपये खर्च येतो. तसेच माहितीचे शुल्क रुपये दोन प्रति पेज हे वीस वर्षांपूर्वी निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये कोणती वाढ करण्यात आलेली नाही. काही वेळेस अर्जदार जुना अभिलेख ईमेलद्वारे डिजिटल स्वरूपात मागणी करतात. अशाप्रसंगी शुल्क आकारण्याची तरतुद नियमामध्ये नाही. तथापि सदर अभिलेख शोधणे तो स्कॅन करणे यासाठी शासनाचे मनुष्यबळ व साधनसामग्री खर्च पडत असते. माहिती अधिकार अर्जासाठी गुजरातमध्ये रुपये 20 इतकी फी आहे. माहिती अधिकार फी व माहितीच्या शुल्कात वाढ वाढ करून गैरवाजवी अर्जांवर नियंत्रण मिळविल्यामुळे खऱ्या अर्थाने गरजूंना माहिती जलदगतीने आणि अचूक स्वरूपात मिळेल.

2. अर्जासोबत ओळखीचा पुरावा बंधनकारक करणे :- काही नागरिक दुसऱ्या व्यक्तीच्या किंवा वेगवेगळ्या नावाने अनेक अर्ज करतात. यास्तव अर्जासोबत ओळखीचा पुरावा बंधनकारक करणे आवश्यक आहे.सदर शिफारस विभागीय आयुक्त यांच्या अहवालमध्ये देखील आहे.

3. पूर्वी दिलेली माहिती नाकारणे :- पूर्वी दिलेली माहिती पुन्हा मागितल्यास पूर्वीच्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देऊन अर्ज निकाली काढण्याची तरतूद करावी. सदर शिफारस विभागीय आयुक्त यांच्या अहवालमध्ये देखील आहे.

4. संकेतस्थळावरील माहिती नाकारणे :- काही नागरिक शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीच्या छायांकित प्रति साक्षांकित करून मागतात. त्यामुळे जी माहिती शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे ती माहिती संकेतस्थळावरून उपलब्ध करून घेणे बाबत अर्जदारांना कळविण्याचा व त्या माहितीचे साक्षांकन नाकारण्याचा अधिकार जन माहिती अधिकारी यांना द्यावा.

5. अपील अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :- बरेच अर्जदार प्रथम व द्वितीय अपील अर्जा सोबत कोणतेही कागदपत्रे जोडत नाहीत. त्यामुळे सदर अपील कोणत्या अर्जाच्या अनुषंगाने आहे याचा बोध होत नाही. केंद्र शासनाने त्यांच्या नियमांमध्ये आपील अर्जासोबत जोडायच्या कागदपत्रांची यादी विहित केली आहे. तसेच सदर कागदपत्रे न जोडल्यास अपील परत करण्याची तरतूद केली आहे. अशीच तरतूद राज्याच्या नियमांमध्ये करणे आवश्यक आहे

6. ईमेल / व्हाट्सअप द्वारे केलेला पत्रव्यवहार ग्राह्य माणने :- ईमेलद्वारे किंवा अर्जामध्ये नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर व्हाट्सअप द्वारे केलेला पत्रव्यवहार किंवा उपलब्ध करून दिलेली माहिती ग्राह्य मानण्यात यावी.

7. माहिती पुरविण्याचे माध्यम :- सध्याच्या अर्जामध्ये माहिती उपलब्ध करून देण्यासाठी व्यक्तीशा: व पोस्टाद्वारे असे दोनच पर्याय आहेत. माहिती अधिकार अर्जासाठी विहित केलेल्या नमुन्यामध्ये दुरुस्ती करून माहिती पुरविण्याचे माध्यम यासाठी व्यक्तीशा: / नोंदणीकृत डाकेने / ईमेलद्वारे / स्वतःच्या पेन ड्राईव्हमध्ये / व्हाट्सअप द्वारे / व ऑनलाईन पोर्टल (र्ऑनलाइन माहिती अधिकार अर्जाच्या बाबतीत) असे पर्याय नमूद करणे आवश्यक आहे.

10. उपरोक्त सर्व वस्तुस्थिती विचारात घेता, माहिती अधिकार अधिनियमाच्या दुरुपयोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी “महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2005” मध्ये खालील सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहेत –

(1) अर्ज शुल्क रुपये 10 ऐवजी रुपये 20 निश्चित करणे.

(2) प्रथम अपिल अर्ज शुल्क 20 रुपये ऐवजी 30 रुपये व द्वितीय अपील शुल्क रुपये 50 निश्चित करणे.

(3) माहितीच्या छायांकित प्रतीसाठी माहिती शुल्क रुपये 2 प्रति पान ऐवजी रुपये 5 प्रति पान करणे.

(4) ईलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या डिजिटल स्वरूपातील माहिती साठी (सॉफ्ट कॉपी) प्रतिपान 2 रू. शुल्क निश्चित करणे. (स्कॅनिंग व मनुष्यबळ यांचे शुल्क)

(5) अर्जासोबत अर्जदाराचा ओळखीचा पुरावा सादर करणे बंधनकारक करणे.

(6) पूर्वी दिलेल्या माहितीची पुनरावृत्ती झाल्यास पूर्वीच्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देऊन अर्ज निकाली काढण्याची तरतूद करणे.

(7) शासनाच्या संकेतस्थळावर आधीच उपलब्ध माहितीबाबत जनमाहिती अधिकाऱ्यांना अर्ज नाकारण्याचा अधिकार देणे.

(9) माहिती पुरविण्याचे माध्यम यासाठी व्यक्तीशा: / नोंदणीकृत डाकेने / ईमेलद्वारे स्वतःच्या पेन ड्राईव्हमध्ये / व्हाट्सअप द्वारे / व ऑनलाईन पोर्टल (र्ऑनलाइन माहिती अधिकार अर्जाच्या बाबतीत) असे पर्याय नमूद करणे.

(10) अर्जामध्ये नमूद केलेल्या मोबाइल क्रमाकावर व्हॉट्सअॅपद्वारे पाठवलेली माहिती ग्राह्य मानणे.

(11) अपील अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे निश्चित करून सदर कागदपत्रे नसल्यास अपील परत करण्याची तरतुद करणे.

11. वरील प्रस्तावित सुधारणा या माहिती अधिकार कायद्याने नागरिकांना दिलेल्या हक्कास कोणताही आघात करीत नाहीत. उलट, या उपाययोजनांमुळे कायद्याचा दुरुपयोग रोखून, कायद्याचे उद्दिष्ट, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकहित अधिक प्रभावीपणे साध्य होईल.गैरवाजवी अर्जांवर नियंत्रण मिळविल्यामुळे खऱ्या अर्थाने गरजूंना माहिती जलदगतीने आणि अचूक स्वरूपात मिळेल. त्यामुळे या सुधारणा या कायद्याचे बळकटीकरण करणाऱ्या, गैरवापरास प्रतिबंध करणाऱ्या आणि लोकहित वाढविणाऱ्या ठरतील.

12. केंद्र सरकारने 31 जुलै 2012 च्या अधिसुचनेअन्वये त्यांचे 2005 चे माहिती अधिकार नियम अधिक्रमित करून नव्याने माहितीचा अधिकार नियम 2012 प्रसिद्ध केले आहेत. त्याच धर्तीवर "महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2005" मध्ये वरील सुधारणा करण्यासाठी तसेच सदर नियम केंद्र शासनाच्या नियमांशी सुसंगत करण्यासाठी 2005 चे नियम अधिक्रमित करून "महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2025" नव्याने प्रसिद्ध करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने प्रसिद्ध करावयाच्या अधिसुचनेचे इंग्रजी प्रारूप ड्राफ्ट शेक्शन मध्ये सादर केले आहे. सदर अधिसुचनेचे प्रारूप तपासुन त्यास मान्यता देण्याची विनंती विधी व न्याय विभागास करण्यात येत आहे.

विधी व न्याय विभागाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर भाषा संचालनालयाकडून मराठी प्रारूप तयार करून घेण्यात येईल व सदर सुधारणांना मा.मुख्यमंत्री महोदयांची मान्यता घेऊन अंतीम अधिसुचना प्रसिद्ध करण्यात येईल.

क.अ (श्री.कुटे)

अ.स (श्री.पवार)

उ.स.(श्री.महाजन)

अ.मु.स. (प्र.ना.उ व सु.) (श्री. अग्रवाल)

प्र.स (विधी व न्याय विभाग)

eSign

11/11/2025 05:35 PM **SHESHRAO BHASKAR KUTE**

SECTION OFFICER

Note # 2

12/11/2025 03:40 PM

GOVIND BHASKAR PAWAR
UNDER SECRETARY

Note # 3

13/11/2025 05:30 PM

HEMANT ANANT MAHAJAN
DEPUTY SECRETARY

Note # 4

As discussed.

17/11/2025 01:48 PM

RAJESH AGGARWAL
ADDITIONAL CHIEF SECRETARY

Digitally Signed

Note # 5

18/11/2025 03:04 PM

HEMANT ANANT MAHAJAN
DEPUTY SECRETARY

Note # 6

साप्रवि / माहिती (कार्या-6)

प्रधान सचिव, प्रशासकीय नाविन्यता, उत्कृष्टता व सुशासन यांच्या निर्देशानुसार सादर.

2. महाराष्ट्र राज्याने माहिती अधिकार अधिनियमाच्या अमलबजावणीसाठी सुरुवातीपासूनच सक्रिय भूमिका घेतली असून, "महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2005" अधिसूचित करून अधिनियमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. तथापि, अधिनियम लागू होऊन जवळपास दोन दशके पूर्ण होत असताना, शासनाच्या कार्यपद्धती, तंत्रज्ञान, माहितीचे स्वरूप, नागरिकांच्या अपेक्षा व प्रशासकीय रचना यामध्ये मूलभूत बदल झालेले आहेत. या बदललेल्या परिस्थितीत, सन 2005 मध्ये तयार करण्यात आलेले नियम अनेक बाबतीत कालबाह्य ठरत असून, त्यामध्ये सुधारणा करणे अपरिहार्य झाले आहे. विशेषतः माहिती अधिकार अर्जांची वाढती संख्या, अपील प्रलंबित राहण्याचा दीर्घ कालावधी, मनुष्यबळ व आर्थिक संसाधनांवरील ताण, तसेच माहिती अधिकाराच्या गैरवापराचे वाढते प्रकार या बाबी गंभीर स्वरूप धारण करत आहेत.

3. नागरिकांचे जीवनमान सुकर करण्याबाबत उपाययोजना सुचविण्याच्या अनुषंगाने **विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती** नेमण्यात आली होती. सदर समितीने आपल्या अहवालाद्वारे विविध विषयांवरील उपाययोजना सादर केल्या आहेत. उपरोक्त अहवालामध्ये माहिती अधिकार अधिनियमात खालील प्रमाणे सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत.

(i) अधिनियमामध्ये "वैयक्तिक माहिती" या शब्दाची व्याख्या समाविष्ट करावी.

(ii) अर्जदाराची ओळख पटविण्यासाठी अर्जाबरोबर ओळखीचा पुरावा अनिवार्य करावा.

(iii) अर्जामध्ये माहिती मागण्याचे प्रयोजन नमूद करणे बंधनकारक करावे.

(iv) पूर्वी दिलेली माहिती पुन्हा मागितल्यास, पूर्वीच्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देऊन अर्ज निकाली काढण्याची तरतूद करावी.

(v) वारंवार व मोठ्या संख्येने अर्ज करणाऱ्या नागरिकांना "काळ्या यादीत" समाविष्ट करण्याचे अधिकार राज्य माहिती आयुक्तांना द्यावेत.

(vi) अर्जामध्ये मोबाईल क्रमांक नमूद करणे अनिवार्य करून, सदर क्रमांकावर व्हॉट्सअॅपद्वारे दिलेली माहिती ग्राह्य मानावी.

4. याशिवाय राज्य माहिती आयोगाने सन २०२४ च्या वार्षिक अहवालात महाराष्ट्र माहिती अधिकार नियमांमध्ये सुधारणा करण्याच्या संबंधित खालील शिफारशी केल्या आहेत.

(i). सद्यस्थितीत माहितीच्या अर्जासाठी रू.10/- व अपील अर्जासाठी रू.20/- इतके शुल्क आहे. सदर शुल्क अत्यल्प असल्याचे जाणवते. या शुल्कात वाढ करून माहिती अर्जासाठी रू.100/-, प्रथम अपीलासाठी रू.150/- व द्वितीयअपीलासाठी रू.200/- या प्रमाणे शुल्क आकारावे.

(ii) माहिती अधिकार अर्जामध्ये माहिती मागविण्याचे प्रयोजन / कारण नमूद

करणे आवश्यक करावे.

(iii) माहिती अधिकारात अर्जदाराने सांक्षाकित प्रतीची मागणी केल्यास माहिती शुल्काचे दर नव्याने निश्चित करावेत.

(iv) ज्या प्रकरणामध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम 4 (1) क व ख चे पालन केलेले नाही त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरण्यात यावे.

(v) वारंवार एकाच विषयासंदर्भात अर्ज करणाऱ्या अर्जदाराविरूद्ध ठोस निर्णय घ्यावा.

5. माहिती अधिकार अधिनियम, 2005 हा केंद्र सरकारद्वारे तयार करण्यात आलेला आणि भारताच्या संसदेने संमत केलेला कायदा आहे. त्यामुळे अधिनियमामध्ये थेट दुरुस्ती करणे ही बाब राज्य शासनाच्या अधिकारकक्षेत येत नाही. तथापि,अधिनियमाच्या कलम 27 अन्वये राज्य शासनास या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक नियम तयार करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे विभागीय आयुक्त, पुणे व राज्य माहिती आयोगाच्या अहवालातील ज्या बाबी मूळ अधिनियमाशी विसंगत नाहीत, त्या राज्य शासनाच्या स्तरावर नियमांमध्ये दुरुस्ती करून लागू करता येतील.

6. विभागीय आयुक्त, पुणे व राज्य माहिती आयोगाच्या अहवालातील शिफारशी विचारात घेऊन तसेच **प्रधान सचिव, प्रशासकीय नाविन्यता, उत्कृष्टता व सुशासन यांनी सुचविलेल्या सुधारणा विचारात घेऊन महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००५ या मध्ये खालील सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे**

अ) विभागीय आयुक्त, पुणे व राज्य माहिती आयोगाच्या अहवालातील सामायिक शिफारशी:-

i) **माहिती मागण्याचे प्रयोजन बंधनकारक करणे :-** सदर शिफारस विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तसेच राज्य माहिती आयोगाने देखील केली आहे. सद्याच्या माहिती अधिकार अर्जाच्या विहीत नमुण्यात माहिती मागविण्याचे कारण नमूद करण्याची तरतुद नाही.

विभागाचे अभिप्राय :- बरेच अर्जदार दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींच्या नावे अर्ज करून मोठ्या संख्येने माहिती अधिकाराचे अर्ज दाखल करतात. सदर माहिती निशुल्क द्यावी लागते. याचा कार्यालयीन कामकाजावर विपरीत परीणाम होतो.

अर्जामध्ये माहिती मागविण्याचे कारण नमूद केल्यास अनावश्यक अर्जदारांस आळा बसेल. अर्जदाराने त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली असल्यास **कलम ८(१)(त्र)** नुसार सदर माहिती सार्वजनिक हिताशी संबंधित आहे किंवा नाही याचा निर्णय घेणे जनमाहिती अधिकाऱ्यास सोयीचे होईल. तसेच **कलम ८(२) अन्वये** माहिती देतांना सदर माहिती प्रकट केल्याने साध्य होणारे लोकहित हे संरक्षित हितसंबंधास होणाऱ्या हानीपेक्षा अधिक आहे किंवा नाही, याचा निर्णय घेणे सोयिचे होईल. सदर व्यवस्थेमुळे गरजू व्यक्तींना माहिती

File No. GAD-12020/4/2025-GAD(DESK-6)-GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT (Computer No. 1421575)

मिळणे सोपे होईल. त्यानुसार नियमामध्ये तरतुद करण्याचे प्रस्तावित आहे.

ii) एकाच व्यक्तीने वारंवार अर्ज करण्यास प्रतिबंध करणे :- सार्वजनिक प्राधिकरणांना त्रास देण्याच्या उद्देशाने वारंवार अर्ज दाखल करणाऱ्या अर्जदारांना काळ्या यादीत समाविष्ट करणे बाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य माहिती आयुक्तांना देण्यात यावेत अशी शिफारस विभागीय आयुक्त पुणे यांनी केली आहे. तसेच वारंवार एकाच विषयासंदर्भात अर्ज करणाऱ्या अर्जदाराविरूद्ध ठोस निर्णय घ्यावा अशी शिफारस राज्य माहिती आयोगाने सुद्धा केली आहे.

विभागाचे अभिप्राय :- श्री. केशवराज निंबाळकर या एकाच व्यक्तीचे राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठाने दिनांक 26 जून 2024 च्या आदेशान्वये 2788, दिनांक 23 डिसेंबर 2024 च्या आदेशान्वये 842 व पुणे खंडपीठाने दिनांक 24 डिसेंबर 2024 च्या आदेशान्वये 2955 द्वितीय अपील निकाली काढलेले आहेत. आयोगाच्या एकाच खंडपीठात जर इतके अपील दाखल होत असतील तर सदर नागरिकाने संपूर्ण राज्यभरात दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जांची संख्या हजारोच्या संख्येमध्ये असण्याची शक्यता आहे. याशिवाय श्री.नामदेवराव अहिरे, श्री.इक्बाल आर. खान यांची देखील हजारो अपील माहिती आयुक्तांनी एकाच सामायिक आदेशाने निकाली काढली आहेत.

अनेक प्रकरणांमध्ये एकाच व्यक्तीकडून विविध विभागांकडे किंवा एकाच विभागाकडे वारंवार, मोठ्या संख्येने अर्ज सादर केले जातात. अशा अर्जांमुळे सार्वजनिक प्राधिकरणांचा वेळ व संसाधने मोठ्या प्रमाणावर खर्ची पडतात आणि इतर नागरिकांचे अर्ज वेळेत हाताळणे कठीण होते.

माहिती अधिकार अधिनियमाचा दुरुपयोग होत असल्याची बाब माननीय सर्वोच्च न्यायालय, विविध उच्च न्यायालय व केंद्रीय माहिती आयोग यांच्या सुद्धा निदर्शनास आलेली असल्याचे आढळून येते. मा. सर्वोच्य न्यायालयाने ICAI vs Shaunak H. Satya, (2011) या प्रकरणामध्ये माहिती अधिकार अधिनियमाचा गैरवापर योग्य प्रकारे रोखला गेला नाही तर या कायद्यावरील जनतेचा विश्वास व आत्मविश्वास डळमळीत होईल. पारदर्शकता व लोककल्याणाच्या उद्देशाने करण्यात आलेला हा कायदा, जर उपद्रव व दुरुपयोगाचे साधन बनविला गेला तर ते कायद्यानुसार नियंत्रित करणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले आहे.

सदर समस्येच्या अनुषंगाने एका अर्जदारास एका वेळी कमाल१० अर्ज सादर करता येतील अशी तरतुद करण्यात यावी (अपीलाची संख्या वगळून). त्यासाठी अर्जदाराचे माहिती अधिकार अर्ज दाखल करतांना वेगवेगळ्या कार्यालयांकडे ९ पेक्षा जास्त अर्ज प्रलंबित नाहीत असे स्वंयघोषणापत्र अर्जदारांकडून घेण्यात यावे.

तसेच विभागीय आयुक्तांचा शिफारशीनुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या विनंतीनुसार मोठ्या संख्यने वारंवार अर्ज करणाऱ्या अर्जदारांना विशिष्ट कालावधीसाठी “काळ्या यादीत” समाविष्ट करण्याचे अधिकार राज्य माहिती आयुक्तांना देण्याचे प्रस्तावित आहे.

जेव्हा एखादा अर्जदार अधिनियमांतर्गत वारंवार व सातत्याने अत्यधिक क्षुल्लक, पुनरावृत्ती स्वरूपाचे अर्ज सादर करीत आहे ज्यामुळे सार्वजनिक प्राधिकरणाचा वेळ, मनुष्यबळ किंवा संसाधनांचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे, तेव्हा अश्या अर्जदारास "काळ्या यादीत" समाविष्ट करण्याचे अधिकार मुख्य आयुक्त व इतर राज्य माहिती आयुक्त याना देण्यात यावे.

राज्य माहिती आयोग, अर्जदारास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देऊन व प्रकरणाच्या गुणदोषांची तपासणी करून, कारणांसह आदेशाद्वारे अशा अर्जदारास ठरावीक कालावधीसाठी अर्ज सादर करण्यास प्रतिबंध घालू शकेल. असा प्रतिबंध मर्यादित कालावधीसाठीच राहील व सिद्ध झालेल्या गैरवापराच्या स्वरूप व तीव्रतेनुसार प्रमाणबद्ध राहील, तसेच तो कायमस्वरूपी बंदी म्हणून कार्यान्वित होणार नाही.

ब) फक्त विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अहवालातील शिफारशी :-

i) अधिनियमामध्ये "वैयक्तिक माहिती" या शब्दाची व्याख्या समाविष्ट करावी :-माहितीचा अधिकार अधिनियम कलम 8(1) (त्र) अन्वये सार्वजनिक हिताशी संबंधित नसलेली वैयक्तीक माहिती देण्याचे बंधन नाही. तथापि, **मुळ अधिनियमात वैयक्तिक माहिती या शब्दाची व्याख्या नमूद केली नाही**. कलम 8 (1) (त्र) अन्वये नागरिकांना माहिती उपलब्ध करून देतांना**डिजीटल पर्सनल डेटा संरक्षण कायदा 2023** चे उल्लंघन होऊ नये यासाठी सदर कायद्याप्रमाणे वैयक्तिक माहिती या शब्दाची खालील व्याख्या नमूद करण्याची शिफारस विभागीय आयुक्त, पुणे यांनी केली आहे.

"वैयक्तिक माहिती म्हणजे अशी कोणतीही थेट किंवा अप्रत्यक्षपणे एखाद्या व्यक्तींच्या संबंधित असते आणि ज्यातून त्या व्यक्तीची ओळख पटु शकते."

विभागाचे अभिप्राय :-मुळ माहिती अधिकार अधिनियमामध्ये वैयक्तिक माहिती या शब्दाची व्याख्या नसल्यामुळे सदर व्याख्या प्रस्तावित महाराष्ट्र माहिती अधिकार नियमामध्ये सामाविष्ट करण्यात यावी. त्यामुळे **डिजीटल-पर्सनल डेटा संरक्षण कायदा २०२३** चे उल्लंघन होणार नाही व नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण होऊन त्याचा गैरवापर थांबेल.

ii) पूर्वी दिलेली तसेच संकेतस्थळावरील माहिती नाकारणे :- पूर्वी दिलेली माहिती पुन्हा मागितल्यास पूर्वीच्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देऊन अर्ज निकाली काढण्याची तरतूद करावी अशी शिफारस विभागीय आयुक्त, पुणे यांनी केली आहे.

विभागाचे अभिप्राय :-वरील तरतुदीमुळे प्रशासनाचा वेळ व साधनसामग्रीचा अपव्यय टळेल तसेच काही नागरिक शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीच्या छायांकित प्रति साक्षांकित करून मागतात. त्यामुळे जी माहिती शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे ती माहिती

सकेतस्थळावरून उपलब्ध करून घेणे बाबत अजदाराना कळावेण्याचा व त्या माहितीचे साक्षांकन नाकारण्याचा अधिकार जन माहिती अधिकारी यांना देण्याचे प्रस्तावित आहे.

जनमाहिती अधिकाऱ्याला मागितलेली माहिती कलम4(1)(ख) अंतर्गत प्रसिद्ध करणे आवश्यक असूनही ती प्रसिद्ध नसल्याचे आढळल्यास, त्याबाबत संबंधित कार्यालयाच्या आस्थापना अधिकाऱ्यास कळविणे बंधनकारक राहील. अशी माहिती एक आठवड्याच्या आत स्वयंप्रेरणेने प्रसिद्ध करणे आवश्यक राहील.

iii) ईलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे केलेला पत्रव्यवहार ग्राह्य मानणे :- अर्जामध्ये मोबाईल क्रमांक नमूद करणे अनिवार्य करून, सदर क्रमांकावर व्हॉट्सअॅपद्वारे दिलेली माहिती ग्राह्य मानावी अशी शिफारस विभागीय आयुक्त यांनी केली आहे.

विभागाचे अभिप्राय :- RTI अर्जांची स्थिती जाणून घेण्यासाठी नागरिकांना वारंवार कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. PIO तपशील, उत्तराची स्थिती व अपील माहिती याबाबत स्पष्टता नसल्याने अविश्वास निर्माण होतो. RTI अर्ज सादरीकरण, स्थिती तपासणी, PIO तपशील व रिअल-टाइम अद्ययावत माहिती देण्यासाठी डिजिटल व AI आधारित प्रणाली (चॅटबॉट) या प्रणालीचा वापर करता येईल.

शासनाच्या सर्व विभागात ई-ऑफीस सुरू झाल्यामुळे बरीचशी माहिती फिजीकल स्वरूपात उपलब्ध नसते. सदर माहितीच्या प्रिंटआऊट काढण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात वेळ खर्ची पडतो. सदर बाब विचारात घेता ईमेलद्वारे किंवा इतर ईलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे केलेला पत्रव्यवहार किंवा उपलब्ध करून दिलेली माहिती ग्राह्य मानण्याची तरतुद नियमामध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच सध्याच्या अर्जामध्ये माहिती उपलब्ध करून देण्यासाठी व्यक्तीश: व पोस्टाद्वारे असे दोनच पर्याय आहेत. माहिती अधिकार अर्जासाठी विहित केलेल्या नमुन्यामध्ये दुरुस्ती करून माहिती पुरविण्याचे माध्यम यासाठी व्यक्तीशा: / टपालाने / ईमेलद्वारे / चॅट बॉट द्वारे व ऑनलाईन पोर्टल (र्ऑनलाइन माहिती अधिकार अर्जाच्या बाबतीत) असे पर्याय नमूद करण्याचे प्रस्तावित आहे.

शासकीय सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचा मेटा-एआय सोबत करार झालेला आहे. मेटा-एआय वर माहिती अधिकाराच्या तरतुदी, मर्यादा, विहित पद्धती, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या बद्दलची माहिती उपलब्ध करून देता येईल,

iv) अर्जासोबत ओळखीचा पुरावा बंधनकारक करणे :- विभागीय आयुक्त, पुणे यांनी अर्जदार हा अर्जामध्ये नमूद केलेल्या नावाची व्यक्ती आहे याची खात्री करणेसाठी तसेच त्याची ओळख पटविणेसाठी, अर्ज सादर करतांना अर्जदाराची छायाचित्र असलेला ओळखीचा पुरावा अर्जास जोडणे अनिवार्य करणेबाबत

तरतुद करण्याची शिफारस केली आहे.

विभागाचे अभिप्राय :- काही प्रकरणांमध्ये माहिती अधिकार कायद्याचा गैरवापर करून अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्रास देणे, एकाच विषयावर वारंवार अर्ज सादर करणे, बनावट अथवा इतर व्यक्तींच्या नावाने अर्ज दाखल करणे तसेच तृतीय पक्षाची वैयक्तिक माहिती मिळविण्याच्या उद्देशाने माहिती अधिकार अर्जांचा वापर केल्याची प्रवृत्ती वाढलेली दिसून येत आहे. अशा प्रकारच्या अर्जांमुळे प्रशासकीय यंत्रणेवर अनावश्यक ताण निर्माण होत असून, गोपनीयता व डिजिटल वैयक्तिक **माहिती संरक्षण अधिनियम, 2023 (DPDP Act, 2023)** मधील तत्त्वांशी संबंधित गंभीर बाबी उद्भवत आहेत.

नागरिकांचा **गोपनीयतेचा अधिकार (Right to Privacy)** हा संविधानाच्या **अनुच्छेद 21** अंतर्गत मूलभूत अधिकार म्हणून मान्य करण्यात आलेला आहे. त्यामुळे शासनाकडे उपलब्ध असलेल्या वैयक्तिक व संवेदनशील माहितीचे संरक्षण करणे ही शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे. अर्जदाराची ओळख प्रभावीपणे पडताळण्याची यंत्रणा नसल्यास काही व्यक्ती खोटी किंवा इतरांच्या नावाने माहिती अधिकार अर्ज दाखल करून तृतीय पक्षाची वैयक्तिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करू शकतात.

अशा प्रकारचा दुरुपयोग रोखण्यासाठी तसेच माहिती अधिकाराचा वापर पारदर्शक, प्रामाणिक व जबाबदारीने होण्यासाठी, **आधार कार्ड किंवा इतर डिजिटल वैध ओळखपत्राद्वारे अर्जदाराची ओळख अनिवार्यपणे पडताळण्याची तरतूद करणे आवश्यक आहे**, जेणेकरून माहिती अधिकार आणि गोपनीयतेचा अधिकार यांच्यात योग्य व घटनात्मक समतोल राखता येईल.

यास्तव अर्जा सोबत ओळखीचा पुरावा बंधनकारक करणे आवश्यक आहे. त्यानुसार ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही अर्जासाठी आधार कार्ड, किंवा ज्या ओळखपत्राचे डिजीटायझेशन झाले आहे व त्याच्या क्रमांकावरून अर्जदाराची ओळख पटु शकेल असे एक ओळखपत्र बंधनकारक करण्याचे प्रस्तावित आहे.

ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही अर्जासाठी सोबत ओळखीचा पुरावा बंधनकारक करता येईल. ऑफलाईन अर्ज प्राप्त झाल्यास त्याची नोंद आधार क्र. नोदवून ऑनलाईन पोर्टलवर घेतल्यास एखाद्या व्यक्तीने विशिष्ट कालावधीत किती अर्ज सादर केलेत याची आकडेवारी उपलब्ध होऊ शकेल. ओळख प्रमाणीकरण सारख्या तंत्राचा वापर करून माहिती अधिकाराचा दुरूपयोग करणारे अर्जदार शोधुन काढता येतील.

उपरोक्त 'अ' मधील **(ii)** ची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच दारिद्र्य रेषेचा यादीतील नावाचा गैरवापर करणारे अर्जदाराचे ओळख प्रमाणीकरण करण्यासाठी या पद्धतीची आवश्यकता आहे. ही तरतूद माहिती मागण्याच्या अधिकारावर मर्यादा आणणारी नसून, अर्जदाराची ओळख निश्चित करून तृतीय पक्षांच्या गोपनीयतेचे संरक्षण करण्यासाठी आहे. बनावट अर्जांवर नियंत्रण

येइल, वैयक्तिक माहितीचे सरक्षण होइल व प्रणालीवरील नागरिकाचा विश्वास वाढेल.

क) फक्त राज्य माहिती आयुक्त यांच्या अहवालातील शिफारशी :-

i) **माहिती अधिकार अर्ज व अपील फी यामध्ये वाढ करणे:-**राज्य माहिती आयोगाने माहिती अर्जासाठी रू10 वरुण रू.100/-, प्रथम अपीलासाठी रू 20 वरुण रू.150/- व द्वितीय अपीलासाठी रू 20 वरुण रू.200/- या प्रमाणे शुल्क आकारावे अशी शिफारस केली आहे.

विभागाचे अभिप्राय :-महाराष्ट्र राज्यामध्ये माहिती अधिकार अर्जासाठी रुपये दहा व प्रथम /द्वितीय अपीलासाठी रू.20 इतकी फी विहित केलेली आहे. **सदर फी 20 वर्षापूर्वी निश्चित करण्यात आली असून त्यामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.**

याबाबत केंद्र सरकार तसेच इतर राज्यामधील फी बाबतची माहिती घेतली असता केंद्र सरकार मध्ये देखील माहिती अधिकार अर्जासाठी रू/- 10 इतकी फी असून प्रथम व द्वितीय अपीलासाठी कोणतीही फी नाही इतर सर्व राज्यांमध्ये देखील साधारपणे याच प्रमाणे फी ची रचना आहे. फक्त गुजरात राज्यामध्ये माहिती अधिकार अर्जासाठी रू. 20 इतकी फी आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता माहिती आयुक्तांनी शिफारस केलेली फी जास्त वाटते.

फी बाबत वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असली तरी अगदीच नाममात्र फी मुळे माहिती अधिकार कायद्याचा गैरवापर होत असून मोठ्या संख्येने अर्ज प्राप्त होत आहेत. **सन 2024 या वर्षात महाराष्ट्र रासज्यामध्ये 8,64,000 इतके अर्ज प्राप्त झाले आहेत.** मोठ्या प्रमाणावर अर्जांमुळे प्रथम व द्वितीय अपीलात प्रचंड वाढ झाली असून, सध्या **राज्य माहिती आयोगाकडे जवळपास 1 लाख अपील प्रलंबित आहेत. त्यामुळे खऱ्या गरजवंतांना माहिती मिळण्यास अडचणी निर्माण होतात.**

मा. **सर्वोच्च न्यायालयाने** WP No. 194 / 2012 Common Cause विरुद्ध High Court of Allahabad (20 मार्च 2018) या प्रकरणात सामान्यतः माहिती अधिकार **अर्ज शुल्क रु.50 पेक्षा अधिक नसावे** असे निरीक्षण नोंदविले आहे. तसेच परिस्थितीनुसार शुल्क पुनरावलोकनास मनाई नाही.

साधारनपणे एका माहिती अर्जावर कार्यवाही करण्यासाठी कोणतीही माहिती सोबत जोडली नाही तरी मनुष्यबळ, टपालखर्च व साधनसामग्री या पोटी शासनाचा खर्च होतो. **सदर बाबींचा सारासार विचार करून माहिती अर्जासाठी रू.30, प्रथम अपीलासाठी रू.50 व द्वितीय अपीलासाठी रू.100 या प्रमाणे शुल्क आकारण्याचे प्रस्तावित आहे.** सदर प्रस्ताव हा मा.सर्वोच्च न्यायालयाने घालमन दिलेल्या मर्यादेच्या पूर्णतः आत असून, नागरिकांच्या माहिती मिळविण्याच्या हक्कावर कोणताही अवाजवी अडथळा आणत नाही.

ii) माहितीच्या कागदपत्राच्या शुल्कात वाढ करणे :- राज्य माहिती आयोगाने माहिती अधिकारात अर्जदाराने सांक्षाकित प्रतीची मागणी केल्यास माहिती शुल्काचे दर नव्याने निश्चित करावेत अशी शिफारस केली आहे.

विभागाचे अभिप्राय :- सद्यस्थितीत माहितीसाठी **प्रतीपान फक्त रू. 2** इतके शुल्क आकारण्यात येत असून ते **वीस वर्षांपूर्वी निश्चित** करण्यात आले आहे. काही वेळेस अर्जदार जुना अभिलेख ईमेलद्वारे डिजिटल स्वरूपात मागणी करतात. अशाप्रसंगी शुल्क आकारण्याची तरतुद नियमामध्ये नाही.

मागील 20 वर्षामध्ये कागद, शाई, प्रिंटर या सारख्या संसाधनाच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. माहितीच्या झेरॉक्स काढण्यासाठी शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा वेळ खर्ची पडत असतो. तसेच अर्जदारास दिलेल्या माहितीची एक प्रत भविष्यातील अपील कार्यवाहीसाठी माहिती अधिकार अर्जाच्या नस्तीसोबत सुद्धा ठेवावी लागते.

डिजीटल स्वरूपात माहितीची मागणी केल्यास सदर अभिलेख शोधणे, तो स्कॅन करणे, स्कॅन केलेला डेटा जतन करून ठेवणे यासाठी शासनाचे मनुष्यबळ व साधनसामग्री खर्च पडत असते. डिजीटल स्वरूपाती माहितीसाठी शुल्क आकारण्याची तरतुद नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात ई-मेल द्वारे माहिती मागितली जाते. सदर माहिती ऑनलाईन पोर्टलद्वारे दिली तरी ती सर्व्हरवरील जागा घेते. त्यासाठी उच्च क्षमतेचे सर्व्हर उपलब्ध करून घ्यावे लागतात.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता माहितीच्या**छायांकित प्रतीसाठी अथवा ईलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे माहितीसाठी शुल्क रुपये 2 प्रति पान ऐवजी रुपये 5 प्रति पान करण्याचे प्रस्तावित आहे.**

iii) स्वयंप्रेरणेने माहिती प्रकट करणे बंधनकारक करणे :- माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 4(1)(ख) अन्वये सार्वजनिक प्राधिकरणांनी स्वयंप्ररेणेने माहिती प्रकट करणे बंधनकारक आहे. तथापि, वेळोवेळी सूचना देऊनही अनेक कार्यालये सदर माहिती प्रसिद्ध करत नाही ही वस्तुस्थिती आहे.

कलम 4(1)(ख) चे पालन होत नसल्यामुळे माहिती अधिकार अर्जाच्या संख्येत अनावश्यक वाढ होते. एखाद्या जनमाहिती अधिकाऱ्याकडे मागितलेली माहिती ही कलम 4(1)(ख) अन्वये प्रसिद्ध करणे आवश्यक होते तथापि, सदर माहिती प्रसिद्ध केलीली नाही असे त्याच्या निदर्शनास आल्यास त्याबाबत संबंधित कार्यालयाच्या आस्थापना अधिकाऱ्यास कळविण्याची जबाबदारी जनमाहिती अधिकाऱ्याची असेल. <u>सदर माहिती एक आठवड्यात स्वयंप्रेरणेने प्रकट करणे बंधनकारक राहील.</u>

स्वंयप्रेरणेने माहिती प्रसिद्ध करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखांवर निश्चित करण्याचे प्रस्तावित आहे.

ड) विभागीय आयुक्त, पुणे व राज्य माहिती आयोगाच्या अहवालातील शिफारशी व्यतिरीक्त इतर आवश्यक सुधारणा :-

i)UPI / Online Paymentची सुविधा उपलब्ध करून देणे :- ऑनलाइन आरटीआय या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरीता सद्यस्थितीत सदर सुविधा उपलब्ध आहे. तथापि, ऑफलाईन अर्जासाठी सध्या फक्त पोस्टल ऑर्डर, डिमांड ड्राफ्ट, मनी ऑर्डर संबधीत प्राधिकरणाची रोख शाखा व चलान द्वारे लेखाशिर्षामध्ये शुल्क जमा करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

सद्यस्थितीत राज्यातील ३२ मंत्रालयीन विभागाचे फक्त १८२ क्षेत्रीय कार्यालये ऑनलाईन पोर्टलवर आहेत. राज्यातील इतर बहुसंख्य कार्यालये ऑनलाईन पोर्टलवर नसल्यामुळे सदर कार्यालयातील माहितीसाठी नागरिकांना ऑनलाईन पेमेंट सुविधेचा लाभ घेता येत नाही.

विभागाचे अभिप्राय :- ऑफलाईन माहितीसाठी शुल्क भरण्याच्या पारंपारीक पद्धती वेळ खाऊ व गैरसोयीच्या आहेत. या पद्धतीचा वापर करण्यासाठी अर्जदाराचा सुद्धा वेळ वाया जातो याशिवाय प्रवास खर्च करावा लागतो. सदर खर्च बऱ्याचदा माहितीसाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्कापेक्षा जास्त असतो. *उदा. चाळीस रूपयाचा डिमांड ड्राफ्ट मनी ऑर्डर करण्यासाठी अर्जदाराचे प्रवासासाठी १०० ते १५० रू. खर्च होतात व वेळेचा अपव्यय होतो.*

शासकीय कार्यालयात रोख स्वरूपात जमा होणारे माहितीचे शुल्क सांभाळून ठेवणे व ते वेळोवेळी शासकीय कोषागारात जमा करणे यासाठी शासकीय कार्यालयाचे मनुष्यबळ खर्ची पडते.

सदर बाब विचारात घेता, ऑफलाईन अर्जासाठी सुद्धाUPI / Online Payment ची सुविधा उपलब्ध करून दिल्यास नागरिकांना सोयीचे होईल. एकाच पावतीचा अनेक अर्जांसाठी गैरवापर होऊ नये यासाठी प्रत्येक व्यवहारासाठी स्वतंत्र व्यवहार संदर्भ क्रमांक UTRN निर्माण होत असला तरी विविध कार्यालयात वापर केले जाऊ शकते म्हणून त्यावरती त्या कार्यालयाचे नाव, ठिकाण आणि विषयाबद्दल माहिती या तीन बाबी स्पष्टपणे नमूद कारणे अनिवार्य राहील.

(उदाहरणार्थ सार्वजनिक बंधकाम विभाच्या एखाद्या कार्यालयाकडे माहिती मागण्यासाठी अर्जदार खालील प्रमाणे नमूद करेल - सा. बं. वि.,/पंढरपूर, जि. सोलापूर,/वारी पूर्व तयारीतील डांबरीकरण)

माहिती तंत्रज्ञान विभागाच्या सल्ल्याने सदर सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे.

i i) अपील अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :- बरेच अर्जदार प्रथम व द्वितीय अपील अर्जा सोबत कोणतेही कागदपत्रे जोडत नाहीत. त्यामुळे सदर अपील कोणत्या अर्जाच्या अनुषंगाने आहे याचा बोध होत नाही. केंद्र शासनाने त्यांच्या नियमांमध्ये आपील अर्जासोबत जोडायच्या कागदपत्रांची यादी विहित केली आहे. तसेच सदर कागदपत्रे न जोडल्यास अपील परत करण्याची तरतूद केली आहे. अशीच तरतूद राज्याच्या नियमांमध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.

7. माहिती अधिकाराच्या गैरवापरामुळे अनेक अधिकाऱ्यांचा 50 ते 75 टक्के

वेळ माहिती अधिकार अर्जांवरील कार्यवाहीत जातो. त्यामधून कोणतेही सार्वजनिक हीत साध्य होणार नसले तरी अधिकाऱ्यांना शास्तीच्या भीतीपोटी माहिती अधिकार अर्जांना वेळ द्यावा लागतो. मोठ्या प्रमाणावर अर्जांमुळे प्रथम व द्वितीय अपीलात प्रचंड वाढ झाली असून अपील निकाली लागण्यासाठी सरासरी 2 ते 3 वर्षांचा कालावधी लागत आहे. अपील वेळेत सुनावण्यासाठी येत नसल्यामुळे अपीलाची तरतूद प्रभावी ठरत नाही. माहिती अधिकार अधिनियमाचा दुरुपयोग होत असल्याची बाब माननीय सर्वोच्च न्यायालय, विविध उच्च न्यायालय व केंद्रीय माहिती आयोग यांच्या सुद्धा निदर्शनास आलेली असल्याचे आढळून येते.

8. वरील प्रस्तावित सुधारणा या माहिती अधिकार कायद्याने नागरिकांना दिलेल्या हक्कास कोणताही आघात करीत नाहीत. उलट, या उपाययोजनांमुळे कायद्याचा दुरुपयोग रोखून, कायद्याचे उद्दिष्ट – पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकहित – अधिक प्रभावीपणे साध्य होईल.गैरवाजवी अर्जांवर नियंत्रण मिळविल्यामुळे खऱ्या अर्थाने गरजूंना माहिती जलदगतीने आणि अचूक स्वरूपात मिळेल. त्यामुळे या सुधारणा या कायद्याचे बळकटीकरण करणाऱ्या, गैरवापरास प्रतिबंध करणाऱ्या आणि लोकहित वाढविणाऱ्या ठरतील.

9. केंद्र सरकारने 31 जुलै 2012 च्या अधिसुचनेअन्वये त्यांचे 2005 चे माहिती अधिकार नियम अधिक्रमित करून नव्याने माहितीचा अधिकार नियम 2012 प्रसिद्ध केले आहेत. त्याच धर्तीवर “महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2005” मध्ये वरील सुधारणा करण्यासाठी तसेच सदर नियम केंद्र शासनाच्या नियमांशी सुसंगत करण्यासाठी 2005 चे नियम अधिक्रमित करून “महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2026” नव्याने प्रसिद्ध करण्याचे प्रस्तावित आहे.

10. “महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियमामध्ये उपरोक्त **परिच्छेद ६** मधील सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. सदर प्रस्तावास तत्वता: मान्यता मिळाल्यानंतर प्रस्तावित नियमांचा मसुदा तयार करून विधी व न्याय विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

क.अ (श्री.कुटे)

अ.स (श्री.पवार)

उ.स.(श्री.महाजन)

प्र.स. (प्र.ना.उ व सु.) (डॉ.पाटणे)

मा.मुख्य सचिव.

eSign

29/01/2026 04:35 PM **SHESHRAO BHASKAR KUTE**

SECTION OFFICER

Note # 7

29/01/2026 06:02 PM

GOVIND BHASKAR PAWAR
UNDER SECRETARY

Note # 8

30/01/2026 01:55 AM

HEMANT ANANT MAHAJAN
DEPUTY SECRETARY

Note # 9

30/01/2026 01:22 PM

ATUL NILKANTHRAO PATNE
PRINCIPAL SECRETARY

Digitally Signed

Note # 10

31/01/2026 11:15 AM

RAJESH AGGARWAL
CHIEF SECRETARY

Note # 11

ok, move ahead as per process.

03/02/2026 08:24 AM

RAJESH AGGARWAL
CHIEF SECRETARY
Digitally Signed

Note # 12

03/02/2026 10:41 AM

ATUL NILKANTHRAO PATNE
PRINCIPAL SECRETARY

Note # 13

03/02/2026 12:23 PM

HEMANT ANANT MAHAJAN
DEPUTY SECRETARY

Note # 14

सा.प्र.वि.

माहिती/कार्या-6

उपरोक्त Note # 6 अन्वये सादर केलेला प्रस्ताव वNote # 11 अन्वये त्यावरील मा. मुख्य सचिव यांच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने सादर...

2. विभागीय आयुक्त पुणे यांच्या अध्यक्षतेखाली नागरीकांचे जीवनमान सुकर करणेबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी समिती नेमली होती. सदर समितीने माहिती अधिकार अधिनियम 2005 मध्ये सुधारणा करण्याबाबात अहवाल सादर केला आहे. याशिवाय राज्य माहिती आयोगानेसन 2024 च्या वार्षिक अहवालात माहिती अधिकार नियमांमध्ये सुधारणा करण्याच्या सबंधात काही शिफारसी केल्या आहेत. तसेच राज्य माहिती आयोगाने दि. 28.01.2026 च्या पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियमांतर्गत आयोगातील अपिल व तक्रारी बाबतच्या कार्यपद्धतीबाबतचे नियम प्रस्तावित केले आहेत.

3. वरिल सर्व शिफारसी तसेच याव्यतिरिक्त प्रधान सचिव (प्र.ना.उ व सु)यांनी सुचविलेल्या सुधारणा व त्याबाबचे स्पष्टीकरण उपरोक्त Note #6 मधील परिछेद-6 मध्ये सविस्तरपणे नमूद करण्यात आले आहे. सदर प्रस्तावित सुधारणांना मा.मुख्य सचिव यांची तत्वत: मान्य मिळाली असून त्यांनी नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

4 . माहिती अधिकार अधिनियम, 2005 हा केंद्र सरकारद्वारे तयार करण्यात आलेला आणि भारताच्या संसदेने संमत केलेला कायदा आहे. त्यामुळे अधिनियमामध्ये दुरुस्ती करणे ही बाब राज्य शासनाच्या अधिकारकक्षेत येत नाही. तथापि,अधिनियमाच्या कलम 27 अन्वये राज्य शासनास या

आधीनियमाची प्रभावी अमलबजावणी करण्यासाठी आवश्यक नियम तयार करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे ज्या बाबी मूळ अधिनियमाशी विसंगत नाहीत, त्या राज्य शासनाच्या स्तरावर नियमांमध्ये दुरुस्ती करून लागू करता येतील.

5 . केंद्र सरकारने 31 जुलै 2012 च्या अधिसुचनेअन्वये त्यांचे 2005 चे माहिती अधिकार नियम अधिक्रमित करून नव्याने माहितीचा अधिकार नियम 2012 प्रसिद्ध केले आहेत. त्याच धर्तीवर "महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2005" मध्ये वरील सुधारणा करण्यासाठी तसेच सदर नियम केंद्र शासनाच्या नियमांशी सुसंगत करण्यासाठी 2005 चे नियम अधिक्रमित करून "महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2026" नव्याने प्रसिद्ध करण्याचे प्रस्तावित आहे.

6. सबब, प्रस्तावित "माहिती अधिकार नियम 2026" चे प्रारूप तयार करण्यात आले असून ड्राफ्ट सेक्शन मध्ये विधि व न्याय विभागाच्या तपासणीसाठी (Vetting) सादर काण्यात येत आहेत. त्यानुसार सदर नियमांची तपासणी करून ते मूळ अधिनियमाशी सुसंगत आहेत किंवा नाही याबाबत अभिप्राय देण्यासाठी तसेच आवश्यक असल्यास त्यामाध्ये सुधारणा सुचविण्यासाठी विधी व न्याय विभागास विनंती करण्यात येत आहे.

क.अ (श्री.कुटे)

अ.स (श्री.पवार)

उ.स.(श्री.महाजन)

प्र.स. (प्र.ना.उ व सु.) (डॉ.पाटणे)

प्र.स. (विधी व न्याय विभाग)

12/02/2026 04:25 PM

SHESHRAO BHASKAR KUTE
SECTION OFFICER

Note # 15

12/02/2026 05:58 PM

GOVIND BHASKAR PAWAR
UNDER SECRETARY

Note # 16

13/02/2026 12:35 PM

HEMANT ANANT MAHAJAN
DEPUTY SECRETARY

Note # 17

13/02/2026 03:22 PM

ATUL NILKANTHRAO PATNE
PRINCIPAL SECRETARY

Note # 18

16/02/2026 06:15 PM

SATISH BABAN WAGHOLE
SECRETARY

Note # 19

17/02/2026 02:01 PM

Punit Kumar Ramsunder Varma
CLERK CUM TYPIST

Note # 20

22/04/2026 04:44 PM

Punit Kumar Ramsunder Varma
CLERK CUM TYPIST

Note # 21

विधी व न्याय विभागाने Physical File वर कार्यवाही केली असून त्या विभगाची दि.16.04.2026 रोजीची टिपणी उपलोड केली आहे.

RTI Rules amendment L Jd Note.pdf

22/04/2026 04:49 PM **SHESHRAO BHASKAR KUTE**
SECTION OFFICER

Note # 22

22/04/2026 04:52 PM **VISHWNATH RAMRAO NARMALE**
ASSISTANT SECTION OFFICER

Note # 23

साप्रवि / माहिती (कार्या-6)

उपरोक्त नोट क्र. २१ येथे अपलोड केलेल्या विधी व न्याय विभागाच्या टिपण्णीस अनुसरून सादर...

2. महाराष्ट्र राज्याने माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी सुरुवातीपासूनच सक्रिय भूमिका घेतली आहे. तथापि, अधिनियम लागू होऊन जवळपास दोन दशके पूर्ण होत असताना, शासनाच्या कार्यपद्धती, तंत्रज्ञान, माहितीचे स्वरूप, नागरिकांच्या अपेक्षा व प्रशासकीय रचना यामध्ये मूलभूत बदल झालेले आहेत. या बदललेल्या परिस्थितीत, सन 2005 मध्ये तयार करण्यात आलेले नियम अनेक बाबतीत कालबाह्य ठरत असून त्यामध्ये सुधारणा करणे अपरिहार्य झाले आहे.

3. नागरिकांचे जीवनमान सुकर करण्याबाबत उपाययोजना सुचविण्याच्या अनुषंगाने **विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती** नेमण्यात आली होती. सदर समितीने आपल्या अहवालाद्वारे अधिकार अधिनियमात खालील प्रमाणे सुधारणा सुचविल्या आहेत.

(i) अधिनियमामध्ये "वैयक्तिक माहिती" या शब्दाची व्याख्या समाविष्ट करावी.

(ii) अर्जदाराची ओळख पटविण्यासाठी अर्जाबरोबर ओळखीचा पुरावा अनिवार्य करावा.

(iii) अर्जामध्ये माहिती मागण्याचे प्रयोजन नमूद करणे बंधनकारक करावे.

(iv) पूर्वी दिलेली माहिती पुन्हा मागितल्यास, पूर्वीच्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देऊन अर्ज निकाली काढण्याची तरतूद करावी.

(v) वारंवार व मोठ्या संख्येने अर्ज करणाऱ्या नागरिकांना"काळ्या यादीत" समाविष्ट करण्याचे अधिकार राज्य माहिती आयुक्तांना द्यावेत.

(vi) अर्जामध्ये मोबाईल क्रमांक नमूद करणे अनिवार्य करून, सदर क्रमांकावर व्हॉट्सअॅपद्वारे दिलेली माहिती ग्राह्य मानावी.

4. याशिवाय राज्य माहिती आयोगानेदि. 29.01.2026 च्या पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियमांतर्गत **आयोगातील अपिल व तक्रारी बाबतच्या कार्यपद्धतीबाबतचे नियम** प्रस्तावित केले आहेत. यामध्ये राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपीलांची प्रक्रीया सुरळीत करण्यासाठी व अनावश्यक विलंब टाळण्यासाठी आवश्यक तरतुद प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

5. याव्यतिरीक्त राज्य माहिती आयोगानेसन २०२४ च्या वार्षिक अहवालात महाराष्ट्र माहिती अधिकार नियमांमध्ये सुधारणा करण्याच्या संबंधित खालील शिफारशी केल्या आहेत.

(i). सद्यस्थितीत माहितीच्या अर्जासाठी रू.10/- व अपील अर्जासाठी रू.20/- इतके शुल्क आहे. सदर शुल्क अत्यल्प असल्याचे जाणवते. या शुल्कात वाढ करून माहिती अर्जासाठी रू.100/-, प्रथम अपीलासाठी रू.150/- व द्वितीयअपीलासाठी रू.200/- या प्रमाणे शुल्क आकारावे.

(ii) माहिती अधिकार अर्जामध्ये माहिती मागविण्याचे प्रयोजन / कारण नमूद करणे आवश्यक करावे.

(iii) माहिती अधिकारात अर्जदाराने सांक्षाकित प्रतीची मागणी केल्यास माहिती शुल्काचे दर नव्याने निश्चित करावेत.

(iv) ज्या प्रकरणामध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम 4 (1) क व ख चे पालन केलेले नाही त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरण्यात यावे.

(v) वारंवार एकाच विषयासंदर्भात अर्ज करणाऱ्या अर्जदाराविरूद्ध ठोस निर्णय घ्यावा.

6. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीने त्यांनी सुचविलेल्या सुधारणा अमलात आणण्यासाठी माहिती अधिकार अधिनियमामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. तथापि, माहिती अधिकार अधिनियम, 2005 हा केंद्र सरकारद्वारे तयार करण्यात आलेला आणि भारताच्या संसदेने संमत केलेला कायदा आहे. त्यामुळे अधिनियमामध्ये दुरुस्ती करणे ही बाब राज्य शासनाच्या अधिकारकक्षेत येत नाही. तथापि,अधिनियमाच्या कलम 27 अन्वये राज्य शासनास या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक नियम तयार करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे ज्या बाबी मूळ अधिनियमाशी विसंगत नाहीत, त्या राज्य शासनाच्या स्तरावर नियमांमध्ये दुरुस्ती करून लागू करता येतात.

7. विभागीय आयुक्त पुणे याच्या अध्यक्षतेखालील समितीने तसेच राज्य माहिती आयोगाने सादर केलेल्या वरिल सर्व शिफारसी तसेच याव्यतिरिक्त प्रधान सचिव (प्र.ना.उ व सु) यांनी सुचविलेल्या सुधारणा व त्याबाबचे स्पष्टीकरण उपरोक्त Note # 6 मधील परिछेद-6 मध्ये सविस्तरपणे नमूद करण्यात आले आहे.

8 . केंद्र सरकारने 31 जुलै 2012 च्या अधिसुचनेअन्वये त्यांचे 2005 चे माहिती अधिकार नियम अधिक्रमित करून नव्याने माहितीचा अधिकार नियम 2012 प्रसिद्ध केले आहेत. त्याच धर्तीवर "महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2005" मध्ये वरील सुधारणा करण्यासाठी तसेच सदर नियम केंद्र शासनाच्या नियमांशी सुसंगत करण्यासाठी 2005 चे नियम अधिक्रमित करून "महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2026" नव्याने प्रसिद्ध करण्याचे प्रस्तावित आहे.

9. वरील पार्श्वभूमिवर "महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2026" या प्रस्तावित नियमांचा मसुदा ड्राफ्ट सेक्शन मध्ये (DFA/773059) तयार करून तो नोट क्र. 14 अन्वये विधी व न्याय विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. विधी व न्याय विभागाने सदर नियम तपासून व त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करून **नोट क्र. 21 येथे अपलोड केलेल्या टिपणी** अन्वये सदर नियमांना मान्यता दिली आहे. विधी व न्याय विभागाने तपासून दिलेल्या नियमांची प्रत पृ.91 ते 112 प/वि वर ठवेण्यात आली आहे.

10. विधी व न्याय विभागाच्या मान्यतेनुसार व त्यांनी सुचविलेल्या सुधारणानुसार "महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2026" चे सुधारीत प्रारूप तयार करण्यात आले आहे. सदर नियमांचा सारांश थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६

नियम क्र.	नियमाचे शीर्षक	नियमाचा आशय व समावेशाची पार्श्वभूमी
१	**संक्षिप्त नाव आणि प्रारंभ**	या नियमाद्वारे महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ अधिक्रमित होऊन महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ राजपत्रात प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.
२	**व्याख्या**	या नियमाद्वारे पूर्वीच्या नियमातील व्याख्या कायम ठेवून काही नवीन शब्दांच्या व्याख्या नव्याने समाविष्ट करण्यात आल्या आहेत.
३	**माहिती मिळविण्याची प्रक्रिया**	माहितीच्या विनतीसाठी **पूर्वीची कार्यपद्धती कायम** ठेवून अर्ज शुल्क रु १० वरून रु. ३० करण्यात आले (सविस्तर स्पटीकरण नोट क्र.६,परीच्छेद क्र.६-क-I)

४	**माहिती पुरविण्यासाठी शुल्क**	या नियमाद्वारे माहितीच्या छायांकित प्रतींसाठी तसेच डिजिटल स्कॅन प्रतींसाठी शुल्क रु. २ वरून रु. ५ करण्यात आले; डिजिटल माहितीसाठी स्वतंत्र तरतूद करून संदिग्धता दूर केली.(सविस्तर स्पटीकरण नोट क्र.६,परीच्छेद क्र.६-क- II)
५	**शुल्क भरण्यातून सूट**	या नियमाद्वारे **पूर्वीची तरतूद कायम** ठेवण्यात आली आहे. दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना शुल्कमाफी; पहिली ५० पाने मोफत व उर्वरित पानांसाठी विहित दराने शुल्क.
६	**शुल्क भरण्याची पद्धत**	या नियमाद्वारे पूर्वीच्या नियमातील शुल्क भरण्याच्या पद्धती कायम ठेवून त्या व्यतीरिक्त **यूपीआय व इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे** शुल्क भरण्याचा पर्याय नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे.
७	**अर्ज एकाच विषयाशी संबंधित असावा**	सदर तरतुद पूर्वीच्या नियमातील असून ती कायम ठेवण्यात आली आहे.
८	**अभिलेख पाहणीसाठी प्रक्रिया**	सदर तरतुद पूर्वीच्या नियमातील असून ती कायम ठेवण्यात आली आहे.
९	**ओळखपत्राची आवश्यकता**	प्रत्येक अर्जदाराने नागरीकत्व सिद्ध करणाऱ्या ओळखपत्राची प्रत जोडणे अनिवार्य; विभागीय आयुक्त समितीच्या शिफारशीनुसार नव्याने प्रस्तावित. (सविस्तर स्पटीकरण नोट क्र.६,परीच्छेद क्र.६-ब- IV)
१०	**पुनरावृत्त अर्जांचे निकाल**	आधीच पुरविलेली माहिती पुन्हा मागितल्यास मागील पत्रव्यवहाराचा सदर्भ देऊन अर्ज निकाली काढण्याची तरतूद. राज्य माहिती आयुक्तांच्या तसेच विभागीय आयुक्त समितीच्या शिफारशीनुसार नव्याने समाविष्ट.
११	**स्वयप्रेरणेने प्रकटीकरणाची जबाबदारी**	माहितीचे स्वयप्रेरणेने प्रकटीकरण न केल्यास कार्यालय प्रमुखावर जबाबदारी; स्वयंप्रेरणेने प्रकाशन न झाल्यामुळे अर्जांची संख्या वाढत असल्याने राज्य माहिती आयुक्तांच्या शिफारशीनुसार सदर तरतूद नव्याने समाविष्ट करण्यात आली आहे.
१२	**सकेतस्थळावर उपलब्ध माहिती**	मागितलेली माहिती अधिकृत सकेतस्थळावर उपलब्ध असल्यास सदर माहितीसाठी अनावश्यक अर्ज व साक्षांकनाचा भार टाळण्यासाठी सदर तरतूद नव्याने समाविष्ट करण्यात आली आहे.
१३	**वैयक्तिक माहितीतून सूट**	वैयक्तिक माहिती प्रकटीकरणातून मुक्त; व्यापक सार्वजनिक हित असल्यास सक्षम प्राधिकारी लेखी कारणे नोंदवून ती उघड करू शकतात. सदर तरतूद नव्याने समाविष्ट करण्यात आली आहे.
१४	**इलेक्ट्रॉनिक संप्रेषणाची स्वीकार्यता**	ई-मेल किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे केलेले सप्रेषण वैध मानले जाते. डिजिटल प्रशासनास चालना व इलेक्ट्रॉनिक उत्तरांना कायदेशीर मान्यता देण्यासाठी नव्याने समाविष्ट.

१५	**प्रथम अपीलीय प्राधिकरणा कडे अपील**	अपील शुल्क रू.२० वरून रू.५०. अपीलासोबत जोडावयाच्या कागदपत्राची यादी विहीत करण्यात आली असून नमुन्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत.
१६	**राज्य माहिती आयोगाक डे द्वितीय अपील**	अपील शुल्क रू.२० वरून रू.१००. सदर तरतूद केंद्र शासनाच्या नियमाशी सुसंगत बनविण्यासाठी तसेच राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे अपीलासोबत जोडावयाच्या कागदपत्राची यादी विहीत करण्यात आली असून नमुन्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत.
१७	**अपील परत करणे**	त्रुटी असलेले अपील परत करण्याची तरतूद. केंद्र शासनाच्या नियमाशी सुसंगत बनविण्यासाठी तसेच राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे.
१८	**आयोगाक डे अपीलाची प्रक्रिया**	अपील नोंदणी व सुनावणी प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी तसेच केंद्र शासनाच्या नियमाशी सुसंगत बनविण्यासाठी राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे.
१९	**अपील किंवा तक्रारीची नोटीस**	डिजिटल माध्यमाचा समावेश करून नोटीस बजावणी प्रभावी करण्यासाठी तसेच केंद्र शासनाच्या नियमाशी सुसंगत बनविण्यासाठी राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे..
२०	**अपीलकर्त्याची वैयक्तिक उपस्थिती**	केंद्र शासनाच्या नियमाशी सुसगत बनविण्यासाठी राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे...
२१	**अपील निकालात काढण्याची प्रक्रिया**	निकाल प्रक्रियेत स्पष्टता आणून अनावश्यक विलब टाळण्यासाठी तसेच केंद्र शासनाच्या नियमाशी सुसंगत बनविण्यासाठी राज्य माहिती आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे **नव्याने सामाविष्ट** करण्यात आले आहे.
"Personal information, as defined under these rules, shall be exempt from disclosure under the ~~Right to Information Act, 2005,~~ in accordance with clause (j) of sub-section (1) of section 8 of the Act, where such information has no relationship to any public activity or public interest, or where the disclosure of

such information would cause an unwarranted invasion of the privacy of the individual concerned.

Provided that such personal information may be disclosed if the competent authority is satisfied that a larger public interest justifies such disclosure, and the reasons for such satisfaction shall be recorded in writing.

Provided further that the burden of establishing the existence of such larger public interest shall lie on the applicant seeking the information, and mere assertion of public interest shall not be sufficient."

15. Acceptance of Electronic Communication.- Any communication made or information provided by the Public Information Officer through e-mail or through any other electronic mode shall be deemed to be valid communication or delivery of information under the Act.

16. Appeal to the First Appellate Authority –

(1) Any person aggrieved by an order passed by the State Public Information Officer or by non-disposal of his application by the State Public Information Officer, may file an appeal to the First Appellate Authority in the format given in Annexure "B" and shall be accompanied by an appeal fee of rupees fifty and paid in such manner as prescribed in rule 6.

(2) An appeal to the First Appellate Authority shall be duly authenticated and verified by the appellant and accompanied by the following self-attested documents, namely :-

(i) a copy of the application submitted to the State Public information Officer,

(ii) a copy of the reply received, if any, from the State Public Information Officer,

(iii) an index of the documents referred to in the appeal.

17. Appeal to the State Information Commission

(1) Appeal under sub-section (3) of section 19 to the State Information Commission shall be filed, on plain paper in the format given in Annexure "C" ~~appended to the Maharashtra Right to Information Rules, 2005~~, which shall be accompanied by an appeal fee of rupees hundred and paid in such manner as prescribed in rule 6.

(2) An appeal to the State Information Commission shall be duly authenticated and verified by the appellant and accompanied by the following self-attested documents, namely :-

(i) (a) a copy of the application submitted to the State Public Information Officer;

(b) copy of the documents referred to or relied in an application;

(ii) proof of submission of application to the concerned State Public Information Officer;

(iii) a copy of the reply received, if any, from the concerned State Public Information Officer;

(iv) a copy of the appeal made to the First Appellate Authority;

(v) proof of submission of appeal to the First Appellate Authority;

(vi) original copy of the order received, if any, from the First Appellate Authority;

(vii) an index of the documents referred to in the appeal and relied upon by the appellant; and

(viii) copies of such other documents referred to in his appeal, and relied upon, by the appellant.

(3) An appeal to the State Information Commission should be written, typed or printed neatly and legible on the plain paper and the appeal and documents to be presented along with it shall be filed in three set of copies for respondents.

18. Return of Appeal - An appeal may be returned to the appellant, if it is not accompanied by the documents as specified in sub-rule (2) or sub-rule (3) of rule 3 or if any other deficiency is noticed by the officer of the Commission, for removing the deficiency and filing the appeal complete in all respects within fifteen days from the date of receipt of letter requesting removing the deficiency:

Provided that, where the reply of the State Public Information Officer or order of the First Appellate Authority is not received within the period prescribed in the Act, the appeal shall not be returned on that ground under this rule.

19. Process of appeal to the Commission

(1) If the officer of Commission is of the view that the appeal is in accordance with the provisions of the Act, the rules and the regulations, the appeal be numbered and entered in a register maintained for the purpose and the officer shall direct the Public Information Officer and First Appellate Authority to furnish the written statement or report along with copies of all the documents relating thereto with reference to the appeal, within 15 days from date of receipt of letter containing the direction. On receipt of report or if no report is received within the aforesaid period, the date for the hearing of the appeal may be fixed.

(2) The Commission shall not consider an appeal unless it is satisfied that the appellant has availed of all the remedies available to him under the Act.

(3) For the purposes of sub-rule (2), a person shall be deemed to have availed of all the remedies available to him under the Act,-

(a) if he had filed an appeal before the First Appellate Authority and the First Appellate Authority or any other person competent to pass order on such appeal had made a final order on the appeal; or

(b) where no final order has been made by the First Appellate Authority with regard to the appeal preferred, and a period of forty five days from the date on which such appeal was received by it has elapsed.

20. Notice of appeal or complaint

(1)The Commission may serve notice of appeal or complaint to the persons concerned in any of the following modes, namely:-

(a) by hand delivery;

(b) by Registered Post, Speed Post, Under Postal Certificate, Courier or such similar other means;

(c) by electronic mail, if e-mail address is provided; or by mobile phone by any messaging system;

(d) by publication in the newspaper; or

(e) in any other manner as the Chief Information Commissioner may, by general or special order, direct.

(2) The service of notice in any of the manner mentioned under sub-rule (1) shall be deemed to be valid service of notice.

21. Personal presence of the appellant or complainant

(1) The appellant or the complainant, as the case may be, shall in every case be informed of the date of hearing at least seven clear days before that date.

(2) The appellant or the complainant or respondent may at his discretion at the time of hearing of the appeal or complaint by the Commission be present in person

or through his duly authorized representative:

Provided that, the appellant or complainant or respondents may present the case through video conferencing, if all the relevant documents therefor are submitted two days prior to the date of hearing and the facility of video conferencing is available, at the time of hearing of the appeal by the Commission.

(3) The appellant or the complainant, as the case may be, may seek the assistance of any person in the process of the appeal, in the manner as may be provided therefor, while presenting his points and the person representing him may not be a legal practitioner.

22. Procedure for deciding appeals

(1) The Commission, while deciding an appeal may,-

(i) receive oral or written evidence on oath or on affidavit from concerned or interested person;

(ii) peruse or inspect documents, public records or copies thereof;

(iii) inquire through authorized officer further details or facts;

(iv) hear State Public Information Officer, State Assistant Public Information Officer or the First Appellate Authority, or such person against whose action the appeal is preferred, as the case may be ;

(v) hear third party; or

(vi) receive evidence on affidavit from State Public Information Officer, State Assistant Public Information officer, First Appellate Authority and such other person against whom the appeal lies or the third party or any other person concerned in relation to application.

(2) Where the Commission is satisfied that the circumstances exist due to which the appellant or the complainant, as the case may be, is being prevented from attending the hearing of the Commission, then, the Commission may afford the appellant or the complainant, as the case may be, another opportunity of being heard before a final decision is taken or take any other appropriate action as it may deem fit.

(3) Where the appellant or, as the case may be, complainant does not appear persistently either personally or online, when the second Appeal or complaint is called on for hearing, the Commission may, after recording the reasons, apply the provisions of Rule 17 of Order XLI of the Civil Procedure Code, 1908 and make an order that the Appeal or complaint be dismissed for non- prosecution:

Provided that, where an Appeal or complaint is so dismissed for non-prosecution under this sub-rule, the Appellant or complainant may apply, within a period of ~~30~~ (thirty) days from the date of receipt of the order for dismissal, for an order to set the dismissal aside, and if the Appellant or complaint satisfies the Commission that there was sufficient cause for his non-appearance, the Commission may make an order setting aside the dismissal and shall appoint a day for proceeding with the Appeal or the complaint:

Provided further that, no order shall be set aside on any such application as aforesaid unless notice thereof has been served on the opposite party.

(4) Notwithstanding anything contained in sub-rule (3), where the Commission is of the view that a substantial question regarding denial of information is involved, it may proceed to decide the matter on the basis of record available.

(5) Nothing in this rule shall prevent the Commission, in respect of the second appeal, from calling for the records or directing disclosure of information were warranted under the Act, irrespective of the presence of the appellant.

23. Burden of Proof.- Save as otherwise provided by or under the Act

(1) In case of appeal or complaint before the Commission, the burden of proof shall lie upon the party asserting a fact.

(2) In complaint under section 18 or appeal under section 19,-

(a) the complainant or appellant shall prove and establish the denial, delay, or incorrect information, or any other ground pleaded therein;

(b) the state public information officer, the First Appellate Authority or the public authority, as the case may be, shall justify its action as per sub-section (5) of section 19.

(3) The Commission shall decide the matters solely on the basis of pleadings, arguments and evidence placed on the record.

24. Withdrawal or abatement of appeal.-

(1) The State Information Commission may, on a written request made by the appellant, allow the appeal to be withdrawn:

Provided that, in case where the written request made by the Appellant is received by the Commission after the notice for hearing is issued, the Commission may impose a reasonable cost to be paid by the Appellant for wasting the resources of the Commission and its expenses and recover the same as an arrears of land revenue.

(2) As the right to information is available only to the particular applicant citizen of India who has requested the information, the proceedings pending before the State

Information Commission in respect of second appeal filed by such person shall abate on the death of the appellant, where the respondent produces the evidence that the appellant is dead or the Commission comes to such conclusion on the basis of record available to it.

4 **25. Order of the State Information Commission** - The order of the State Information Commission shall be in writing and issued under the seal of the Commission duly authenticated by any officer authorized by the Commission for this purpose.

5 **26. Procedure for complaint** - The provisions of above rules shall mutatis mutandis apply for the complaint filed before the Commission under section 18.

Print slip-B here

27. Application of certain provisions of the Code of Civil Procedure, 1908- Under sub-section (10) of section 19 and clause (f) of sub-section (3) of section 18, it is hereby prescribed that the following provisions of sections 151 and 152 of the Code of Civil Procedure, 1908, regarding powers of civil court, shall, mutatis mutandis, in its application to the Commission, apply to the appeals and complaints under the Act, namely:-

(a) Saving of inherent powers of Commission -Nothing in the Rules shall be deemed to limit or otherwise affect the inherent power of the Commission to make such orders as may be necessary for the ends of justice or to prevent abuse of the process of the Commission."

(b) Amendment of order of Commission – Any Clerical or arithmetical mistake in the order or errors arising therein from any accidental slip or omission may at any time be corrected by the Commission either of its own motion or on the application of any of the parties.".

28. Power of Maharashtra State Chief Information Commissioner to make regulations –

The State Chief Information Commissioner may make regulations, consistent with the Act and the rules made thereunder, for the management of affairs of the Commission or for the matters connected therewith or incidental thereto for which provision is, in the opinion of the Chief Information Commissioner, necessary for the exercise of the powers and the discharge of the functions of the Commission under the Act.

29. Regulation of Vexatious or Abusive Applicants -

(1) Where the State Public Authority is of the opinion that any applicant has been habitually and persistently filing applications under the Right to Information Act, 2005 in an excessive, frivolous, repetitive or vexatious manner, with the intention of causing harassment, obstruction or undue burden, thereby resulting in disproportionate diversion of time, manpower and resources of the Public Authority, such Public Authority may make a reasoned application to the State Information Commission seeking appropriate directions.

(2) The State Information Commission, after giving the applicant a reasonable opportunity of being heard and after examining the merits of the case, may, if satisfied that the applicant has abused the process of the Act, by a reasoned order, declare such applicant as a vexatious applicant and prohibit him from filing applications under the Act for a specified period, as may be determined by the Commission.

Provided that such prohibition shall be for a limited duration and shall not be permanent in nature, and the period of prohibition shall be proportionate to the nature and gravity of abuse established.

Provided further that nothing in this rule shall affect the right of the applicant to seek information after the expiry of the period so specified

30. Regulation of Multiple Applications

(1) In order to prevent abuse of the process of the Act and to ensure effective and timely disposal of applications, no applicant shall be entitled to have more than ten applications pending at any given time before one or more Public Authorities under the Right to Information Act, 2005:

Provided that for the purposes of this rule, appeals or complaints filed under the Act shall not be counted towards the said limit.

(2) Every applicant, at the time of submitting an application under the Act, shall furnish a self-declaration stating that not more than nine applications filed by him are pending consideration before any Public Authority.

31. Presentation by the Public Authority - The public authority may authorise any representative or any of its officers to present its case.

By order in the name of the Governor of Maharashtra,

Dr. Atul Patane

Principal Secretary to the Government

ANNEXURE "A"

(See Rule 3)

Format of application for obtaining information under the Right to Information Act, 2005)

To,

The State Public Information Officer,

(Name of the office with address)

1) 2	Full name of the Applicant -	
2) 2	Address of the Applicant -	
3) 2	Mobile No & Email-id.	
4) 2	Particulars of information required -	
5) 2	Purpose of Information Sought -	
6) 2	Subject matter of information - (Use only 150 words)	
7) 2	The period to which the information relates -	
8) 2	Mode of required information - (In person / by registered post / by e-mail / in personal pen drive / through Online Portal-in case of online RTI)	
9) 2	Whether the applicant is below poverty line - (If yes, attach the photo copy of the proof thereof)	
10) 2	Proof of Identity-	

Date:-

Place :-

Signature of the Applicant.

ANNEXURE "B"

(See Rule १३)

Appeal under under section १९(१) of the Right to Information Act, २००५

To,

(Name/designation/address of the appellate authority)

१	Full name of the Appellant -	
२	Address of the Appellant -	
३	Mobile No & Email id	
४	Name and address of the State Public Information Officer who gave reply to the Application -	
५	Particulars of the Application	
६	Particulars of the orders including number, if any, against which the appeal is preferred-	
७	Prayer or relief Sought	
८	Grounds for the prayer or relief -	
९	Any other information relevant to the appeal	
१०	Proof of Identity- (proving citizenship	

Date:-

Place :-

Signature of the Appellant

"ANNEXURE 'C"

(See rule 5(2))

Second Appeal under section 19 (3) of the Right to Information Act, 2005

To, Maharashtra State Information Commission,

Bench at ----------

Address:----------

(1) Full name of the Appellant :

(2) Address :

(3) Mobile number and Email address of Appellant :

(4) Whether the applicant is below poverty line

(if yes, attach the photocopy of the valid proof thereof.) :

(5) Particulars of concerned State Public Information Officer with address :

(6) Particulars of the concerned First Appellate Authority with address :

(7) Name and Address of the original Applicant, if appellant is Third Party :

(8) Details of the Application seeking information-

(a) Date of Application :

(b) Particulars of information- :

(i) Subject matter of information. :

(ii) The period to which the information relates :

(iii) Description of the Specific information required :

(c) Whether information is required by post or in person :

(d) In case by post (Ordinary, Registered or Speed) :

(e) Whether Application (Annexure-A) is given to Assistant Public Information Officer :

(f) Date of receipt of the Application by the Assistant Public Information Officer :

(g) Date of receipt of the Application by the Public Information Officer :

(h) Date of reply of the Public Information Officer :

(i) Date of receipt of reply of the Public Information Officer : Yes/No

(9) Details of the First Appeal to the First Appellate Authority-

(a) Date of First Appeal

(b) Date of receipt of the First Appeal by the First Appellate Authority

(c) Whether First Appeal (Annexure-B) is given to Assistant Public Information Officer : Yes/No

(d)The date of receipt of order of First Appellate Authority by Applicant :

(10) Last date for filing the appeal :

(11) The grounds for appeal :

(12) Prayer or relief sought :

(13) Grounds for prayer/relief sought for :

(14) (a) Personal Presence at hearing

(b) (i) Online Presence at hearing

(ii) If yes mention here email address or mobile number for online hearing : Yes/No *: Yes/No *

(15) Details of complaint filed under section 18, if any :

Place :

Date : Signature of the Applicant.

Verification

I,_____ (Name of the appellant), son of / daughter of / wife of _____ resident of _____(address) hereby declare that the Information as provided above is true to the best of my knowledge and no second Appeal under section 19 (3) is filed before the State Information Commission regarding the same application and that I have not suppressed any material fact.

Place :

Date : Signature of Appellant.

Slip A

NOTIFICATION

General Administration Department,
Mantralaya, Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mumbai – 400 032,
Dated the 2026.

Right to Information Act, 2005.

No. .- In exercise of the powers conferred by clause *(f)* of sub-section *(3)* of section 18, sub-section *(10)* of section 19 and sub-section *(2)* of section 27 of the Right to Information Act, 2005 (22 of 2005) and in supersession of all the existing rules issued in that behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules, namely:-

Slip B

26. Inherent procedural powers of the Commission.-

(1) Nothing in these rules shall be deemed to limit the power of the State Information Commission, while conducting an inquiry under section 18 or deciding a second appeal under sub-section *(3)* of section 19 of the Act, to pass such incidental or ancillary procedural orders, consistent with the provisions of the Act, after giving the reasonable opportunity of being heard to all the parties, as may be necessary to secure the ends of justice or to prevent abuse of the process of the Commission.

(2) The Commission may, at any time, either of its own or on an application of any of the parties, correct any clerical or arithmetical mistake or any error arising from an accidental slip or omission in any order or record relating to a complaint under section 18 or a second appeal under sub-section *(3)* of section 19.

(3) Where any correction is made under sub-rule *(2)*, a copy of the corrected order shall be communicated to the concerned parties and uploaded on the website of the Commission.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
१९ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

क्रमांक: साप्रवि- १२०२०/०४/२०२५-साप्रवि(कक्ष-६) दिनांक:- ०७ मे,२०२६.

प्रति,
भाषा संचालक,
भाषा संचालनालय,
प्रशासकीय इमारत, पाचवा मजला, डॉक्टर आंबेडकर उद्यानाजवळ,
शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०००५१.

विषय : महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ यांच्या मराठी भाषेतील प्रारूपाची तपासणी करण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ अधिक्रमित करून महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ प्रसिद्ध करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. सदर नियमांचे इंग्रजी भाषेतील प्रारूप विधी व न्याय विभागाच्या मान्यतेनंतर विभाग स्तरावर मराठी भाषेत भाषांतरित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ प्रसिद्ध करण्यापूर्वी मराठी भाषेतील प्रारूपाची भाषा, शब्दप्रयोग व पारिभाषिक शुद्धतेच्या दृष्टिकोनातून तपासणी करून आवश्यक असल्यास सुधारणा सुचविण्याची विनंती आहे.

सदर पत्रासोबत महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ यांचे इंग्रजी व मराठी भाषेतील प्रारूप जोडण्यात येत आहे.

O/C

Issued by e-mail on - 7th may 2026,
① director.dol-mh@gov.in
② bhashasanchalak@yahoo.in

निर्गमित
दिनांक : 07/05/26
सही : SPK

आपला
(शेषराव कुटे)
कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
भाषा संचालनालय
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत,
५ वा मजला, डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

ईमेल :- director.dol-mh@gov.in bhashasanchalak@yahoo.in

क्र. विधि-६५/२०२६/७३७/कार्या. ८अ. दिनांक:- ०८ जून, २०२६.

प्रति,
कक्ष अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग,
१९ वा मजला,
नवीन प्रशासन भवन,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय :- महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २०२६ बाबत..

संदर्भ :- क्रमांक : सेप्रवि-१२०२०/०४/२०२५-सप्रवि (कक्ष-६) दि. ०७ मे, २०२६ चे पत्र.

महोदय,

संदर्भित पत्रान्वये आपण पाठविलेल्या विषयांकित नियमाच्या / विनियमाच्या / आदेशाच्या / अधिसूचनेच्या इंग्रजी मसुद्याची १८ इतकी पृष्ठे दि. ०८/०५/२०२६ रोजी या कार्यालयास प्राप्त झाली आहेत.

आपण मागणी केल्याप्रमाणे विषयांकित नियमाच्या / विनियमाच्या / आदेशाच्या / अधिसूचनेच्या इंग्रजी मसुद्याचा मराठी अनुवाद करून त्याची १९ इतकी मुद्रित पृष्ठे आपणाकडे या पत्रासोबत पाठविण्यात येत आहेत. तथापि, राज्य विधानमंडळात मांडण्यात येणारी सर्व विधेयके, राज्य विधानमंडळाने संमत केलेले राज्य अधिनियम व माननीय राज्यपालांनी प्रख्यापित केलेले सर्व अध्यादेश आणि त्याखालील केलेले नियम, विनियम, आदेश व अधिसूचना इत्यादी यांचा मसुदा, महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ याच्या कलम ५ अन्वये मूळ स्वरूपात मराठी भाषेत तयार करणे अनिवार्य केलेले असल्याने व हा मसुदा मराठीत तयार करणे ही संबंधित विभागाची जबाबदारी असल्याने, सदर नियम/ विनियम/आदेश / अधिसूचना इंग्रजी विधानमंडळात सादर करण्यापूर्वी किंवा प्रसिद्ध करण्यापूर्वी कृपया सदर मराठी अनुवाद आपल्या कार्यालयातील तज्ज्ञ अधिकाऱ्याने तपासून घेणे आवश्यक आहे.

सदर नियम / विनियम / आदेश / अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर त्याच्या २ मुद्रित प्रती (इंग्रजी व मराठी) या कार्यालयाच्या अभिलेखासाठी उपलब्ध करून द्याव्यात ही विनंती.

कृपया पोच द्यावी, ही विनंती.

आपला,

(श. कि. यादव),
सहायक भाषा संचालक

सोबत :- विषयांकित प्रकरणाची मराठी अनुवादित पृष्ठे १ ते १९.

Scanned with OKEN Scanner

अधिसूचना

	सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२. दिनांक २०२६.
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५.	**क्रमांक. साप्रवि/१२०२०/४/२०२५-साप्रवि-कार्या-६.-** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) याच्या कलम १८ च्या पोट-कलम *(३)* च्या खंड *(च)*, कलम १९ च्या पोट-कलम *(१०)* व कलम २७ च्या पोट-कलम *(२)* यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबतीत केलेल्या सर्व विद्यमान नियमांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील नियम करीत आहेत :- **१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.-** *(१)* या नियमांस, महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६, असे म्हणावे. *(२)* ते, **शासकीय राजपत्रातील** त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील. **२. व्याख्या.-** *(१)* या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,- *(क)* "अधिनियम" याचा अर्थ, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२), असा आहे; *(ख)* "अपील" याचा अर्थ, कलम १९ च्या अनुक्रमे, पोट-कलम *(१)* व पोट-कलम *(३)* अन्वये प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे आणि आयोगाकडे केलेले अपील, असा आहे; *(ग)* "अपीलकर्ता" याचा अर्थ, जिने अपील दाखल केलेले असेल ती व्यक्ती, असा आहे; *(घ)* "प्राधिकृत प्रतिनिधी" याचा अर्थ, आयोगासमोरील कार्यवाहीतील पक्षकाराने कार्यवाहीमध्ये त्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी जिला लेखी स्वरूपात प्राधिकृत केलेले असेल ती व्यक्ती, असा आहे;

(ङ) "आयुक्त" याचा अर्थ, कलम १५ च्या पोट-कलम *(३)* अन्वये नियुक्त केलेला राज्य मुख्य माहिती आयुक्त किंवा, यथास्थिति, राज्य माहिती आयुक्त, असा आहे;

(च) "तक्रार" याचा अर्थ, कलम १८ अन्वये केलेली तक्रार, असा आहे;

(छ) "तक्रारदार" याचा अर्थ, कलम १८ अन्वये जिने तक्रार केलेली असेल ती व्यक्ती, असा आहे;

(ज) "विनियम" याचा अर्थ, अधिनियमान्वये राज्य मुख्य माहिती आयुक्ताने केलेले विनियम, असा आहे;

(झ) "राज्य माहिती आयोग" किंवा "आयोग" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम १५ च्या पोट-कलम *(१)* अन्वये घटित केलेला राज्य माहिती आयोग, असा आहे;

(ञ) "प्रथम अपिलीय प्राधिकारी" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* अन्वये ज्याच्याकडे अपील दाखल केले जाते तो केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा सार्वजनिक प्राधिकरणातील अधिकारी, असा आहे;

(ट) "कलम" याचा अर्थ, अधिनियमाचे कलम, असा आहे;

(ठ) "वैयक्तिक माहिती" याचा अर्थ, जी माहिती, ओळखपटण्यायोग्य व्यक्तीशी -मग ती प्रत्यक्षपणे असो किंवा अप्रत्यक्षपणे असो,- संबंधित असेल, आणि जी, स्वतः त्या माहितीद्वारे किंवा उपलब्ध असलेल्या किंवा उपलब्ध होण्याचा संभव असलेल्या इतर माहितीच्या संयोगाने, अशा व्यक्तीची ओळख पटविण्यायोग्य आहे, अशी कोणतीही माहिती, असा आहे.

(२) या नियमांमध्ये वापरलेले, परंतु, व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना या अधिनियमामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

३. माहिती मागण्याची कार्यपद्धती.- अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम *(१)* अन्वये माहिती मिळवण्याची विनंती, जोडपत्र "**अ**" मध्ये दिलेल्या नमुन्यात, साध्या कागदावर संबंधित राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे करण्यात येईल आणि त्यासोबत तीस रुपये इतके अर्ज शुल्क सादर करण्यात येईल.

४. माहिती पुरविण्याचे शुल्क.-

अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम *(४)* आणि कलम ७ च्या पोट-कलम *(१)* व पोट-कलम *(५)* याअन्वये माहिती पुरविण्याचे शुल्क, पुढील दराने आकारण्यात येईल :-

(क) ए-४ किंवा त्यापेक्षा लहान आकाराच्या कागदावरील प्रत्येक पृष्ठासाठी पाच रुपये;

(ख) मोठ्या आकाराच्या कागदावरील छायाप्रतीचा प्रत्यक्ष खर्च किंवा किंमत;

(ग) नमुने किंवा प्रतिकृती यांचा प्रत्यक्ष खर्च किंवा किंमत;

(घ) डिजिटल / स्कॅन प्रतींच्या प्रत्येक पृष्ठासाठी पाच रुपये;

(ङ) प्रकाशनासाठी निश्चित केलेली किंमत किंवा प्रकाशनातील उताऱ्यांच्या छायाप्रतीसाठी प्रत्येक पृष्ठासाठी पाच रुपये;

(च) अभिलेखाच्या निरीक्षणाकरिता, निरीक्षणाच्या पहिल्या एका तासासाठी कोणतेही शुल्क नसेल आणि त्यानंतरच्या प्रत्येक तासासाठी किंवा त्याच्या भागासाठी पन्नास रुपये शुल्क असेल; आणि

(छ) टपाल आकारासाठी पन्नास रुपये किंवा पन्नास रुपयांपेक्षा अधिक असलेली माहिती पुरविण्यासाठी लागणारा प्रत्यक्ष खर्च.

५. शुल्क प्रदान करण्यातून सूट.-

जी दारिद्र्यरेषेखालील आहे अशा कोणत्याही व्यक्तीकडून नियम ३ व नियम ४ अन्वये कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही, परंतु, या संबंधात समुचित शासनाने, दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत, अर्जासोबत सादर केलेली असावी:

परंतु, जर दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीने मागितलेली माहिती विपुल स्वरूपाची असेल तर, अशा माहितीची पहिली पन्नास पृष्ठे विनामूल्य पुरविण्यात येतील, आणि उर्वरित पृष्ठांसाठी, नियम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने शुल्क आकारण्यात येईल.

६. शुल्क प्रदान करण्याचे मार्ग.-

या नियमांखालील शुल्क, पुढीलपैकी कोणत्याही रीतीने प्रदान करता येईल :-

(१) रीतसर पावती घेऊन सार्वजनिक प्राधिकरणाकडे रोखीने; किंवा

(२) अर्जावर विहित मूल्याचे न्यायालय शुल्क मुद्रांक चिकटवून; किंवा

(ग) सार्वजनिक प्राधिकरणाच्या लेखा अधिकाऱ्याला प्रदेय असलेल्या धनाकर्षाद्वारे किंवा बँक धनादेशाद्वारे किंवा भारतीय टपाल आदेशाद्वारे; किंवा

(घ) "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०-इतर सेवा, ८००-इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६१)" या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली कोषागारात; किंवा

(ङ) ऑनलाईन माहितीचा अधिकार (आरटीआय) अर्जाच्या बाबतीत, इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे किंवा युपीआयद्वारे; किंवा

(च) जर सार्वजनिक प्राधिकरणाकडे इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे शुल्क स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध असेल तर, सार्वजनिक प्राधिकरणाच्या लेखा अधिकाऱ्याकडे इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे किंवा युपीआयद्वारे.

७. विनंती केवळ एकाच विषयाशी संबंधित असावी.-

अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहितीसाठी लेखी स्वरुपात केलेली विनंती, एकाच विषयाशी संबंधित असेल आणि ती साधारणपणे एकशे पन्नास शब्दांपेक्षा अधिक शब्दांची असणार नाही. जर अर्जदाराची एकापेक्षा अधिक विषयावर माहिती मागवण्याची इच्छा असेल तर, तो, त्यासाठी स्वतंत्र अर्ज करील :

परंतु, जर केलेली विनंती एकापेक्षा अधिक विषयांशी संबंधित असेल तर,जन माहिती अधिकारी, केवळ पहिल्या विषयाशी संबंधित असणाऱ्या विनंतीला प्रतिसाद देईल आणि इतर प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र अर्ज करण्याचा सल्ला अर्जदारास देऊ शकेल.

८. अभिलेखाच्या तपासणीची मागणी करण्याची कार्यपद्धती.-

(क) कलम ६ च्या पोट-कलम *(१)* अन्वये अभिलेखाच्या निरीक्षणाच्या मागणीसाठी अर्जदाराने दाखल केलेल्या अर्ज विचारात घेतल्यानंतर, जन माहिती अधिकाऱ्यास तसे योग्य असल्याचे आढळून आले असेल तर, अर्जदारास अभिलेखाचे निरीक्षण करण्याची परवानगी देऊ शकेल आणि जर अशी परवानगी दिली असेल तर, जन माहिती अधिकारी, विभागाच्या संबंधित कक्षाकडून अर्जदारास हवा असलेला अभिलेख त्याला पाहण्यासाठी मागवील आणि कार्यालयीन वेळेत, त्याच्या उपस्थितीत किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीच्या उपस्थितीत तो अभिलेख निरीक्षणासाठी देईल.

(ख) अशा अभिलेखाचे निरीक्षण तपासणी करताना, अर्जदारास केवळ पेन्सिलचाच वापर करण्याची मुभा देण्यात येईल आणि अर्जदारास हवी असलेली माहिती त्याच्याकडून केवळ पेन्सिलनेच नोंदविण्यात येईल; आणि अर्जदाराने पेन्सिलव्यतिरिक्त अन्य कोणतीही लेखन साधने आणलेली असतील तर, तो, ती जन माहिती अधिकाऱ्याकडे जमा करील आणि त्यानंतर त्यास अभिलेखाचे निरीक्षण करण्याची मुभा देण्यात येईल. अर्जदार, त्यास निरीक्षण करताना वापर करण्याची मुभा दिलेल्या पेन्सिलने अभिलेखावर कोणत्याही खुणा करणार नाही.

९. नागरिकत्व सिद्ध करणाऱ्या ओळखपुराव्याची आवश्यकता.-

प्रत्येक अर्जदाराने, अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम *(१)* अन्वये केलेल्या अर्जासोबत छायाचित्र असलेल्या ओळखपुराव्याची स्वयं-साक्षांकित केलेली प्रत जोडणे आवश्यक असेल. जर ओळख पुरावा नसलेला अर्ज प्राप्त झालेला असेल तर, जन माहिती अधिकारी, आवश्यक पालन करण्यासाठी असा अर्ज अर्जदारास परत करू शकेल.

१०. पुन्हा पुन्हा केलेल्या विनंत्या निकालात काढणे.-

जेव्हा अर्जदाराने मागितलेली माहिती, अधिनियमाच्या तरतुदींन्वये त्याच अर्जदाराला यापूर्वी अगोदरच पुरविण्यात आलेली असेल त्याबाबतीत, जन माहिती अधिकारी या पूर्वीच्या पत्रव्यवहाराचा आणि अगोदरच पुरविलेल्या माहितीचा संदर्भ देऊन, असा पुन्हा केलेला विनंती अर्ज निकालात काढू शकेल.

११. स्वतःहोऊन माहिती उघड करण्याची जबाबदारी.-

(क) स्वतःहोऊन माहिती उघड करण्याशी संबंधित असणाऱ्या, या अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम *(१)* च्या खंड *(क)* व खंड *(ख)* मधील तरतुदींचे अनुपालन केल्याची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालय प्रमुखाकडे निहित असेल.

(ख) जेव्हा, या अधिनियमान्वये अर्ज प्राप्त झाल्यावर, जन माहिती अधिकाऱ्याच्या मते मागितलेली माहिती ही, अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये स्वतःहोऊन प्रसिद्ध करण्याची आवश्यकता असलेल्या स्वरूपाची आहे, परंतु, अशा प्रकारे ती प्रसिद्ध करण्यात आलेली नसेल त्या बाबतीत, तो, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार अर्जावर प्रक्रिया करण्याबरोबरच, उचित सुधारात्मक कारवाईकरिता असे अनुपालन न झाल्याचे

संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालय प्रमुखाच्या निदर्शनास आणून देईल.

(ग) उक्त तरतुदींन्वये अनिवार्य असलेली माहिती प्रसिद्ध करण्यातील किंवा स्वतःहोऊन उघड न करण्यातील कसूर ही कर्तव्यच्युती मानण्यात येईल आणि कार्यालय प्रमुखावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल; तो लागू असलेल्या सेवा नियमांनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यास पात्र असेल.

१२. अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असलेली माहिती.-

जेव्हा अर्जदाराने मागितलेली माहिती, शासनाच्या किंवा संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर आधीच उपलब्ध असेल त्या बाबतीत, जन माहिती अधिकारी, अशी माहिती थेट संकेतस्थळावरून मिळविण्यासाठी अर्जदारास कळवील.

जन माहिती अधिकाऱ्यास ऑनलाईन उपलब्ध असलेल्या अशा माहितीचे साक्षांकन करण्यास नकार देण्याचा प्राधिकार देखील असेल.

१३. वैयक्तिक माहितीतून सूट.-

जेव्हा माहिती कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा सार्वजनिक हिताशी संबंधित नसेल तेव्हा, अथवा जेव्हा अशी माहिती उघड केल्यामुळे संबंधित व्यक्तीच्या खाजगी गोष्टींमध्ये विनाकारण हस्तक्षेप होईल तेव्हा या नियमांन्वये व्याख्या केलेली अशी वैयक्तिक स्वरुपाची माहिती या अधिनियमाच्या कलम ८ च्या पोट-कलम *(१)* च्या खंड *(ञ)* अनुसार, उघड करण्यातून सुट असेल:

परंतु, जर व्यापक सार्वजनिक हितामुळे, अशी माहिती उघड करणे समर्थनीय आहे अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, अशी वैयक्तिक माहिती उघड करता येईल आणि अशा खात्रीची कारणे लेखी स्वरूपात नोंदविण्यात येतील:

परंतु आणखी असे की, असे व्यापक सार्वजनिक हित अस्तित्वात असल्याचे सिद्ध करण्याची जबाबदारी, माहिती मागणाऱ्या अर्जदारावर असेल, आणि केवळ सार्वजनिक हिताचे ठाम विधान, पुरेसे असणार नाही.

१४. इलेक्ट्रॉनिक पत्रव्यवहाराची स्वीकार्यता.-

जन माहिती अधिकाऱ्याने ई-मेलद्वारे किंवा इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे केलेला कोणताही पत्रव्यवहार किंवा पुरविलेली माहिती ही, या अधिनियमाअन्वये वैध पत्रव्यवहार किंवा माहितीचे वैध वितरण असल्याचे मानण्यात येईल.

१५. प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अपील.-

(१) राज्य जन माहिती अधिकाऱ्याने संमत केलेल्या आदेशामुळे किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याने तिचा अर्ज निकालात न काढल्यामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, जोडपत्र "**ख**" मध्ये दिलेल्या नमुन्यात, साध्या कागदावर कलम १९ च्या पोट-कलम *(१)* अन्वये प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करू शकेल आणि त्यासोबत नियम ६ मध्ये विहित केलेल्या रीतीने पन्नास रुपये इतके अपील शुल्क प्रदान करील.

(२) प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे केलेले अपील अपीलकर्त्याकडून यथोचितरीत्या अधिप्रमाणित करण्यात येईल व सत्यापित करण्यात येईल आणि त्यासोबत स्वयं-साक्षांकित केलेले पुढील दस्तऐवज जोडण्यात येतील:-

(एक) राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत;

(दोन) राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडून मिळालेल्या उत्तराची प्रत, कोणतीही असल्यास, आणि अर्ज सादर केल्याचा पुरावा;

(तीन) अपिलात निर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांची सूची;

(चार) अपीलकर्त्याने त्याच्या अर्जात निर्दिष्ट केलेल्या आणि तो त्यावर विसंबून असलेल्या इतर दस्तऐवजांच्या प्रती.

१६. राज्य माहिती आयोगाकडे अपील.-

(१) राज्य माहिती आयोगाकडे कलम १९ च्या पोट-कलम *(३)* अन्वये केलेले अपील, जोडपत्र "**ग**" मध्ये दिलेल्या नमुन्यात, साध्या कागदावर दाखल करण्यात येईल आणि त्यासोबत, नियम ६ मध्ये विहित केलेल्या रीतीने शंभर रुपये इतके अपील शुल्क प्रदान करण्यात येईल.

(२) राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील, अपीलकर्त्याकडून यथोचितरीत्या प्रमाणित करण्यात येईल व सत्यापित करण्यात येईल आणि त्यासोबत, खालील स्वयं-साक्षांकित केलेले पुढील दस्तऐवज जोडण्यात येतील:-

(एक) *(अ)* राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत;

(ब) अर्जामध्ये निर्दिष्ट केलेल्या किंवा त्यावर विसंबून असलेल्या दस्तऐवजांच्या प्रती;

(दोन) संबंधित राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज सादर केल्याचा

पुरावा;

(तीन) संबंधित राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडून मिळालेल्या उत्तराची प्रत, कोणतीही असल्यास;

(चार) प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे केलेल्या अपिलाची प्रत;

(पाच) प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अपील सादर केल्याचा पुरावा;

(सहा) प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे मिळालेल्या आदेशाची मूळ प्रत, कोणतीही असल्यास;

(सात) अपिलात निर्दिष्ट केलेल्या आणि अपीलकर्ता त्यावर विसंबून असलेल्या दस्तऐवजांची सूची; आणि

(आठ) अपीलकर्त्याने त्याच्या अपिलात निर्दिष्ट केलेल्या आणि तो त्यावर विसंबून असलेल्या इतर दस्तऐवजांच्या प्रती.

(३) राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील साध्या कागदावर नीटनेटके व सुवाच्यपणे लिहिलेले, टंकलिखित केलेले किंवा मुद्रित केलेले असावे आणि अपील व त्यासोबत सादर करावयाचे दस्तऐवज, प्रतिवादींसाठी प्रतींच्या तीन संचांमध्ये दाखल करण्यात येतील.

१७. अपील परत करणे.-

जर नियम १५ चा पोट-नियम *(२)* आणि नियम १६ चे पोट-नियम *(२)* किंवा पोट-नियम *(३)* यांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अपिलासोबत दस्तऐवज जोडलेले नसतील अथवा आयोगाच्या अधिकाऱ्याला अन्य कोणतीही त्रुटी आढळून आली असेल तर, अपीलकर्त्यास त्रुटी दूर करण्यासाठी असे अपील, परत करता येईल आणि त्यास त्रुटी दूर करण्याची विनंती करणारे पत्र मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत सर्वदृष्टीने परिपूर्ण असलेले अपील दाखल करण्यास कळविण्यात येईल:

परंतु, जेव्हा अधिनियमात विहित केलेल्या कालावधीत, राज्य जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर किंवा प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचा आदेश प्राप्त न झाल्यास, या नियमान्वये त्या कारणास्तव अपील परत केले जाणार नाही.

१८. आयोगाकडे अपील करण्याची प्रक्रिया.-

(१) जर अपील हे, या अधिनियमाच्या, नियमांच्या व विनियमांच्या तरतुदींनुसार आहे, असे

आयोगाच्या अधिकाऱ्यास असे दिसून आले तर, त्या अपिलास क्रमांक देण्यात येईल आणि त्या प्रयोजनाकरिता ठेवलेल्या नोंदवहीत त्याची नोंद करण्यात येईल आणि, अपिलाच्या संदर्भासह त्याच्याशी संबंधित असणाऱ्या सर्व दस्तऐवजांच्या प्रतींसह लेखी निवेदन किंवा अहवाल, निर्देश देणारे पत्र मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत, सादर करण्यासाठी जन माहिती अधिकाऱ्यास व प्रथम अपिलीय प्राधिकरणास, निर्देश देईल. अहवाल प्राप्त झाल्यावर किंवा उपरोक्त कालावधीत अहवाल प्राप्त न झाल्यास, अपिलाच्या सुनावणीची तारीख निश्चित केली जाऊ शकेल.

(२) आयोग या अधिनियमान्वये अपीलकर्त्याला उपलब्ध असलेल्या सर्व उपायांचा त्याने अवलंब केला आहे अशी त्याची खात्री पटली नसेल तर, अपिलाचा विचार करणार नाही.

(३) पोट-नियम *(२)* च्या प्रयोजनार्थ,-

(क) जर एखाद्या व्यक्तीने प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल केले असेल आणि प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने त्यावर अंतिम आदेश दिलेला असेल तर; किंवा

(ख) जेव्हा दाखल केलेल्या अपिलाच्या संबंधात प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने कोणताही अंतिम आदेश दिलेला नसेल आणि ज्या तारखेस त्याला असे अपील प्राप्त झाले असेल त्या तारखेपासून पंचेचाळीस दिवसांचा कालावधी उलटला असेल त्याबाबतीत, या अधिनियमान्वये तिला उपलब्ध असलेल्या सर्व उपायांचा अवलंब केला आहे असे मानण्यात येईल.

१९. अपिलाची किंवा तक्रारीची नोटीस.-

(१) आयोग, संबंधित व्यक्तींना अपिलाची किंवा तक्रारीची नोटीस, खालीलपैकी कोणत्याही मार्गाने बजावू शकेल:-

(क) हातबटवड्याने;

(ख) नोंदणीकृत डाकेने, शीघ्र डाकेने, डाक प्रमाणपत्र घेऊन, कुरियरद्वारे किंवा तत्सम इतर साधनांद्वारे;

(ग) ई-मेल पत्ता उपलब्ध असेल तर, ई-मेलद्वारे; किंवा कोणत्याही संदेश प्रणालीने भ्रमणध्वनीद्वारे;

(घ) वृत्तपत्रात प्रसिद्ध करून; किंवा

(ङ) मुख्य माहिती आयुक्त, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल अशा अन्य कोणत्याही रीतीने.

(२) पोट-नियम *(१)* खाली नमूद केलेल्या रीतीपैकी कोणत्याही रीतीने बजावलेली नोटीस, नोटिशीची वैध बजावणी असल्याचे मानण्यात येईल.

२०. अपीलकर्त्याची किंवा तक्रारदाराची व्यक्तीश: उपस्थिती.-

(१) अपीलकर्त्यास किंवा, यथास्थिति, तक्रारदारास प्रत्येक प्रकरणात, सुनावणीच्या तारखेपूर्वी किमान सात स्पष्ट दिवस अगोदर सुनावणीच्या तारखेची नोटीस देण्यात येईल.

(२) अपीलकर्त्यास किंवा तक्रारदारास किंवा प्रतिवादीस अपिलाच्या किंवा तक्रारीच्या सुनावणीवेळी स्वतः किंवा त्याच्या यथोचित प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीमार्फत आयोगाकडे उपस्थित राहण्याचा स्वेच्छाधिकार असेल:

परंतु, अपीलकर्त्यास किंवा तक्रारदारास किंवा प्रतिवादीस जर सुनावणीच्या तारखेपूर्वी दोन दिवस अगोदर त्याचे सर्व संबंधित दस्तऐवज सादर केलेले असतील आणि सुनावणीच्या वेळी आयोगाकडे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगची सुविधा उपलब्ध असेल तर, व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्याचे प्रकरण सादर करता येईल.

(३) अपीलकर्त्यास किंवा, यथास्थिति, तक्रारदारास, त्याचे मुद्दे मांडते वेळी, त्याकरिता तरतूद केलेल्या रीतीने, अपिलाच्या प्रक्रियेत कोणत्याही व्यक्तीचे सहाय्य घेता येईल आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधि व्यवसायी असणार नाही.

२१. अपील निकालात काढण्याची प्रक्रिया.-

(१) आयोग, अपील निकालात काढताना,-

(एक) संबंधित किंवा हितसंबंधित व्यक्तीकडून शपथेवर किंवा प्रतिज्ञापत्रावर तोंडी किंवा लेखी पुरावा घेऊ शकेल;

(दोन) दस्तऐवज, सार्वजनिक अभिलेख किंवा त्यांच्या प्रतींचे अवलोकन करू शकेल किंवा तपासणी करू शकेल;

(तीन) प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत अधिक तपशिलांची किंवा तथ्यांची चौकशी करू शकेल;

(चार) राज्य जन माहिती अधिकाऱ्याची, राज्य सहायक जन माहिती

अधिकाऱ्याची किंवा प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याची किंवा यथास्थिति, ज्या व्यक्तीच्या कारवाईविरुद्ध अपील दाखल आहे अशा व्यक्तीची सुनावणी घेऊ शकेल;

(पाच) त्रयस्थ पक्षाची सुनावणी घेऊ शकेल; किंवा

(सहा) राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडून, राज्य सहायक जन माहिती अधिकाऱ्याकडून, प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडून आणि ज्या व्यक्तीविरुद्ध अपील दाखल केलेले आहे अशा अन्य व्यक्तीकडून, किंवा त्रयस्थ पक्षाकडून किंवा अर्जाशी संबंधित असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीकडून प्रतिज्ञापत्रावर पुरावा घेऊ शकेल.

(२) अपीलकर्त्यास किंवा, यथास्थिति, तक्रारदारास ज्या परिस्थितीमुळे आयोगाच्या सुनावणीस उपस्थित राहण्यास प्रतिबंध झाला आहे ती परिस्थिती अस्तित्वात आहे अशी आयोगाची खात्री पटली असेल त्याबाबतीत, आयोग, अंतिम निर्णय घेण्यापूर्वी अपीलकर्त्यास किंवा, यथास्थिति, तक्रारदारास सुनावणीची आणखी एक संधी देऊ शकेल किंवा त्याला योग्य वाटेल तशी अन्य कोणतीही कारवाई करू शकेल.

(३) जेव्हा अपीलकर्ता किंवा, यथास्थिति, तक्रारदार, द्वितीय अपील किंवा तक्रार सुनावणीसाठी आली असेल तेव्हा, वारंवार वैयक्तिकरीत्या किंवा ऑनलाईन स्वरुपात उपस्थित राहत नसेल त्याबाबतीत, आयोग, कारणे नोंदवून, नागरी प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या आदेश ४१ च्या नियम १७ च्या तरतुदी लागू करू शकेल आणि खटला न चालविल्यामुळे अपील किंवा तक्रार फेटाळण्यात येत आहे असा आदेश देऊ शकेल:

परंतु, जेव्हा या पोट-नियमान्वये अपील किंवा तक्रार, खटला न चालविल्यामुळे फेटाळण्यात आली असेल, त्याबाबतीत अपीलकर्ता किंवा तक्रारदार, फेटाळण्याचा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, फेटाळण्याचा निर्णय रद्द करण्यासाठी अर्ज करू शकेल, आणि अपीलकर्त्याने किंवा तक्रारदाराने, त्याच्या अनुपस्थितीसाठी पुरेसे कारण होते याबाबत आयोगाची खात्री पटवून दिली असेल तर, आयोग, फेटाळण्याचा निर्णय रद्द करण्याचा आदेश देऊ शकेल आणि अपील किंवा तक्रार पुढे चालविण्यासाठी दिवस नियत करू शकेल:

परंतु आणखी असे की, विरोधी पक्षाला त्याची नोटीस बजावल्याशिवाय,

उपरोक्तप्रमाणे अशा कोणत्याही अर्जावरून निर्णय रद्द करण्याचा आदेश देण्यात येणार नाही.

(४) पोट-नियम *(३)* मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा माहिती नाकारण्याशी संबंधित असणारा सारभूत प्रश्न अंतर्भूत आहे, असे आयोगाचे मत असेल त्या बाबतीत, आयोग, उपलब्ध असलेल्या अभिलेखाच्या आधारे प्रकरण निकालात काढण्याची कार्यवाही करू शकेल.

(५) या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, आयोगाला, द्वितीय अपिलाच्या बाबतीत, अपीलकर्त्याच्या उपस्थितीची पर्वा न करता, अधिनियमान्वये आवश्यक असेल तेव्हा, अभिलेख मागविण्यापासून किंवा माहिती उघड करण्याचा निर्देश देण्यापासून प्रतिबंध होणार नाही.

२२. पुराव्याचा भार.-

(१) या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीज करून, आयोगासमोरील अपिलाच्या किंवा तक्रारीच्या बाबतीत, पुराव्याचा भार, तथ्य ठामपणे प्रतिपादन करणाऱ्या पक्षावर असेल.

(२) कलम १८ खालील तक्रारीत किंवा कलम १९ खालील अपिलात,-

(क) तक्रारदार किंवा अपीलकर्ता, माहिती नाकारणे, विलंब करणे, किंवा चुकीची माहिती देणे अथवा त्यात नमूद केलेले अन्य कोणतेही कारण शाबित व सिद्ध करील;

(ख) राज्य जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी किंवा, यथास्थिति, सार्वजनिक प्राधिकरण कलम १९ च्या पोट-कलम *(५)* नुसार त्यांच्या कारवाईचे समर्थन करील.

(३) आयोग, अभिलेखावर ठेवलेली वादकथने, युक्तिवाद व पुरावा या आधारे केवळ प्रकरणांवर निर्णय घेईल.

२३. अपील मागे घेणे किंवा अपील रद्द होणे.-

(१) राज्य माहिती आयोग, अपीलकर्त्याने केलेल्या लेखी विनंतीवरून, अपील मागे घेण्यास परवानगी देऊ शकेल:

परंतु, जेव्हा सुनावणीची नोटीस जारी केल्यानंतर, अपीलकर्त्याने केलेली लेखी

विनंती आयोगाला मिळाली असेल, त्या बाबतीत, आयोग, आयोगाची संसाधने व खर्च वाया घालविल्याबद्दल अपीलकर्त्याने प्रदान करावयाचा वाजवी खर्च लादू शकेल आणि जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे त्याची वसुली करू शकेल.

(२) माहितीचा अधिकार हा केवळ माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या भारताच्या विशिष्ट अर्जदार नागरिकासाठी उपलब्ध असल्याने, अशा व्यक्तीने दाखल केलेल्या द्वितीय अपिलाच्या बाबतीत राज्य माहिती आयोगासमोर प्रलंबित असलेली कार्यवाही, अपीलकर्ता मृत झाला आहे असा पुरावा प्रतिवादी सादर करतो तेव्हा किंवा आयोगाने त्याच्याकडे उपलब्ध असलेल्या नोंदीच्या आधारे अशा निष्कर्ष काढलेला असेल तेव्हा, अपीलकर्त्याचा मृत्यू झाल्यावर रद्द होईल.

२४. राज्य माहिती आयोगाचा आदेश.-

राज्य माहिती आयोगाचा आदेश, लेखी स्वरूपात असेल आणि आयोगाने या प्रयोजनार्थ प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने रीतसर अधिप्रमाणित केलेल्या आयोगाच्या शिक्क्यानिशी देण्यात येईल.

२५. तक्रारीची कार्यपद्धती.-

वरील १७ ते २४ या नियमांच्या तरतुदी, कलम १८ अन्वये आयोगासमोर दाखल केलेल्या तक्रारींच्या बाबतीत, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

२६. आयोगाचे अंतर्निहित प्रक्रियात्मक अधिकार.-

(१) या नियमांमधील कोणत्याही गोष्टीमुळे, आयोग, या अधिनियमाच्या कलम १८ अन्वये चौकशी करत असताना किंवा कलम १९ च्या पोट-कलम *(३)* अन्वये द्वितीय अपील निकालात काढत असताना, सर्व पक्षकारांना सुनावणीची वाजवी संधी दिल्यानंतर, न्यायाचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी किंवा आयोगाच्या प्रक्रियेचा गैरवापर रोखण्यासाठी आवश्यक असतील असे, या अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत असलेले आनुषंगिक किंवा सहायक प्रक्रियात्मक आदेश, पारित करण्याच्या राज्य माहिती आयोगाच्या अधिकारांवर मर्यादा आल्याचे मानण्यात येणार नाही.

(२) आयोग, कोणत्याही वेळी, एकतर स्वतःहून किंवा कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून, कलम १८ खालील तक्रारीशी किंवा कलम १९ च्या पोट-कलम *(३)* खालील द्वितीय अपिलाशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही आदेशात किंवा अभिलेखात चुकीने किंवा अपघाताने झालेली

	कोणतीही लिपिकीय किंवा अंकगणितीय चूक अथवा त्रुटी दुरुस्त करू शकेल. *(३)* जेव्हा पोट-नियम *(२)* अन्वये कोणतीही दुरुस्ती केली जाते त्या बाबतीत, दुरुस्त आदेशाची प्रत, संबंधित पक्षकारांना कळविण्यात येईल आणि आयोगाच्या संकेतस्थळावर टाकण्यात (अपलोड) करण्यात येईल. **२७. सार्वजनिक प्राधिकरणाद्वारे सादरीकरण.-** सार्वजनिक प्राधिकरण, त्याची बाजू मांडण्यासाठी कोणत्याही प्रतिनिधीस किंवा त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत करू शकेल. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने, डॉ. अतुल पाटणे शासनाचे प्रधान सचिव.

जोडपत्र "क"

(नियम ३ पहा)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळविण्याच्या अर्जाचा नमुना

प्रति,

राज्य जन माहिती अधिकारी,

(कार्यालयाचे नाव व पत्ता)

१)	अर्जदाराचे पूर्ण नाव -	
२)	अर्जदाराचा पत्ता -	
३)	भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी -	
४)	आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील -	
५)	माहिती मागण्याचे प्रयोजन-	
६)	माहितीचा विषय - (केवळ १५० शब्दांचा वापर करावा)	
७)	माहिती ज्या कालावधीशी संबंधित आहे तो कालावधी -	
८)	आवश्यक माहिती मिळण्याचा मार्ग - (व्यक्तिश:/ नोंदणीकृत डाकेने / ई-मेलने /वैयक्तिक पेनड्राईव्हमध्ये / ऑनलाईन आरटीआयच्या बाबतीत ऑनलाईन पोर्टलद्वारे)	
९)	अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे — (असल्यास, त्याच्या पुराव्याची छायाप्रत जोडा)	
१०)	ओळख पुरावा - (नागरिकत्व सिद्ध करणारा)	

दिनांक :-

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी.

जोडपत्र "ख"

(नियम १३ पहा)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) अन्वये अपील

प्रति,

(अपिलीय प्राधिकाऱ्याचे नाव/पदनाम/पत्ता)

१	अपीलकर्त्याचे पूर्ण नाव -	
२	अपीलकर्त्याचा पत्ता -	
३	भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी -	
४	अर्जावर उत्तर दिलेल्या राज्य जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व पत्ता -	
५	अर्जाचा तपशील -	
६	ज्या आदेशाविरुद्ध अपील करावयाचे आहे त्या आदेशांचा तपशील, कोणतेही असल्यास, क्रमांकासह.	
७	प्रार्थना किंवा मागितलेला दिलासा -	
८	प्रार्थनेची किंवा दिलाशाची कारणे -	
९	अपिलाशी संबंधित असणारी कोणतीही अन्य माहिती-	
१०	ओळख पुरावा - (नागरिकत्व सिद्ध करणारा)	

दिनांक :-

ठिकाण :- अपीलकर्त्याची स्वाक्षरी.

जोडपत्र "ग"

(नियम ५ (२) पहा)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील

प्रति,

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,

----------येथील खंडपीठ

पत्ता : ----------

(१) अपीलकर्त्याचे पूर्ण नाव:

(२) पत्ता:

(३) अपीलकर्त्याचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल पत्ता:

(४) अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे (असल्यास, त्याच्या वैध पुराव्याची छायाप्रत जोडावी.):

(५) संबंधित राज्य जन माहिती अधिकाऱ्याचा तपशील व पत्ता:

(६) संबंधित प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचा तपशील व पत्ता:

(७) जर अपीलकर्ता त्रयस्थ पक्ष असेल तर, मूळ अर्जदाराचे नाव व पत्ता:

(८) माहिती मागणाऱ्या अर्जाचा तपशील -

(क) अर्जाचा दिनांक:

(ख) माहितीचा तपशील -

(एक) माहितीचा विषय:

(दोन) माहिती ज्या कालावधीशी संबंधित आहे तो कालावधी:

(तीन) आवश्यक असलेल्या विशिष्ट माहितीचे वर्णन:

(ग) माहिती डाकेने किंवा व्यक्तिश: हवी आहे किंवा कसे:

(घ) डाकेने हवी असल्यास (सर्वसाधारण / नोंदणीकृत / शीघ्र डाकेने):

(ङ) अर्ज (जोडपत्र-क) सहायक जन माहिती अधिकाऱ्यास दिलेला आहे किंवा कसे:

(च) सहायक जन माहिती अधिकाऱ्यास अर्ज मिळाल्याचा दिनांक:

(छ) जन माहिती अधिकाऱ्यास अर्ज मिळाल्याचा दिनांक:

(ज) जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक:

(झ) जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर मिळाल्याचा दिनांक: होय/नाही

(९) प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे केलेल्या प्रथम अपिलाचा तपशील -

(क) प्रथम अपिलाचा दिनांक:

(ख) प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यास प्रथम अपील मिळाल्याचा दिनांक:

(ग) प्रथम अपील (जोडपत्र-ख) सहायक जन माहिती अधिकाऱ्यास दिलेले आहे किंवा कसे: होय/नाही

(घ) अर्जदाराला प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचा आदेश मिळाल्याचा दिनांक:

(१०) अपील दाखल करण्याची शेवटची तारीख:

(११) अपिलाची कारणे:

(१२) प्रार्थना किंवा मागितलेला दिलासा:

(१३) प्रार्थनेची किंवा दिलाशाची कारणे:

(१४) (अ) सुनावणीस व्यक्तिश: उपस्थिती: होय/नाही

(ब) (एक) सुनावणीस ऑनलाईन उपस्थिती: होय/नाही

(दोन) असल्यास, ऑनलाईन सुनावणीसाठी ई-मेल पत्ता किंवा भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा:

(१५) कलम १८ अन्वये दाखल केलेल्या तक्रारीचा तपशील, कोणताही असल्यास:

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची स्वाक्षरी.

सत्यापन

मी, _____(अपीलकर्त्याचे नाव), ---------- यांचा/ यांची मुलगा/मुलगी/पत्नी, राहणार(पत्ता) _____ याद्वारे असे घोषित करतो/करते की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहे आणि मी, याच अर्जाच्या संबंधात राज्य माहिती आयोगाकडे कलम १९ (३) अन्वये कोणतेही द्वितीय अपील दाखल केलेले नाही आणि मी कोणतेही महत्त्वाचे तथ्य लपवले नाही.

ठिकाण :

दिनांक : अपीलकर्त्याची स्वाक्षरी.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
१९वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

क्र.साप्रवि-१२०२०/४/२०२५-साप्रवि/कार्या-६ दिनांक: १२ जून,२०२६

प्रति,

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय,
चर्नी रोड, मुंबई - ४०० ०३२.

विषय- महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ ची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबत...

(6)	Subject matter of information - (Use only 150 words)	
(7)	The period to which the information relates -	
(8)	Mode of required information - (In person / by registered post / by e-mail / in personal pen drive / through Online Portal-in case of online RTI)	
(9)	Whether the applicant is below poverty line - (If yes, attach the photo copy of the proof thereof)	
(10)	Proof of Identity-	

Date:-

Place :- Signature of the Applicant.

ANNEXURE "B"

(See Rule 15)

Appeal under under section 19 (1) of the Right to Information Act, 2005

To,

(Name/designation/address of the appellate authority)

1	Full name of the Appellant -	
2	Address of the Appellant -	
3	Mobile No & Email-id	
4	Name and address of the State Public Information Officer who gave reply to the Application -	
5	Particulars of the Application	
6	Particulars of the orders including number, if any, against which the appeal is preferred-	
7	Prayer or relief Sought	
8	Grounds for the prayer or relief -	
9	Any other information relevant to the appeal	
10	Proof of Identity- (proving citizenship)	

Date:-

Place :- Signature of the Appellant.

"ANNEXURE 'C"

(See rule 16)

Second Appeal under section 19 (3) of the Right to Information Act, 2005.

To,

Maharashtra State Information Commission,

Bench at ----------

Address:----------

(1) Full name of the Appellant :

(2) Address :

(3) Mobile number and Email address of Appellant :

(4) Whether the applicant is below poverty line

(if yes, attach the photocopy of the valid proof thereof.) :

(5) Particulars of concerned State Public Information Officer with address :

(6) Particulars of the concerned First Appellate Authority with address :

(7) Name and Address of the original Applicant, if appellant is Third Party :

(8) Details of the Application seeking information-

(*a*) Date of Application :

(*b*) Particulars of information- :

(*i*) Subject matter of information. :

(*ii*) The period to which the information relates :

(*iii*) Description of the Specific information required :

(*c*) Whether information is required by post or in person :

(*d*) In case by post (Ordinary, Registered or Speed) :

(*e*) Whether Application (Annexure-A) is given to Assistant Public Information Officer :

(*f*) Date of receipt of the Application by the Assistant Public Information Officer :

(*g*) Date of receipt of the Application by the Public Information Officer :

(*h*) Date of reply of the Public Information Officer :

(*i*) Date of receipt of reply of the Public Information Officer : Yes/No

(9) Details of the First Appeal to the First Appellate Authority-

(*a*) Date of First Appeal

(*b*) Date of receipt of the First Appeal by the First Appellate Authority

(*c*) Whether First Appeal (Annexure-B) is given to Assistant Public Information Officer : Yes/No

(*d*) The date of receipt of order of First Appellate Authority by Applicant :

(10) Last date for filing the appeal :

(11) The grounds for appeal :

(12) Prayer or relief sought :

(13) Grounds for prayer/relief sought for :

(14) (a) Personal Presence at hearing:- Yes/No

(b) (i) Online Presence at hearing:- Yes/No

(ii) If yes mention here email address or mobile number for online hearing:

(15) Details of complaint filed under section 18, if any :

Place :

Date : Signature of the Appellant.

Verification

I,_____ (Name of the appellant), son of / daughter of / wife of _____ resident of _____ (address) hereby declare that the Information as provided above is true to the best of my knowledge and no second Appeal under section 19 (3) is filed before the State Information Commission regarding the same application and that I have not suppressed any material fact.

Place :

Date : Signature of the Appellant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. ATUL PATNE,
Principal Secretary to the Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे ;

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे ;

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे ;

(चार) डिस्केट्, फ्लॉपी, टेप, व्हीडिओ कॅसेट या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिन्टआऊट) मार्फत माहिती मिळविणे ; यांबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो;

(ट) " राज्य माहिती आयोग " याचा अर्थ, कलम १५ च्या पोटकलम (१) अन्वये घटित केलेला राज्य माहिती आयोग, असा आहे ;

(ठ) " राज्य मुख्य माहिती आयुक्त " आणि " राज्य माहिती आयुक्त " याचा अर्थ, कलम १५ च्या पोटकलम (३) अन्वये नियुक्त केलेला राज्य मुख्य माहिती आयुक्त आणि राज्य माहिती आयुक्त, असा आहे ;

(ड) " राज्य जन माहिती अधिकारी " याचा अर्थ, पोट-कलम (१) अन्वये पदनिर्देशित केलेला राज्य जन माहिती अधिकारी, असा आहे आणि त्यामध्ये, कलम ५ च्या पोटकलम (२) अन्वये अशाप्रकारे पदनिर्देशित केलेल्या राज्य सहायक जन माहिती अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(ढ) " त्रयस्थ पक्ष " याचा अर्थ, माहिती मिळण्याची विनंती करणारी नागरिकाव्यतिरिक्त अन्य एखादी व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, सार्वजनिक प्राधिकरणाचा समावेश होतो.

प्रकरण दोन

माहितीचा अधिकार आणि सार्वजनिक प्राधिकरणांवरील आबंधने

माहितीचा अधिकार.

३. या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, सर्व नागरिकांना माहितीचा अधिकार असेल.

सार्वजनिक प्राधिकरणांवरील आबंधने.

४. (१) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण,—

(क) या अधिनियमान्वये देण्यात आलेला माहितीचा अधिकार मिळणे सोईचे होईल अशा रीतीने आणि स्वरूपात सर्व अभिलेख योग्य रीतीने सूचिबद्ध करील आणि त्याची निर्देशसूची तयार करील आणि ज्याचे संगणकीकरण करणे योग्य आहे, अशा सर्व अभिलेखांचे वाजवी कालावधीत आणि साधनसंपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगणकीकरण केले जात आहे याची आणि असे अभिलेख पाहावयास मिळणे सोयीचे व्हावे म्हणून संपूर्ण देशातील विविध प्रणालींमध्ये नेटवर्कमार्फत ते जोडले जात आहेत, याची खातरजमा करील.

(ख) हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून एकशेवीस दिवसांच्या आत,—

(एक) आपली रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील ;

(दोन) आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये ;

(तीन) निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली ;

(चार) स्वतःची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविण्यात आलेली मानके ;

(पाच) त्याच्याकडे असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारीवर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख ;

(सहा) त्याच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गांचे विवरण ;

(सात) आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील ;

File No. GAD-12020/4/2025-GAD(DESK-6)-GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT (Computer No. 1421575)

(आठ) आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळांचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण; आणि त्या मंडळांच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकींची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण ;

(नऊ) आपल्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची निर्देशिका ;

(दहा) आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन ; तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्याची पद्धती ;

(अकरा) सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रकमांचा अहवाल :

(बारा) अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिकाऱ्यांचा तपशील ;

(तेरा) ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील ;

(चौदा) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील ;

(पंधरा) माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील ;

(सोळा) जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील ;

(सतरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती ;

प्रसिद्ध करील आणि त्यानंतर दरवर्षी ती प्रकाशने अद्ययावत करील ;

(ग) ज्यामुळे लोकांना बाधा पोहोचते अशी महत्त्वाची धोरणे आखताना आणि असे निर्णय जाहीर करताना सर्व संबंधित वस्तुस्थिती प्रसिद्ध करील ;

(घ) आपल्या प्रशासनिक किंवा न्यायिकवत् निर्णयांबाबतची कारणे बाधित व्यक्तींना कळवील.

(२) माहिती मिळवण्यासाठी लोकांना या अधिनियमाचा कमीतकमी आधार घ्यावा लागावा यासाठी, नियमित कालांतराने, लोकांना इंटरनेटसह, संपर्काच्या विविध साधनांद्वारे, स्वतःहून माहिती पुरविण्यासाठी, पोटकलम (१) च्या खंड (ख) च्या आवश्यकतांनुसार उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण सतत प्रयत्नशील राहील.

(३) पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी, प्रत्येक माहिती, विस्तृत प्रमाणात आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल अशा स्वरूपात आणि अशा रीतीने प्रसारित करण्यात येईल.

(४) पुरेपूर मोबदला देणारा खर्च, स्थानिक भाषा आणि त्या स्थानिक भागातील संपर्काची सर्वात प्रभावी पद्धती या बाबी विचारात घेऊन, सर्व माहिती प्रसारित करण्यात येईल आणि यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडे, शक्यतो इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ती माहिती मोफत किंवा विहित करण्यात येईल इतक्या माध्यमाच्या खर्चाएवढ्या किंवा मुद्रणाच्या खर्चाएवढ्या किंमतीला सहजपणे उपलब्ध असावी.

स्पष्टीकरण.—पोटकलम (३) आणि (४) च्या प्रयोजनार्थ, " प्रसारित " याचा अर्थ, सूचनाफलक, वृत्तपत्रे, जाहीर घोषणा, प्रसारमाध्यमांकडून ध्वनिक्षेपण, इंटरनेट यांच्याद्वारे किंवा कोणत्याही अन्य मार्गाने लोकांना माहिती करून देणे किंवा कळविणे, तसेच कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयाची पाहणी करू देणे, असा आहे.

RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ७६] शुक्रवार, जून १९, २०२६/ज्येष्ठ २९, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक २३८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ जून, २०२६.

अधिसूचना

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५.

क्रमांक साप्रवि-१२०२०/४/२०२५/साप्रवि-माहिती-कार्या-६.— माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) याच्या कलम १८ च्या पोट-कलम (३) च्या खंड (च), कलम १९ चे पोट-कलम (१०) आणि कलम २७ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ यामध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेः—

१. या नियमांस, महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम, २०२६, असे म्हणावे.

२. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ यामध्ये, **"जोडपत्र "क"** या ऐवजी, पुढील "जोडपत्र" दाखल करण्यात येईल :—

File No. GAD-12020/4/2025-GAD(DESK-6)-GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT (Computer No. 1421575)

जोडपत्र "क"

(नियम ३ पहा)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळविण्याच्या अर्जाचा नमुना

प्रति,

राज्य जन माहिती अधिकारी,

(कार्यालयाचे नाव व पत्ता)

(१)	अर्जदाराचे पूर्ण नाव -	
(२)	अर्जदाराचा पत्ता -	
(३)	भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी -	
(४)	आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील -	
(५)	माहितीचा विषय - (केवळ १५० शब्दांचा वापर करावा)	
(६)	माहिती ज्या कालावधीशी संबंधित आहे तो कालावधी -	
(७)	आवश्यक माहिती मिळण्याचा मार्ग - (व्यक्तिशः/ नोंदणीकृत डाकेने / ई-मेलने /वैयक्तिक पेनड्राईव्हमध्ये / ऑनलाईन आरटीआयच्या बाबतीत ऑनलाईन पोर्टलद्वारे)	
(८)	अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे – (असल्यास, त्याच्या पुराव्याची छायाप्रत जोडा)	
(९)	ओळख पुरावा - (नागरिकत्व सिद्ध करणारा)	

दिनांक :-

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. अतुल पाटणे,
शासनाचे प्रधान सचिव.

GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 19th June, 2026.

NOTIFICATION

RIGHT TO INFORMATION ACT, 2005.

No. GAD/12020/4/2025-GAD-DESK-6.— In exercise of the powers conferred by clause (*f*) of sub-section (*3*) of section 18, sub section (*10*) of section 19 and sub-section (*2*) of section 27 of the Right to Information Act, 2005 (22 of 2005) and of all other powers enabling in this behalf, the Government of Maharashtra is hereby pleased to make the following rules to amend the Maharashtra Right to Information Rules, 2026, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Right to Information (Amendment) Rules, 2026.

2. In the Maharashtra Right to Information Rules, 2026, for **"ANNEXURE "A" "** the following "ANNEXURE" shall be substituted, namely :—

"ANNEXURE "A"

(*See* Rule 3)

Format of application for obtaining information under the Right to Information Act, 2005

To,

The State Public Information Officer,

(Name of the office with address)

(1)	Full name of the Applicant -	
(2)	Address of the Applicant -	
(3)	Mobile No. & Email-id -	
(4)	Particulars of information required -	
(5)	Subject matter of information - (Use only 150 words)	
(6)	The period to which the information relates -	
(7)	Mode of required information - (In person / by registered post / by e-mail / in personal pen drive / through Online Portal-in case of online RTI)	
(8)	Whether the applicant is below poverty line - (If yes, attach the photo copy of the proof thereof)	
(9)	Proof of Identity-	

Date :—

Place :— Signature of the Applicant.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. ATUL PATNE,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
19 वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-400 032.

क्रमांक: साप्रवि- 12020/04/2025-साप्रवि(कक्ष-6) दिनांक:- 22 जून 2026

प्रति,
भाषा संचालक,
भाषा संचालनालय,
प्रशासकीय इमारत, पाचवा मजला, डॉक्टर आंबेडकर उद्यानाजवळ,
शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई – 400051.

विषय : महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2026 यांच्या मराठी भाषेतील प्रारूपाची तपासणी करण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम 2026 मधील इंग्रजी भाषेतील नियम २०(३) खालील प्रमाणे आहे.

(3) The appellant or the complainant, as the case may be, may seek the assistance of any person in the process of the appeal, in the manner as may be provided therefor, while presenting his points and the person representing him may not be a legal practitioner.

सदर नियमाचे मराठी भाषांतर आपणाकडून खालील प्रमाणे प्राप्त झाले आहे.

(३) अपीलकर्त्यास किंवा, यथास्थिति, तक्रारदारास, त्याचे मुद्दे मांडते वेळी, त्याकरिता तरतूद केलेल्या रीतीने, अपिलाच्या प्रक्रियेत कोणत्याही व्यक्तीचे सहाय्य घेता येईल आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधि व्यवसायी असणार नाही.

सदर नियमातील शेवटची ओळ ,"**आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधी व्यवसायी असण्याची आवश्यकता नाही** " असे असणे आवश्यक आहे अशी या विभागाची धारणा आहे.

वरील भाषांतरामुळे चुकीचा अर्थ काढला जाऊन शासनावर टीका होत आहे. तरी सदर भाषांतराची पुन्हा एकदा तपासणी करून विभागाची धारणा पक्की करावी किंवा सुधारित भाषांतर उपलब्ध करून द्यावे अशी विनंती आहे.

आपला
(शंकरराव कुटे)
कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
भाषा संचालनालय
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत,
५ वा मजला, डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

ईमेल :- director.dol-mh@gov.in bhashasanchalak@yahoo.in

क्र. विधि/६५-२०२६/कार्या.८अ/७६६ दि. २३/०६/२०२६

प्रति,
कक्ष अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग,
१९ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.

विषय : महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ यांच्या मराठी भाषेतील प्रारूपाची तपासणी...

संदर्भ : क्रमांक.साप्रवि-१२०२०/४/२०२५-(कक्ष-६), दि. २२ जून, २०२६ चे आपले पत्र.

महोदय,

संदर्भित पत्रान्वये महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ च्या नियम २० (३) च्या इंग्रजी मजकुराचा मराठी अनुवाद पुन्हा तपासून देण्याची विनंती केलेली होती. नियम २० (३) च्या इंग्रजी मजकुराची पुनःपडताळणी केली असता, कायदेविषयक अनुवादाच्या शैलीनुसार इंग्रजी मजकुराचा मराठी अनुवाद अचूक असल्याचे दिसून येते.

संदर्भित पत्रान्वये आपण सुचविल्याप्रमाणे, **"आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधी व्यवसायी असण्याची आवश्यकता नाही"** असा मराठी अनुवाद घेतल्यास, इंग्रजीमध्ये, **"and the person representing him need not to be a legal practitioner."** असा मजकूर असणे अपेक्षित आहे. तथापि, आपण सुचविलेला मराठी मजकूर घेतल्यास, त्यामुळे अर्थामध्ये विशेष बदल होणार नाही.

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ याच्या कलम ५ अन्वये, कायदे व नियमांचा मसुदा मराठी भाषेत तयार करणे आवश्यक केलेले असल्याने, हा मसुदा मराठीत तयार करणे ही संबंधित विभागाची जबाबदारी आहे. त्यामुळे, या मसुद्यामध्ये यथोचित बदल किंवा सुधारणा विभागाला करता येतील.

कळावे, ही विनंती.

आपला,
(अ.का.गिते),
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

Scanned with OKEN Scanner

प्रधान सचिव यांच्याशी झालल्या चर्चेनुसार तसेच या विभगाच्या दिनांक २२.०६.२०२६ व भाषा संचालक महाराष्ट्र राज्य यांच्या दि.२३.०६.२०२६ च्या पत्रास अनूसरून सादर.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २७ अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ दिनांक १२ जून २०२६ रोजी तसेच महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम, २०२६ दिनांक १९ जून २०२६ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध केले आहेत.

३. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २०२६ मधील इंग्रजी भाषेतील नियम २०(३) च्या मराठी भाषांतरामध्ये त्रुटी असल्याचे आढळून आले आहे. सदर नियम खालीलप्रमाणे आहे.

"The appellant or the complainant, as the case may be, may seek the assistance of any person in the process of the appeal, in the manner as may be provided therefor, while presenting his points and the person representing him may not be a legal practitioner."

भाषा संचालक यांनी सदर नियमाचे मराठी भाषांतर खालील प्रमाणे करून दिले आहे.

"अपीलकर्त्यास किंवा, यथास्थिति, तक्रारदारास, त्याचे मुद्दे मांडते वेळी, त्याकरिता तरतूद केलेल्या रीतीने, अपिलाच्या प्रक्रियेत कोणत्याही व्यक्तीचे सहाय्य घेता येईल आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधि व्यवसायी असणार नाही."

४. सदर नियमातील शेवटची ओळ, **"आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधी व्यवसायीच असण्याची आवश्यकता नाही "** असे असणे आवश्यक आहे अशी या विभागाची धारणा आहे. सदर धारणा पक्की करण्याबाबत भाषासंचालक यांना विनंती करण्यात आली होती. तथापि, त्यांनी नियम २०(३) च्या इंग्रजी मजकुराची पुन:पडताळणी केली असता, कायदेविषयक अनुवादाच्या शैलीनुसार इंग्रजी मजकुराचा मराठी अनुवाद अचुक असल्याचे दिसून येते असे या विभागास कळविले आहे.

५. तसेच पुढे "आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधी व्यवसायी असण्याची आवश्यकता नाही" असा मराठी अनुवाद घेतल्यास, इंग्रजीमध्ये, "and the person representing him need not to be a legal practitioner." असा मजकूर असणे अपेक्षित आहे. तथापि, आपण सुचविलेला मराठी मजकूर घेतल्यास, त्यामुळे अर्थामध्ये विशेष बदल होणार नाही. असे ही कळविले आहे.

६. उपरोक्त इंग्रजी नियमामध्ये "and the person representing him may not be a legal practitioner." अशी शब्दरचना आहे. **म्हणजेच प्रतिनिधीत्व करणारी व्यक्ती विधी व्यवसायी नसली तरी चालेल"** असा त्याचा अर्थबोध होतो असे दिसून येते. यास्तव प्रस्तूत नियमांचे मराठी भाषांतर

,"**आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधी व्यवसायीच असण्याची आवश्यकता नाही** " असे असायला हवे अशी या विभागाची धारणा आहे.

७. यानुषंगाने मा.प्रधान सचिव यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता व कायदेविशेषज्ञ श्री.विराग गुप्ता तसेच मा.उच्च न्यायालयाचे माजी.न्यायाधीश श्री.अंबादास जोशी यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी सुद्धा "**विधी व्यवसायीच असण्याची आवश्यकता नाही** "अनुवाद अपेक्षित असल्याचे मत दिले आहे.

८. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता मराठी भाषेतील अधिसुचनेसाठी शुद्धीपत्रक निर्गमित करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने निर्गमित करावयाच्या शुद्धीपत्रकाचे प्रारूप तपासून देण्यासाठी विधी व न्याय विभागास विनंती करण्यात येत आहे.

क.अ.(श्री.कुटे) श्रीकुटे 23/6/26

अ.स (श्रीम.धुरी) 23/06/26

उ.स (श्री.महाजन) (awaye)

प्र.स. (प्र.ना.उ.व सु) (डॉ.पाटणे)

सचिव (विधी व न्याय विभाग) सुधीरावर 23/6/2026

अ.स.(श्री जाधव)

B-666
23-06-26

3/पि.वि

Law and Judiciary Department/B.

A.D.U.S. (Daniyal C. Jadhav)

The proposal in this file of the General Administration Department is to issue a corrigendum to the Government Notification, General Administration Department, No. GAD/12020/4/2025-GAD-DESK-6 (hereinafter referred to as "the said Notification") dated the 12th June 2026, published in the *Maharashtra Government Gazette*. For that purpose, the Department has forwarded a single draft Corrigendum at page 3/ns., in Marathi, for scrutiny to this Department.

2. In place of the General Administration Department draft Corrigendum at page 3/ns., a revised draft Corrigendum is sent herewith.

3. The Department is requested to verify, before issue, whether the revised draft carries out its intention adequately.

Daniyal Jadhav 23.06.2026.

D.D.D.S. (Smt. Sakhare) 23/6/2026.

Secretary (Legislation)
(Smt. Supriya Dhaware) 23/6/2026

859
23/06/26

Principal Secretary (GAD)

9

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
19 वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-400 032.

क्रमांक: साप्रवि- 12020/04/2025-साप्रवि(कक्ष-6) दिनांक:- 22 जून 2026

प्रति,
भाषा संचालक,
भाषा संचालनालय,
प्रशासकीय इमारत, पाचवा मजला, डॉक्टर आंबेडकर उद्यानाजवळ,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई – 400051.

विषय : महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2026 यांच्या मराठी भाषेतील प्रारूपाची तपासणी करण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम 2026 मधील इंग्रजी भाषेतील नियम २(३) खालील प्रमाणे आहे.

(3) The appellant or the complainant, as the case may be, may seek the assistance of any person in the process of the appeal, in the manner as may be provided therefor, while presenting his points and the person representing him may not be a legal practitioner.

सदर नियमाचे मराठी भाषांतर आपणाकडून खालील प्रमाणे प्राप्त झाले आहे.

(३) अपीलकर्त्यास किंवा, यथास्थिति, तक्रारदारास, त्याचे मुद्दे मांडते वेळी, त्याकरिता तरतुद केलेल्या रीतीने, अपिलाच्या प्रक्रियेत कोणत्याही व्यक्तीचे सहाय्य घेता येईल आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधि व्यवसायी असणार नाही.

सदर नियमातील शेवटची ओळ ,"**आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधी व्यवसायी असण्याची आवश्यकता नाही** " असे असणे आवश्यक आहे अशी या विभागाची धारणा आहे.

वरील भाषांतरानुसे चुकीचा अर्थ काढला जाऊन शासनावर टीका होत आहे. तरी सदर भाषांतराची पुन्हा एकदा तपासणी करून विभागाची धारणा पक्की करावी किंवा सुधारित भाषांतर उपलब्ध करून द्यावे अशी विनंती आहे.

O/C

आपला
(लक्ष्मण कुटे)
कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन

2

महाराष्ट्र शासन
भाषा संचालनालय
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत,
५ वा मजला, डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

ईमेल :- director.dol-mh@gov.in bhashasanchalak@yahoo.in

क्र. विधि/६५-२०२६/कार्या.८अ/१६६६ दि. २३/०६/२०२६

प्रति,
कक्ष अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग,
१९ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.

विषय : महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ यांच्या मराठी भाषेतील प्रारूपाची तपासणी...

संदर्भ : क्रमांक.साप्रवि-१२०२०/४/२०२५-(कक्ष-६), दि. २२ जून, २०२६ चे आपले पत्र.

महोदय,

संदर्भित पत्रान्वये महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ च्या नियम २० (३) च्या इंग्रजी मजकुराचा मराठी अनुवाद पुन्हा तपासून देण्याची विनंती केलेली होती. नियम २० (३) च्या इंग्रजी मजकुराची पुनःपडताळणी केली असता, कायदेविषयक अनुवादाच्या शैलीनुसार इंग्रजी मजकुराचा मराठी अनुवाद अचूक असल्याचे दिसून येते.

संदर्भित पत्रान्वये आपण सुचविल्याप्रमाणे, **"आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधी व्यवसायी असण्याची आवश्यकता नाही"** असा मराठी अनुवाद घेतल्यास, इंग्रजीमध्ये, **"and the person representing him need not to be a legal practitioner."** असा मजकूर असणे अपेक्षित आहे. तथापि, आपण सुचविलेला मराठी मजकूर घेतल्यास, त्यामुळे अर्थामध्ये विशेष बदल होणार नाही.

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ याच्या कलम ५ अन्वये, कायदे व नियमांचा मसुदा मराठी भाषेत तयार करणे आवश्यक केलेले असल्याने, हा मसुदा मराठीत तयार करणे ही संबंधित विभागाची जबाबदारी आहे. त्यामुळे, या मसुद्यामध्ये यथोचित बदल किंवा सुधारणा विभागाला करता येतील.

कळावे, ही विनंती.

आपला,
(अ.वा.गित),
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

शुध्दीपत्र

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक २०२६.

क्रमांक .- महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ, असाधारण क्रमांक २२८, दिनांक १२ जून २०२६, पृष्ठ क्रमांक ६ वर प्रकाशित करण्यात आलेल्या शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : साप्रवि/१२०२०/४/२०२५-साप्रवि-कार्या-६, दिनांक १२ जून २०२६ मध्ये, ओळ क्रमांक २४ वर "असणार नाही" याऐवजी "नसू शकेल" असे वाचावे.

महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या
आदेशानुसार व नावाने,

शासनाचे प्रधान सचिव

GAD - Draft

8

शुद्धिपत्रक

शुद्धिपत्रक-"साप्रवि/१२२०/४/२०२५-साप्रवि-कार्या.६-सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्रमांक साप्रवि/१२२०/४/२०२५-साप्रवि-कार्या-६, दिनांक १२ जून २०२६ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ मधील नियम २०(३)-

"अपीलकर्त्यास किंवा, यथास्थिति, तक्रारदारास, त्याचे मुद्दे मांडते वेळी, त्याकरिता तरतूद केलेल्या रीतीने, अपिलाच्या प्रक्रियेत कोणत्याही व्यक्तीचे सहाय्य घेता येईल आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधि व्यवसायी असणार नाही."

या ऐवजी

"अपीलकर्त्यास किंवा, यथास्थिति, तक्रारदारास, त्याचे मुद्दे मांडते वेळी, त्याकरिता तरतूद केलेल्या रीतीने, अपिलाच्या प्रक्रियेत कोणत्याही व्यक्तीचे सहाय्य घेता येईल आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती विधी व्यवसायीच असण्याची आवश्यकता नाही. "असा वाचावा.

डॉ.अतुल पाटणे
शासनाचे प्रधान सचिव

५

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
१९वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

क्रमांक- साप्रवि-१२०२०/४/२०२५-साप्रवि/कार्या-६ दिनांक : २४ जून, २०२६

प्रति,

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय,
चर्नी रोड, मुंबई - ४०० ०३२.

विषय : महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ बाबतचे शुध्दीपत्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबत...

महोदय,

क्रमांकः-साप्रवि/१२०२०/४/२०२५-साप्रवि-कार्या. ६, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ, असाधारण क्रमांक २२८, दिनांक १२ जून २०२६ बाबत शुध्दीपत्राची मराठी प्रत सोबत जोडण्यात आली आहे. सदर शुध्दीपत्र महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ मध्ये तातडीने प्रसिध्द करून त्याच्या १०० प्रती या विभागास तात्काळ उपलब्ध करुन दयाव्यात, अशी आपणांस विनंती आहे.

For 24/6/2026 (03:43 pm) (pandre)
प्रमुख मुद्रितशोधक (अ) करिता
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
चर्नी रोड, मुंबई ४०० ००४

आपला,

(अ.नि.साखरकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

संग्रहार्थ - कार्यासन-६ सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

६

शुद्धिपत्र

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २४ जून २०२६

क्रमांक .- "साप्रवि-१२०२०/४/२०२५-साप्रवि-कार्या. ६, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ, असाधारण क्रमांक २२८, दिनांक १२ जून २०२६, पृष्ठ क्रमांक ६ वर प्रकाशित करण्यात आलेल्या शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : साप्रवि/१२०२० /४/२०२५-साप्रवि-कार्या. ६, दिनांक १२ जून २०२६ मध्ये, ओळ क्रमांक २४ वर "असणार नाही" याऐवजी "नसू शकेल" असे वाचावे.

त्यामुळे सदर तरतूद खालीलप्रमाणे असेल:

"अपीलकर्त्यास किंवा, यथास्थिति, तक्रारदारास, त्याचे मुद्दे मांडते वेळी, त्याकरिता तरतूद केलेल्या रीतीने, अपिलाच्या प्रक्रियेत कोणत्याही व्यक्तीचे सहाय्य घेता येईल आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधी व्यवसायी नसू शकेल".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. अतुल पाटणे)
शासनाचे प्रधान सचिव

RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ७८] बुधवार, जून २४, २०२६/आषाढ ३, शके १९४८ [पृष्ठ १, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक २४२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ जून २०२६.

शुद्धिपत्र

क्रमांक "साप्रवि-१२०२०/४/२०२५-साप्रवि-कार्या.६.— **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण भाग चार-अ, असाधारण क्रमांक २२८, दिनांक १२ जून २०२६, पृष्ठ क्रमांक ६ वर प्रकाशित करण्यात आलेल्या शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः-साप्रवि/१२०२०/४/२०२५-साप्रवि-कार्या.६, दिनांक १२ जून २०२६ मध्ये, ओळ क्रमांक २४ वर "असणार नाही" याऐवजी "नसू शकेल" असे वाचावे.

त्यामुळे सदर तरतूद खालीलप्रमाणे असेल :-

"अपीलकर्त्यास किंवा, यथास्थिति, तक्रारदारास, त्याचे मुद्दे मांडते वेळी, त्याकरिता तरतूद केलेल्या रीतीने, अपिलाच्या प्रक्रियेत कोणत्याही व्यक्तीचे सहाय्य घेता येईल आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती, विधी व्यवसायी नसू शकेल".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. अतुल पाटणे,
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ बाबत स्पष्टीकरणात्मक निवेदन

महाराष्ट्र शासनाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००५ अधिसूचित केले होते. तथापि, गेल्या वीस वर्षांच्या कालावधीत शासनाच्या कार्यपद्धती, माहिती तंत्रज्ञान, नागरिकांच्या अपेक्षा तसेच माहितीच्या स्वरूपामध्ये मूलभूत बदल झाले आहेत. याशिवाय, या नियमामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या विविध सुधारणा स्वतंत्र स्वरूपात अस्तित्वात असल्याने नियमांची रचना गुंतागुंतीची बनली होती. या पार्श्वभूमीवर विद्यमान नियमांचे एकत्रीकरण करून, केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार नियम, २०१२ यांच्याशी सुसंगती निर्माण करून तसेच बदललेल्या परिस्थितीनुसार आवश्यक सुधारणा समाविष्ट करून महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ अधिसूचित करण्यात आले आहेत.

२. **सदर नियमांचा उद्देश माहितीच्या अधिकारावर कोणत्याही प्रकारची मर्यादा आणणे नसून, माहिती अधिकार व्यवस्थेला अधिक कार्यक्षम, पारदर्शक, उत्तरदायी व तंत्रज्ञानसुसंगत बनविणे हा आहे.** विशेषतः द्वितीय अपीलाची प्रक्रिया स्पष्ट करणे, स्वयंप्रेरणेने माहिती प्रकट करण्याच्या तरतुदींना बळकटी देणे, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर वाढविणे तसेच माहिती अधिकार व्यवस्थेचा वाढता गैरवापर रोखण्यासाठी आवश्यक प्रशासकीय उपाययोजना करणे हे या नियमांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

३. मागील काही वर्षांमध्ये राज्यातील काही मोजक्या व्यक्तींनी मोठ्या संख्येने माहिती अधिकार अर्ज व अपिले दाखल केल्याचे निदर्शनास आले आहे. **मागील पाच वर्षांच्या कालावधीत राज्यातील केवळ दहा अपीलकर्त्यांनी एकूण २१,१३५ द्वितीय अपिले दाखल केल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे.** अशा प्रकारच्या मोठ्या प्रमाणातील अपिलांमुळे राज्य माहिती आयोगाकडील प्रलंबितता वाढते, आणि माहितीची खरी आवश्यकता असलेल्या सामान्य नागरिकांना त्यांच्या वैधानिक अधिकाराच्या वापरासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागते. याचबरोबर सार्वजनिक प्राधिकरणांनाही त्यांच्या नियमित प्रशासकीय कामकाजातून मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ माहिती अधिकार विषयक कार्यवाहीसाठी वळवावे लागते.

४. माहिती अधिकार अधिनियमाचा गैरवापर होत असल्याची बाब माननीय सर्वोच्च न्यायालय, विविध उच्च न्यायालये आणि केंद्रीय माहिती आयोग यांच्या निदर्शनासही आलेली आहे. **ICAI विरुद्ध Shaunak H. Satya (२०११)** या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले आहे की, **माहिती अधिकार अधिनियमाचा गैरवापर योग्य प्रकारे नियंत्रित केला गेला नाही तर पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आलेली व्यवस्था उपद्रव आणि दुरुपयोगाचे साधन बनू शकते.** तसेच मा.सर्वोच्य न्यायालयाने नुकतेच दि.१५.०६.२०२६ रोजी SLP (Crl.) No. १०२५७/२०२६ (Ramesh Kumar Behl विरुद्ध State of Punjab & Others) या प्रकरणात **माहितीचा अधिकार कायद्याचा वापर व्यवसाय स्वरूपात केला जात असल्याची** टिप्पणी केली आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकाराचे संरक्षण करतानाच त्याच्या गैरवापरावर नियंत्रण ठेवणे ही देखील शासनाची जबाबदारी आहे.

५. माहितीचा अधिकार अधिनियम या कायद्याचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणावर, पुनरावृत्ती स्वरूपाचे किंवा लोकहिताशी संबंध नसलेले अर्ज सातत्याने सादर केल्यास त्याचा परिणाम सार्वजनिक प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर होतो. **CBSE v. Aditya Bandopadhyay (२०११)** या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले आहे की, **सार्वजनिक प्राधिकरणांच्या सुमारे ७५ टक्के कर्मचाऱ्यांचा**

७५ टक्के वेळ नियमित शासकीय कामकाज बाजूला ठेवून माहिती अधिकार अर्जांवरील कार्यवाहीमध्ये खर्च होणे ही देशाला अपेक्षित असलेली परिस्थिती नाही. सार्वजनिक प्राधिकरणांची संसाधने ही करदात्या नागरिकांच्या पैशातून उपलब्ध होत असल्याने माहिती अधिकार कायद्याचा गैरवापर हा अप्रत्यक्षपणे सार्वजनिक निधीच्या अपव्ययास कारणीभूत ठरतो. त्यामुळे माहितीच्या अधिकाराचे संरक्षण करतानाच त्याच्या गैरवापरावर वाजवी नियंत्रण ठेवणे हे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे.

६. माहिती अधिकार अर्ज शुल्क, प्रथम अपील शुल्क, द्वितीय अपील शुल्क तसेच **माहिती शुल्कामध्ये करण्यात आलेली वाढ ही महसूल वाढविण्यासाठी करण्यात आलेली नाही.** महाराष्ट्र राज्यात माहिती अधिकार अर्जासाठीचे शुल्क आणि अपील शुल्क जवळपास वीस वर्षांपासून अपरिवर्तित होते. सुधारित शुल्क हे अजूनही नाममात्र स्वरूपाचे असून माहिती मिळविण्याच्या अधिकारावर कोणताही अवाजवी आर्थिक अडथळा निर्माण करीत नाही. उलट, व्यवस्थेचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणावर अनावश्यक अर्ज व अपिले दाखल करण्याच्या प्रवृत्तीवर काही प्रमाणात नियंत्रण येण्यास मदत होईल आणि उपलब्ध संसाधने खऱ्या गरजवंत नागरिकांसाठी अधिक परिणामकारकपणे वापरता येतील.

७. **माहिती अधिकार अर्जासाठी १५० शब्दांची मर्यादा ही तरतूद नवीन नसून सन २०१२ पासून अस्तित्वात आहे.** महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ मध्ये केवळ पूर्वीच्या नियमांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. सदर तरतूद न्यायालयीन परीक्षणात टिकून राहिलेली आहे. अनेक अर्ज अत्यंत विस्तृत व संदिग्ध स्वरूपाचे असल्यामुळे नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे हे समजत नाही. १५० शब्दांची मर्यादा ही माहितीच्या प्रमाणावर नसून अर्जातील मागणी स्पष्ट व संक्षिप्त करण्यासाठी आहे.

८. ओळखीचा पुरावा मागविणे हे माहितीच्या अधिकारावर माहितीचा अधिकार अधिनियम हा केवळ भारतीय नागरिकांना लागू आहे. त्यामुळे अर्जदार भारतीय नागरिक असल्याची प्राथमिक खात्री करणे आवश्यक आहे. विद्यमान व्यवस्थेत खोट्या किंवा काल्पनिक नावाने अर्ज दाखल करण्यास प्रतिबंध करणारी कोणतीही प्रभावी यंत्रणा नव्हती. ओळखीचा पुरावा मागविण्याचा उद्देश नागरिकत्वाची खात्री करणे व गैरवापर रोखणे हा आहे.

९. अधिनियमानुसार दारिद्र्यरेषेखालील नागरिकांना शुल्कातून सूट देण्यात आली आहे. तथापि अमर्याद प्रमाणात माहिती विनामूल्य देणे अपेक्षित आहे, असा कोणताही उल्लेख अधिनियमात नाही. राज्य माहिती आयोगाने आपल्या सन २००९ तसेच सन २०११ च्या वार्षिक अहवालांमध्ये दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना विनामूल्य दिल्या जाणाऱ्या माहितीवर वाजवी मर्यादा निश्चित करण्याची शिफारस केली होती. आयोगाने अशा व्यक्तींना जास्तीत जास्त ५० पानांपर्यंतची माहिती विनामूल्य देण्याची शिफारस शासनास केली होती. सदर शिफारशींचा विचार करून शासनाने दिनांक ०१.०२.२०१७ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकाद्वारे दारिद्र्यरेषेखालील अर्जदारांना पहिली ५० पाने विनामूल्य उपलब्ध करून देण्याबाबत कार्यपद्धती निश्चित केली होती. त्यामुळे सदर व्यवस्था नवीन नसून ती मागील अनेक वर्षांपासून प्रशासकीय स्तरावर अस्तित्वात आहे.

१०. **सदर नियमांमधील सर्वात महत्त्वाची सुधारणा म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ४ अन्वये स्वयंप्रेरणेने माहिती प्रकट करण्याच्या तरतुदींना बळकटी देणे होय**. शासनाच्या संकेतस्थळावर व सार्वजनिक क्षेत्रात जास्तीत जास्त माहिती उपलब्ध झाल्यास माहिती अधिकार अर्जांची आवश्यकता आपोआप कमी होईल. यामुळे नागरिकांना माहिती सहज उपलब्ध होईल, प्रशासनावरील अनावश्यक ताण कमी होईल आणि पारदर्शकता व उत्तरदायित्व यामध्ये वाढ होईल.

११. माहिती मागण्याचे प्रयोजन नमूद करण्यासंबंधीची तरतूद नियम तयार करण्याच्या प्रारंभिक मसुद्यामध्ये विचाराधीन होती. अंतिम अधिसूचनेमध्ये महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ मध्ये माहिती मागण्याचे प्रयोजन नमूद करणे बंधनकारक करणारी कोणतीही तरतूद समाविष्ट करण्यात आलेली नाही. तथापि, अनावधानाने माहिती अधिकार अर्जाच्या नमुन्यात "माहिती मागण्याचे प्रयोजन" हा रकाना कायम राहिला होता. ही बाब निदर्शनास आल्यानंतर शासनाने तात्काळ दखल घेऊन महाराष्ट्र माहितीचा अधिकार (प्रथम सुधारणा) नियम, २०२६ द्वारे सदर रकाना वगळला आहे. त्यामुळे महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ अंतर्गत माहिती मागण्याचे प्रयोजन नमूद करण्याची कोणतीही आवश्यकता अथवा बंधन अस्तित्वात नाही.

१२. **महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ हे माहितीच्या अधिकाराचे संकुचन करणारे नसून, माहिती अधिकार व्यवस्थेला अधिक प्रभावी, संतुलित, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख बनविण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेले आहेत.** या नियमांमुळे कायद्याचा गैरवापर रोखण्यास मदत होईल, सार्वजनिक संसाधनांचा अधिक कार्यक्षम वापर होईल आणि सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या माहितीच्या अधिकाराचा अधिक परिणामकारक लाभ मिळेल. त्यामुळे सदर नियम हे माहितीच्या अधिकाराचे बळकटीकरण करणारे, लोकहित वृद्धिंगत करणारे आणि सुशासनाला चालना देणारे आहेत.

----------********---------

महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६

प्रमुख आक्षेप व शासनाची भूमिका

१. शुल्क वाढ:

- महाराष्ट्र राज्यात माहिती अधिकार अर्ज, प्रथम अपील व द्वितीय अपील यासाठीचे शुल्क सन २००५ पासून जवळपास वीस वर्षे अपरिवर्तित राहिले होते. या कालावधीत महागाई, टपाल खर्च, अभिलेख व्यवस्थापन, संगणकीकरण, डिजिटायझेशन व प्रशासकीय खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे शुल्कामध्ये करण्यात आलेली वाढ ही केवळ मूल्यवृद्धीशी सुसंगत असून प्रत्यक्षात ती नाममात्र स्वरूपाची आहे.

- राज्य माहिती आयोगाने माहिती अर्जासाठी रू १० ऐवजी रू.१००/-, प्रथम अपीलासाठी रू २० ऐवजी रू. १५०/- व द्वितीय अपीलासाठी रू. २० एवेजी रू.२००/- या प्रमाणे शुल्क आकारावे अशी शिफारस केली आहे. शासनाने सदर शिफारशींचा विचार करून वाजवी व संतुलित शुल्क संरचना निश्चित केली आहे. **शुल्क वाढीचा उद्देश महसूल प्राप्त करणे हा नसून माहिती अधिकार व्यवस्थेचा वाढता गैरवापर रोखणे व उपलब्ध संसाधनांचा न्याय्य वापर सुनिश्चित करणे हा आहे**.

- काही अर्जदार जुना अभिलेख ई-मेल द्वारे मागणी करतात. डिजीटल स्वरूपात माहितीची मागणी केल्यास सदर अभिलेख शोधणे, तो स्कॅन करणे, स्कॅन केलेला डेटा जतन करून ठेवणे यासाठी शासनाचे मनुष्यबळ व साधनसामग्री खर्च पडत असते.सदर बाब विचारात घेऊन डिजीटल/स्कॅन केलेल्या प्रतीसाठी शुल्क आकारण्याची तरतुद केली आहे. माहितीचे शुल्क प्रतिपान रुपये दोन ऐवजी प्रतिपान रुपये पाच इतके करण्यात आले असून ते सुसंगत आहे

- शासनास प्राप्त आकडेवारीनुसार मागील पाच वर्षांत राज्यातील केवळ दहा अपीलकर्त्यांनी एकूण २१,१३५ द्वितीय अपिले दाखल केली आहेत. या अपिलांमागे संबंधित माहिती अधिकार अर्ज व प्रथम अपिलांची संख्या यापेक्षा कितीतरी पटीने अधिक असण्याची शक्यता आहे.प्रत्येक द्वितीय अपीलाच्या सुनावणीसाठी संबंधित जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच आवश्यकतेनुसार इतर अधिकारी व कर्मचारी यांना राज्य माहिती आयोगासमोर उपस्थित राहावे लागते. मुख्यालयाबाहेर कार्यरत असलेल्या गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांचा यामध्ये संपूर्ण दिवस खर्च होतो.

- सुधारित शुल्कामुळे सामान्य व गरजू नागरिकांच्या माहिती मिळविण्याच्या अधिकारावर कोणताही अवाजवी परिणाम होत नाही. उलट, अनावश्यक व पुनरावृत्ती स्वरूपाच्या अर्जांमध्ये काही प्रमाणात घट होऊन राज्य माहिती आयोगाची प्रलंबितता कमी होण्यास, सार्वजनिक प्राधिकरणांवरील ताण घटण्यास आणि खऱ्या अर्थाने माहितीची आवश्यकता असलेल्या नागरिकांना अधिक जलद न्याय मिळण्यास मदत होईल.

- काही मोजक्या व्यावसायिक किंवा सवयीने मोठ्या प्रमाणात अर्ज व अपिले दाखल करणाऱ्या व्यक्तींच्या समाधानासाठी सार्वजनिक संसाधनांचा असमतोल वापर होणे हे लोकहिताच्या दृष्टीने योग्य ठरत नाही. उपलब्ध संसाधनांचा वापर सर्व नागरिकांच्या हितासाठी संतुलित पद्धतीने होणे आवश्यक आहे.

२. माहिती अधिकार अर्जासाठी १५० शब्दांची मर्यादा:

- माहिती अधिकार अर्जासाठी १५० शब्दांची मर्यादा ही महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ द्वारे प्रथमच आणण्यात आलेली नवीन तरतूद नाही. सदर तरतूद महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम, २०१२ पासून अस्तित्वात आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ हे मूळ नियम व त्यानंतरच्या सर्व सुधारणा एकत्रित करून नव्याने अधिसूचित करण्यात आले असल्यामुळे विद्यमान तरतूद त्यामध्ये पुनः समाविष्ट करण्यात आली आहे.

- माहितीचा अधिकार अधिनियमाचा उद्देश विशिष्ट माहिती नागरिकांना उपलब्ध करून देणे हा आहे. प्रत्यक्षात अनेक प्रकरणांमध्ये अर्जदारांकडून अनेक पानांचे, विस्तृत निवेदन स्वरूपातील किंवा प्रश्नोत्तरात्मक अर्ज सादर केले जातात. अशा अर्जांमधून अर्जदारास नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे हेच स्पष्ट होत नाही. परिणामी जनमाहिती अधिकाऱ्यांना अर्जाचा अर्थ लावण्यासाठी अतिरिक्त वेळ खर्च करावा लागतो आणि माहिती देण्याच्या प्रक्रियेत अनावश्यक विलंब होतो.

- १५० शब्दांची मर्यादा ही माहितीच्या प्रमाणावर नसून अर्जातील विनंतीच्या मांडणीवर आहे. अर्जदाराला आवश्यक असलेल्या माहितीचे संक्षिप्त व स्पष्ट वर्णन करण्यास प्रोत्साहन देणे हा या तरतुदीचा उद्देश आहे. सदर मर्यादा माहितीच्या अधिकारावर निर्बंध घालत नाही. अर्जदारास आवश्यक असल्यास स्वतंत्र विषयांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करता येतात. तसेच माहितीचा विस्तार, कागदपत्रांची संख्या किंवा मागविलेल्या अभिलेखांचे प्रमाण यावर कोणतीही मर्यादा घालण्यात आलेली नाही.

- केंद्र शासनासह विविध राज्यांच्या माहिती अधिकार अर्ज नमुन्यांमध्ये अर्जदाराने मागितलेल्या माहितीचे स्पष्ट व संक्षिप्त वर्णन करण्यावर भर देण्यात आलेला आहे. महाराष्ट्रातील १५० शब्दांची मर्यादा ही त्याच उद्देशाची प्रशासकीय व्यवस्था असून माहिती अधिकार व्यवस्थेच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी आवश्यक आहे.

३. ओळखीचा पुरावा जोडणे बंधनकारक

- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा केवळ **भारतीय नागरिकांना** प्रदान करण्यात आलेला अधिकार आहे. त्यामुळे अर्जदार भारतीय नागरिक असल्याची पडताळणी करण्यासाठी ओळखीचा पुरावा मागविणे ही स्वाभाविक आणि वाजवी प्रशासकीय आवश्यकता आहे. विद्यमान व्यवस्थेमध्ये अर्जदाराची ओळख सत्यापित करण्याची कोणतीही प्रभावी यंत्रणा उपलब्ध नव्हती. परिणामी काल्पनिक, अपूर्ण अथवा खोट्या नावाने अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींच्या नावाचा वापर करून मोठ्या प्रमाणावर अर्ज सादर करणे शक्य होत होते.

- ओळखीचा पुरावा मागविण्याचा उद्देश अर्जदाराच्या हेतूची चौकशी करणे किंवा त्याची वैयक्तिक माहिती संकलित करणे हा नसून, अर्जदार हा भारतीय नागरिक आहे याची प्राथमिक खात्री करणे हा आहे. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमाचा लाभ पात्र व्यक्तींनाच मिळेल याची खात्री होते. माहिती अधिकार अधिनियमांतर्गत नागरिकत्वाची प्राथमिक पडताळणी करणे ही अतिशय मर्यादित व वाजवी अट आहे.

- या तरतुदीमुळे जनमाहिती अधिकाऱ्यांना अर्जदाराशी प्रभावी संवाद साधणे, आवश्यक असल्यास अतिरिक्त शुल्क अथवा माहितीबाबत पत्रव्यवहार करणे आणि चुकीच्या अथवा बनावट अर्जांवर नियंत्रण ठेवणे सुलभ होईल.

४. दारिद्र्यरेषेखालील नागरिकांसाठी मोफत माहितीवरील ५० पानांची मर्यादा :-

- अधिनियमानुसार दारिद्र्यरेषेखालील नागरिकांना शुल्कातून सूट देण्यात आली आहे. तथापि अमर्याद प्रमाणात माहिती विनामूल्य देणे अपेक्षित आहे, असा कोणताही उल्लेख अधिनियमात नाही. राज्य माहिती आयोगाने आपल्या सन २००९ तसेच सन २०११ च्या वार्षिक अहवालांमध्ये दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना विनामूल्य दिल्या जाणाऱ्या माहितीवर वाजवी मर्यादा निश्चित करण्याची शिफारस केली होती. आयोगाने अशा व्यक्तींना जास्तीत जास्त ५० पानांपर्यंतची माहिती विनामूल्य देण्याची शिफारस शासनास केली होती.

- सदर शिफारशींचा विचार करून शासनाने दिनांक ०१ फेब्रुवारी २०१७ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकाद्वारे दारिद्र्यरेषेखालील अर्जदारांना पहिली ५० पाने विनामूल्य उपलब्ध करून देण्याबाबत कार्यपद्धती निश्चित केली होती. त्यामुळे सदर व्यवस्था नवीन नसून ती मागील अनेक वर्षांपासून प्रशासकीय स्तरावर अस्तित्वात आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ मध्ये केवळ विद्यमान प्रशासकीय सूचनांना वैधानिक स्वरूप देण्यात आले आहे. त्यामुळे ही नवीन निर्बंधात्मक तरतूद नसून दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचे नियमांमध्ये समावेशन आहे.

- तसेच कोणतीही मर्यादा नसल्यास एका अर्जाद्वारे हजारो किंवा लाखो पानांची माहिती विनामूल्य मागविणे शक्य होईल. अशा परिस्थितीत सार्वजनिक प्राधिकरणांच्या मनुष्यबळावर व आर्थिक संसाधनांवर मोठा ताण निर्माण होईल. ५० पानांपर्यंतची माहिती विनामूल्य उपलब्ध राहील आणि त्यापुढील माहिती मिळविण्याचा अधिकारही अबाधित राहील. त्यामुळे माहितीचा अधिकार आणि सार्वजनिक संसाधनांचा विवेकपूर्ण वापर यामध्ये योग्य संतुलन राखले जाते.

----- ***** -----

कि. बा. हजारे (अण्णा)
K. B. alias Anna Hazare

राळेगण सिद्धी, तालुका पारनेर,
जिल्हा अहमदनगर (महाराष्ट्र)
पिन ४१४३०२
☎ (०२४८८) २४०४०१/२४०५८१
www.annahazare.org
www.joinannahazare.org.in

Ralegan Siddhi, Tal. Parner,
Dist. Ahmednagar (Maharashtra)
PIN 414302
☎ (02488) 240401 / 240581
annahazareoffice@gmail.com

जा.क्र.११/२०२६-२७
दिनांक.२२/०६/२०२६

प्रति,
मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब.
मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य

विषय:- मूळ कायदा माहितीचा अधिकार या कायद्यातील १२ जून २०२६च्या बेकायदेशीर दुरुस्त्या, तरतुदी त्वरित रद्द कराव्यात अन्यथा मी दिनांक ५ जुलै २०२६ पासून यादव बाबा मंदिर राळेगणसिद्धी येथे उपोषण करणार असल्याबाबत.....

महोदय,

मी माझे संपूर्ण जीवन समाजाच्या राष्ट्राच्या सेवेसाठी अर्पण केलेले आहे. मुळात पारदर्शकता येण्यासाठी मी माहितीचा अधिकार कायद्यासाठी महाराष्ट्रात पूर्वी १९९८, २००१, २००४, २००६ साली वेळोवेळी जनजागृती दौरे महाराष्ट्रभर केलेले आहेत. तसेच २००३ मध्ये माहितीचा अधिकारासाठी आझाद मैदान मुंबई येथे उपोषण केले होते त्यानंतर २००४ मध्ये राळेगणसिद्धी येथे माहितीच्या अधिकारासाठी उपोषण केलेले होते. तसेच २००६ मध्ये केंद्रीय माहितीचा अधिकार फाईल नोटीग काढणे तसेच इतर तरतुदींबाबतही मी आळंदी येथे उपोषण केलेले होते. तेव्हा तत्कालीन केंद्रीय पंतप्रधान कार्यालय मंत्री (PMO) श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते लेखी आश्वासना नंतर उपोषण आळंदी येथे सोडले होते. २० वर्षानंतर आता १२ जून २०२६ मध्ये माहिती अधिकारातील ज्या तरतुदी केलेल्या आहेत. मात्र महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेले महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ हे या कायद्याची धार बोथट करणारे, नागरिकांना माहितीपासून दूर ठेवणारे आणि माहितीच्या अधिकाराच्या मूळ तत्त्वांनाच कमकुवत करणारे असल्याचे दिसून येते.

१. **शुल्कवाढ :** शुल्कवाढीचे कोणतेही तर्कसंगत कारण दिलेले नाही. माहितीचा अधिकार हा महसूल मिळविण्याचा कायदा नसून नागरिकांना माहिती उपलब्ध करून देण्याचा कायदा आहे. नियमांमध्ये माहिती मिळविण्याचे शुल्क वाढविण्यात आले आहे; परंतु ही वाढ का आवश्यक आहे याचा कोणताही अभ्यास, आर्थिक विश्लेषण किंवा कारणमीमांसा शासनाने सार्वजनिक केलेली नाही. जर शासनाला वाटत असेल की २० वर्षांनंतर शुल्क वाढविणे आवश्यक आहे, तर त्याच प्रमाणात माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यांवरील दंडाची रक्कमही वाढविणे आवश्यक होते. **दंडाची रक्कम न वाढवता केवळ नागरिकांवरील आर्थिक भार वाढविणे हे एकतर्फी व अन्यायकारक आहे.**

२. **माहिती मागणे खर्चिक बनविण्याचा प्रयत्न :** एका अर्जासाठी शुल्क, प्रतींसाठी वाढीव शुल्क, अपील शुल्क आणि इतर आर्थिक अटी यामुळे सर्वसामान्य नागरिकांसाठी माहिती मिळविणे अधिक खर्चिक होणार आहे. विविध शुल्क वाढ करणे म्हणजे अप्रत्यक्षपणे नागरिकांना माहितीपासून वंचित ठेवणे होय. माहिती लपविणाऱ्या यंत्रणेवर

कारवाई करण्याऐवजी माहिती मागणाऱ्या नागरिकांवर आर्थिक व प्रशासकीय निर्बंध लादणे हे लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात आहे.

३. **ओळखपत्र जोडण्याची सक्ती :** ओळखपत्र जोडण्याची सक्ती ही कायद्याच्या विरोधात आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ६(२) नुसार अर्जदाराने माहिती मागण्याचे कारण किंवा इतर वैयक्तिक तपशील देण्याची आवश्यकता नाही. ओळखपत्र जोडण्याची सक्ती केल्यास माहिती मागणाऱ्यांची गोपनीयता धोक्यात येईल.भ्रष्टाचार उघड करणाऱ्या नागरिकांवर दबाव येऊ शकतो. माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होईल. कायद्याने दिलेले अनामिकतेचे संरक्षण कमकुवत होईल.

४. **एक विषय – एक अर्ज :** एक विषय – एक अर्ज ही अट अनावश्यक आणि त्रासदायक असून या दुरुस्ती मागचा हेतू शंका निर्माण करणारा आहे.प्रशासकीय निर्णय अनेकदा परस्पर संबंधित असतात.एका विषयासाठी अनेक अर्ज करावे लागणे म्हणजे अधिक शुल्क, अधिक वेळ आणि अधिक त्रास.यामुळे माहिती मिळविण्याचा अधिकार सुलभ न राहता क्लिष्ट होणार आहे.

५. **पुनरावृत्ती अर्ज निकाली काढण्याची तरतूद :** पुनरावृत्ती अर्ज निकाली काढण्याची तरतूद ही पारदर्शकतेला बाधा आणणारी आहे. अनेक वेळा अर्जदारांना पूर्ण माहिती मिळत नाही, अपूर्ण माहिती दिली जाते, चुकीची माहिती दिली जाते किंवा माहितीचा काही भाग जाणीवपूर्वक लपविला जातो. अशा परिस्थितीत अर्जदाराला त्याच विषयासंदर्भात पुन्हा माहिती मागविण्याची आवश्यकता निर्माण होऊ शकते. केवळ "पूर्वी माहिती मागितली होती" किंवा "पूर्वी माहिती दिली होती" या कारणावरून नवीन अर्ज निकाली काढणे म्हणजे प्रशासनाने दिलेली माहिती अंतिम आणि अचूक आहे असे गृहीत धरणे होय. ही भूमिका माहितीच्या अधिकाराच्या तत्त्वांशी विसंगत आहे.

याशिवाय अनेक वेळा नवीन घडामोडी, नवीन कागदपत्रे, नवीन आदेश किंवा बदललेली परिस्थिती यामुळे त्याच विषयावर पुन्हा माहिती मागविण्याची गरज निर्माण होते. अशा वेळी पुनरावृत्ती अर्ज म्हणून अर्ज फेटाळणे अन्यायकारक ठरेल. विशेष म्हणजे एखाद्या अर्जाला "पुनरावृत्ती" म्हणायचे की नाही याबाबत स्पष्ट निकष नसल्यास संबंधित अधिकाऱ्यांना मोठ्या प्रमाणात स्वविवेकाधिकार मिळेल. त्यामुळे अनेक वैध अर्जही पुनरावृत्ती असल्याचे कारण देऊन नाकारले जाण्याची शक्यता आहे.

ही तरतूद भविष्यात भ्रष्टाचार, गैरव्यवहार किंवा माहिती लपविण्याच्या प्रकरणांमध्ये ढाल म्हणून वापरली जाण्याचा धोका आहे. एखाद्या अधिकाऱ्याने एकदा अपूर्ण माहिती दिली की नंतर त्याच विषयावरील पुढील अर्ज "पुनरावृत्ती" म्हणून नाकारता येऊ शकतील. परिणामी सत्य माहिती मिळविण्याचे नागरिकांचे साधन कमकुवत होईल. एकदा अपूर्ण माहिती देऊन कायमस्वरूपी पडदा टाकण्याचा अधिकार कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाला असू शकत नाही. माहितीची सत्यता, पूर्णता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी नागरिकाला आवश्यकतेनुसार त्याच विषयावर पुन्हा माहिती मागण्याचा अधिकार असलाच पाहिजे

६. **माहिती मागविण्याचे प्रयोजन (कारण) विचारणे अथवा त्याची सक्ती :** माहिती मागविण्याचे प्रयोजन (कारण) विचारणे अथवा त्याची सक्ती करणे हे माहितीचा अधिकार कायद्याच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(२) मध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की माहिती मागणाऱ्या व्यक्तीने माहिती का मागितली आहे याचे कारण देण्याची आवश्यकता नाही. माहिती मागविण्याचे प्रयोजन विचारण्यास किंवा

अप्रत्यक्षपणे ते उघड करण्यास भाग पाडल्यास अनेक गंभीर परिणाम होऊ शकतात. अनेक वेळा नागरिक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते किंवा व्हिसलब्लोअर हे स्वतःची ओळख आणि उद्देश उघड न करता माहिती मागवतात. कारण त्यांना प्रतिशोध, धमक्या किंवा छळाची भीती असते.

प्रथम तर हे लक्षात घेतले पाहिजे की भ्रष्टाचार, गैरव्यवहार, बेकायदेशीर कृत्ये किंवा प्रशासनातील त्रुटी उघड करणाऱ्या नागरिकांवर दबाव आणण्याची शक्यता वाढेल. दुसरे म्हणजे, माहिती मागविण्याचे कारण विचारले जाऊ लागल्यास अधिकारी अर्जदाराच्या हेतूची चौकशी करू लागतील. परिणामी "कारण योग्य आहे का?" हा नवीन वाद निर्माण होईल. त्यामुळे माहिती देण्याची प्रक्रिया अधिक व्यक्तिनिष्ठ, मनमानी आणि विवादग्रस्त होण्याचा धोका निर्माण होईल.तिसरे म्हणजे, नागरिकांना माहिती मागण्यासाठी शासनापुढे स्पष्टीकरण द्यावे लागणे हे लोकशाही व्यवस्थेतील पारदर्शकतेच्या तत्त्वालाच विरोधी आहे. लोकशाहीत नागरिक हे मालक आणि शासन हे लोकसेवक असतात. त्यामुळे नागरिकाने शासनाला माहिती का मागितली याचा जाब देण्याऐवजी शासनाने माहिती का दिली नाही याचा जाब द्यायला हवा. शासनाच्या माहितीवर नागरिकाचा हक्क आहे, परवानगी नाही. चौथे म्हणजे, अशा प्रकारची अट माहितीचा अधिकार वापरणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीती निर्माण करू शकते. परिणामी अनेक नागरिक माहिती मागविण्यापासून परावृत्त होतील. त्यामुळे पारदर्शकता वाढण्याऐवजी गोपनीयता आणि अपारदर्शकतेला प्रोत्साहन मिळेल.यामुळे माहिती मागविण्याचे प्रयोजन विचारणे, त्याची सक्ती करणे किंवा कोणत्याही प्रकारे अर्जदाराला त्याचा हेतू उघड करण्यास भाग पाडणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(२) च्या स्पष्ट शब्दांना, उद्देशाला आणि आत्म्यालाच बाधा आणणारे आहे.

(२) माहितीचा अधिकार हा केवळ माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या भारताच्या विशिष्ट अर्जदार नागरिकासाठी उपलब्ध असल्याने, अशा व्यक्तीने दाखल केलेल्या द्वितीय अपिलाच्या बाबतीत राज्य माहिती आयोगासमोर प्रलंबित असलेली कार्यवाही, अपीलकर्ता मृत झाला आहे असा पुरावा प्रतिवादी सादर करतो तेव्हा किंवा आयोगाने त्याच्याकडे उपलब्ध असलेल्या नोंदीच्या आधारे अशा निष्कर्ष काढलेला असेल तेव्हा, अपीलकर्त्याचा मृत्यू झाल्यावर रद्द होईल.

२४. राज्य माहिती आयोगाचा आदेश.-

राज्य माहिती आयोगाचा आदेश, लेखी स्वरूपात असेल आणि आयोगाने या प्रयोजनार्थ प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने रीतसर अधिप्रमाणित केलेल्या आयोगाच्या शिक्क्यानिशी देण्यात येईल.

२५. तक्रारीची कार्यपद्धती.-

वरील १७ ते २४ या नियमांच्या तरतुदी, कलम १८ अन्वये आयोगासमोर दाखल केलेल्या तक्रारींच्या बाबतीत, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

२६. आयोगाचे अंतर्निहित प्रक्रियात्मक अधिकार.-

(१) या नियमांमधील कोणत्याही गोष्टीमुळे, आयोग, या अधिनियमाच्या कलम १८ अन्वये चौकशी करत असताना किंवा कलम १९ च्या पोट-कलम *(३)* अन्वये द्वितीय अपील निकालात काढत असताना, सर्व पक्षकारांना सुनावणीची वाजवी संधी दिल्यानंतर, न्यायाचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी किंवा आयोगाच्या प्रक्रियेचा गैरवापर रोखण्यासाठी आवश्यक असतील असे, या अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत असलेले आनुषंगिक किंवा सहायक प्रक्रियात्मक आदेश, पारित करण्याच्या राज्य माहिती आयोगाच्या अधिकारांवर मर्यादा आल्याचे मानण्यात येणार नाही.

(२) आयोग, कोणत्याही वेळी, एकतर स्वतःहून किंवा कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून, कलम १८ खालील तक्रारीशी किंवा कलम १९ च्या पोट-कलम *(३)* खालील द्वितीय अपिलाशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही आदेशात किंवा अभिलेखात चुकीने किंवा अपघाताने झालेली

	कोणतीही लिपिकीय किंवा अंकगणितीय चूक अथवा त्रुटी दुरुस्त करू शकेल. *(३)* जेव्हा पोट-नियम *(२)* अन्वये कोणतीही दुरुस्ती केली जाते त्या बाबतीत, दुरुस्त आदेशाची प्रत, संबंधित पक्षकारांना कळविण्यात येईल आणि आयोगाच्या संकेतस्थळावर टाकण्यात (अपलोड) करण्यात येईल. **२७. सार्वजनिक प्राधिकरणाद्वारे सादरीकरण.-** सार्वजनिक प्राधिकरण, त्याची बाजू मांडण्यासाठी कोणत्याही प्रतिनिधीस किंवा त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत करू शकेल. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने, डॉ. अतुल पाटणे शासनाचे प्रधान सचिव.

जोडपत्र "क"

(नियम ३ पहा)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळविण्याच्या अर्जाचा नमुना

प्रति,

राज्य जन माहिती अधिकारी,

(कार्यालयाचे नाव व पत्ता)

१)	अर्जदाराचे पूर्ण नाव -	
२)	अर्जदाराचा पत्ता -	
३)	भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी -	
४)	आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील -	
५)	माहिती मागण्याचे प्रयोजन-	
६)	माहितीचा विषय - (केवळ १५० शब्दांचा वापर करावा)	
७)	माहिती ज्या कालावधीशी संबंधित आहे तो कालावधी -	
८)	आवश्यक माहिती मिळण्याचा मार्ग - (व्यक्तिश:/ नोंदणीकृत डाकेने / ई-मेलने /वैयक्तिक पेनड्राईव्हमध्ये / ऑनलाईन आरटीआयच्या बाबतीत ऑनलाईन पोर्टलद्वारे)	
९)	अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे — (असल्यास, त्याच्या पुराव्याची छायाप्रत जोडा)	
१०)	ओळख पुरावा - (नागरिकत्व सिद्ध करणारा)	

दिनांक :-

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी.

जोडपत्र "ख"

(नियम १३ पहा)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) अन्वये अपील

प्रति,

(अपिलीय प्राधिकाऱ्याचे नाव/पदनाम/पत्ता)

१	अपीलकर्त्याचे पूर्ण नाव -	
२	अपीलकर्त्याचा पत्ता -	
३	भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी -	
४	अर्जावर उत्तर दिलेल्या राज्य जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व पत्ता -	
५	अर्जाचा तपशील -	
६	ज्या आदेशाविरुद्ध अपील करावयाचे आहे त्या आदेशांचा तपशील, कोणतेही असल्यास, क्रमांकासह.	
७	प्रार्थना किंवा मागितलेला दिलासा -	
८	प्रार्थनेची किंवा दिलाशाची कारणे -	
९	अपिलाशी संबंधित असणारी कोणतीही अन्य माहिती-	
१०	ओळख पुरावा - (नागरिकत्व सिद्ध करणारा)	

दिनांक :-

ठिकाण :- अपीलकर्त्याची स्वाक्षरी.

जोडपत्र "ग"

(नियम ५ (२) पहा)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील

प्रति,

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,

----------येथील खंडपीठ

पत्ता : ----------

(१) अपीलकर्त्याचे पूर्ण नाव:

(२) पत्ता:

(३) अपीलकर्त्याचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल पत्ता:

(४) अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे (असल्यास, त्याच्या वैध पुराव्याची छायाप्रत जोडावी.):

(५) संबंधित राज्य जन माहिती अधिकाऱ्याचा तपशील व पत्ता:

(६) संबंधित प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचा तपशील व पत्ता:

(७) जर अपीलकर्ता त्रयस्थ पक्ष असेल तर, मूळ अर्जदाराचे नाव व पत्ता:

(८) माहिती मागणाऱ्या अर्जाचा तपशील -

(क) अर्जाचा दिनांक:

(ख) माहितीचा तपशील -

(एक) माहितीचा विषय:

(दोन) माहिती ज्या कालावधीशी संबंधित आहे तो कालावधी:

(तीन) आवश्यक असलेल्या विशिष्ट माहितीचे वर्णन:

(ग) माहिती डाकेने किंवा व्यक्तिश: हवी आहे किंवा कसे:

(घ) डाकेने हवी असल्यास (सर्वसाधारण / नोंदणीकृत / शीघ्र डाकेने):

(ङ) अर्ज (जोडपत्र-क) सहायक जन माहिती अधिकाऱ्यास दिलेला आहे किंवा कसे:

(च) सहायक जन माहिती अधिकाऱ्यास अर्ज मिळाल्याचा दिनांक:

(छ) जन माहिती अधिकाऱ्यास अर्ज मिळाल्याचा दिनांक:

(ज) जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक:

(झ) जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर मिळाल्याचा दिनांक: होय/नाही

(९) प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे केलेल्या प्रथम अपिलाचा तपशील -

(क) प्रथम अपिलाचा दिनांक:

(ख) प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यास प्रथम अपील मिळाल्याचा दिनांक:

(ग) प्रथम अपील (जोडपत्र-ख) सहायक जन माहिती अधिकाऱ्यास दिलेले आहे किंवा कसे: होय/नाही

(घ) अर्जदाराला प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचा आदेश मिळाल्याचा दिनांक:

(१०) अपील दाखल करण्याची शेवटची तारीख:

(११) अपिलाची कारणे:

(१२) प्रार्थना किंवा मागितलेला दिलासा:

(१३) प्रार्थनेची किंवा दिलाशाची कारणे:

(१४) (अ) सुनावणीस व्यक्तिश: उपस्थिती: होय/नाही

(ब) (एक) सुनावणीस ऑनलाईन उपस्थिती: होय/नाही

(दोन) असल्यास, ऑनलाईन सुनावणीसाठी ई-मेल पत्ता किंवा भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा:

(१५) कलम १८ अन्वये दाखल केलेल्या तक्रारीचा तपशील, कोणताही असल्यास:

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची स्वाक्षरी.

सत्यापन

मी, _____(अपीलकर्त्याचे नाव), ---------- यांचा/ यांची मुलगा/मुलगी/पत्नी, राहणार(पत्ता) _____ याद्वारे असे घोषित करतो/करते की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहे आणि मी, याच अर्जाच्या संबंधात राज्य माहिती आयोगाकडे कलम १९ (३) अन्वये कोणतेही द्वितीय अपील दाखल केलेले नाही आणि मी कोणतेही महत्त्वाचे तथ्य लपवले नाही.

ठिकाण :

दिनांक : अपीलकर्त्याची स्वाक्षरी.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
१९वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

क्रमांक: साप्रवि- १२०२०/०४/२०२५-साप्रवि(कक्ष-६) दिनांक: १२ जून,२०२६

प्रति,

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय,
चर्नी रोड, मुंबई - ४०० ०३२.

विषय- महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ ची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबत...

महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ अधिक्रमित करून महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ प्रसिद्ध करण्यासाठी या नियमांच्या अधिसूचनेच्या मराठी व इंग्रजी प्रती सोबत जोडण्यात आल्या आहेत. सदर अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ मध्ये तातडीने प्रसिध्द करावी व त्याच्या ३०० प्रती या विभागास व प्रत्येकी १० प्रति सर्व मंत्रालयीन विभागांना उपलब्ध करुन दयाव्यात, अशी विनंती आहे.

आपला,

(हेमंत महाजन)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-
कार्यासन ६ संग्रहार्थ.

NOTIFICATION

General Department, Administration
Mantralaya, Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk, Mumbai32,
Dated the 2026.

Right to Information Act, 2005.

No. GAD/ 12020/4/2025-GAD-DESK-6.- In exercise of the powers conferred by clause *(f)* of sub-section *(3)* of section 18, sub-section *(10)* of section 19 and sub-section *(2)* of section 27 of the Right to Information Act, 2005 (22 of 2005) and in supersession of all the existing rules issued in that behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules, namely:-

1. Short title and commencement.-

(1) These rules may be called the Maharashtra Right to Information Rules, 2026.

(2) They shall come into force on the date of their publication in the *Official Gazette.*

2. Definitions – (1) In these rules, unless the context otherwise requires -

(a) **"Act"** means the Right to Information Act, 2005 (22 of 2005);

(b) **"appeal"** means an appeal made to the First Appellate Authority and to the Commission under sub-section *(1)* and *(3)*, respectively, of section 19;

(c) **"Appellant**" means a person who has filed an appeal;

(d) **"Authorised representative"** means a person who is authorised in writing by a party to a proceeding before the Commission to represent him in the proceeding;

(e) **"Commissioner"** means the State Chief Information Commissioner or the State Information Commissioner, as the case may be, appointed under sub-section *(3)* of section 15;

(f) **"complaint"** means the complaint made under section 18;

(g) **"complainant"** means the person who has made complaint under section 18;

(h) **"regulations"** means the regulations made by the State Chief Information Commissioner under the Act;

(i) **"State Information Commission** or **Commission"** means the State Information Commission constituted under sub-section (1) of Section 15 of the Act;

(j) **"First Appellate Authority"** means an officer in the public authority who is senior in rank to the Central Public Information Officer to whom an appeal under sub-section (1) of Section 19 of the Act lies;

(k) **"section"** means a Section of the Act;

(l) **"personal information"** means any information which relates to an identifiable individual, whether directly or indirectly, and which, either by itself or in combination with other information available or likely to be available, is capable of identifying such individual.

(2) words and expressions used herein but not defined in these rules shall have the same meanings as respectively assigned to them in the Act.

3. Procedure for seeking Information .- A request for obtaining information under sub-section *(1)* of Section 6 of the Act shall be made to the concerned State Public Information Officer in the format given in Annexure "A" on a plain paper and shall be accompanied by an application fee of rupees thirty.

4. Fees for providing information.- Fee for providing information under sub-section *(4)* of Section 4 and sub-sections *(1)* and *(5)* of Section 7 of the Act shall be charged at the following rates, namely :-

(a) rupees five for each page in A-4 or smaller size paper;

(b) actual cost or price of a photocopy in large size paper,

(c) actual cost or price for samples or models:

(d) rupees five for each page of digital / scan copies;

(e) price fixed for a publication or rupees five per page of photocopy for extracts from the publication;

(f) no fee for inspection of records for the first hour of inspection and a fee of rupees fifty for each subsequent hour or fraction thereof; and

(g) rupees fifty for postal charge or actual cost involved in supply of information that exceeds fifty rupees.

5. Exemption from payment of fee.- No fee under rule 3 and rule 4 shall be charged from any person who is below poverty line, provided a copy of the certificate issued by the appropriate Government in this regard is submitted along with the application:

Provided that if the information sought by a person below the poverty line is of a voluminous nature, the first fifty pages of such information shall be provided free of cost, and for the remaining pages, fees shall be charged at the rates specified in rule 4.

6. Mode of Payment of fee - Fees under these rules may be paid in any of the following manner, namely:-

(a) in cash, to the public authority against a proper receipt; or

(b) by affixing a court fee stamp of the prescribed value on the application; or

(c) by demand draft or bankers cheque or Indian Postal Order payable to the Accounts Officer of the public authority; or

(d) in treasury under the budget head "0070-other administrative services, 60-other services, 800 other receipt (18) right to information (0070-0161)"or

(e) by electronic means or UPI in respect of online RTI application ; or

(f) by electronic means or UPI to the Accounts Officer of the public authority, if facility for receiving fees through electronic means is available with the public authority.

7. Request relate only to single subject matter.- A request in writing for information under section 6 of the Act shall relate to one subject matter and it shall not ordinarily exceed one hundred and fifty words. If an applicant wishes to seek information on more than one subject matter, he shall make separate applications:

Provided that, in case the request made relates to more than one subject matter, the Public Information Officer may respond to the request relating to the first subject matter only and may advice the applicant to make a separate application for each of the other subject matters.

8. Procedure for seeking inspection of record.-

(a) If after having considered the application filed by the applicant for seeking inspection of record under sub-section *(1)* of section 6, the Public Information Officer find it appropriate, the applicant may be granted permission to inspect the record and if he grants such permission the Public Information Officer shall requisition the record desired by the applicant for perusal, from the concerned section of the Department and shall give the same to the applicant for inspection in his presence or in the presence of his authorised representative, during office hours.

(b) While inspecting such record, the applicant shall be allowed to use pencil only and the information desired by the applicant shall be noted by him by pencil only and if the applicant bring any writing instruments other than a pencil, he shall deposit the same with the Public Information Officer and, thereafter, he shall be allowed to inspect the record. The applicant shall not make any marking on the record by the pencil he is allowed to use during inspection".

9. Requirement of proof of identity proving citizenship .- Every applicant shall be required to attach a self-attested copy of a photo identity proof along with the application made under sub-section *(1*) of Section 6 of the Act.

If an application is received without an identity proof, the Public Information Officer may return such application to the applicant for compliance.

10. Disposal of repeated requests .- Where the information sought by an applicant has already been provided to the same applicant earlier under the provisions of the Act, the Public Information Officer may dispose of such repeated application by referring to the earlier correspondence and the information already furnished.

11. Responsibility for suo motu disclosure.-

(a) The responsibility for ensuring compliance with the provisions of clause (a) and clause (b) of sub-section (1) of section 4 of Act, relating to *suo motu* disclosure of information, shall vest with the Head of Office of the concerned Public Authority.

(b) Where, upon receipt of an application under the Act, the Public Information Officer is of the opinion that the information sought is of the nature required to be published suo motu under clause *(b)* of sub-section *(1)* of section 4 of the Act, but has not been so published, he shall, in addition to processing the application in accordance with the provisions of the Act, bring such non-compliance to the notice of the Head of Office of the concerned Public Authority for appropriate corrective action.

(c) Failure to publish or proactively disclose information as mandated under the said provisions shall be deemed to be dereliction of duty, and responsibility shall be fixed on the Head of Office, who shall be liable for initiation of disciplinary proceedings in accordance with the applicable service rules.

12. Information available on Official Website.- Where the information requested by the applicant is already available on the official website of the Government or of the concerned public authority, the Public Information Officer shall inform the applicant to obtain such information directly from the website.

The Public Information Officer shall also have the authority to decline attestation of such information available online.

13. Exemption of personal information.-

"Personal information, as defined under these rules, shall be exempt from disclosure under the Act, in accordance with clause *(j)* of sub-section *(1)* of section 8 of the Act, where such information has no relationship to any public activity or public interest, or where the disclosure of such information would cause an unwarranted invasion of the privacy of the individual concerned:

Provided that such personal information may be disclosed if the competent authority is satisfied that a larger public interest justifies such disclosure, and the reasons for such satisfaction shall be recorded in writing.

Provided further that the burden of establishing the existence of such larger public interest shall lie on the applicant seeking the information, and mere assertion of public interest shall not be sufficient."

14. Acceptance of electronic communication.- Any communication made or information provided by the Public Information Officer through e-mail or through any other electronic mode shall be deemed to be valid communication or delivery of information under the Act.

15. Appeal to the First Appellate Authority –

(1) Any person aggrieved by an order passed by the State Public Information Officer or by non-disposal of his application by the State Public Information Officer, may file an appeal under sub-section *(1)* of section 19 to the First Appellate Authority in the format given in Annexure "B" on a plain paper and shall be accompanied by an appeal fee of rupees fifty and paid in such manner as prescribed in rule 6.

(2) An appeal to the First Appellate Authority shall be duly authenticated and verified by the appellant and accompanied by the following self-attested documents, namely :-

(i) a copy of the application submitted to the State Public information Officer,

(ii) a copy of the reply received, if any, from the State Public Information Officer and proof of submission of application,

(iii) an index of the documents referred to in the appeal,

(iv) copies of other documents referred to in his application and relied upon by the applicant.

16. Appeal to the State Information Commission.-

(1) Appeal under sub-section *(3)* of section 19 to the State Information Commission shall be filed, on plain paper in the format given in Annexure "C" which shall be accompanied by an appeal fee of rupees hundred and paid in such manner as prescribed in rule 6.

(2) An appeal to the State Information Commission shall be duly authenticated and verified by the appellant and accompanied by the following self-attested documents, namely :-

(i) (a) a copy of the application submitted to the State Public Information Officer;

(b) copy of the documents referred to or relied in an application;

(ii) proof of submission of application to the concerned State Public Information Officer;

(iii) a copy of the reply received, if any, from the concerned State Public Information Officer;

(iv) a copy of the appeal made to the First Appellate Authority;

(v) proof of submission of appeal to the First Appellate Authority;

(vi) original copy of the order received, if any, from the First Appellate Authority;

(vii) an index of the documents referred to in the appeal and relied upon by the appellant; and

(viii) copies of such other documents referred to in his appeal, and relied upon, by the appellant.

(3) An appeal to the State Information Commission should be written, typed or printed neatly and legible on the plain paper and the appeal and documents to be presented along with it shall be filed in three set of copies for respondents.

17. Return of appeal.- An appeal may be returned to the appellant, if it is not accompanied by the documents as specified in sub-rule *(2)* of rule 15 or sub-rule*(2)* and *(3)* of rule 16 or if any other deficiency is noticed by the officer of the Commission, for removing the deficiency and filing the appeal complete in all respects within fifteen days from the date of receipt of letter requesting removing the deficiency:

Provided that, where the reply of the State Public Information Officer or order of the First Appellate Authority is not received within the period prescribed in the Act, the appeal shall not be returned on that ground under this rule.

18. Process of appeal to the Commission.-

(1) If the officer of Commission is of the view that the appeal is in accordance with the provisions of the Act, the rules and the regulations, the appeal be numbered and entered in a register maintained for the purpose and the officer shall direct the Public Information Officer and First Appellate Authority to furnish the written statement or report along with copies of all the documents relating thereto with reference to the appeal, within fifteen days from date of receipt of letter containing the direction. On receipt of report or if no report is received within the aforesaid period, the date for the hearing of the appeal may be fixed.

(2) The Commission shall not consider an appeal unless it is satisfied that the appellant has availed of all the remedies available to him under the Act.

(3) For the purposes of sub-rule *(2)*, a person shall be deemed to have availed of all the remedies available to him under the Act,-

(a) if he had filed an appeal before the First Appellate Authority and the First Appellate Authority had made a final order on the appeal; or

(b) where no final order has been made by the First Appellate Authority with regard to the appeal preferred, and a period of forty five days from the date on which such appeal was received by it has elapsed.

19. Notice of appeal or complaint.-

(1) The Commission may serve notice of appeal or complaint to the persons concerned in any of the following modes, namely:-

(a) by hand delivery;

(b) by Registered Post, Speed Post, Under Postal Certificate, Courier or such similar other means;

(c) by electronic mail, if e-mail address is provided; or by mobile phone by any messaging system;

(d) by publication in the newspaper; or

(e) in any other manner as the Chief Information Commissioner may, by general or special order, direct.

(2) The service of notice in any of the manner mentioned under sub-rule *(1)* shall be deemed to be valid service of notice.

20. Personal presence of the appellant or complainant.-

(1) The appellant or the complainant, as the case may be, shall in every case be informed of the date of hearing at least seven clear days before that date.

(2) The appellant or the complainant or respondent may at his discretion at the time of hearing of the appeal or complaint by the Commission be present in person or through his duly authorized representative:

Provided that, the appellant or complainant or respondents may present the case through video conferencing, if all the relevant documents therefor are submitted two days prior to the date of hearing and the facility of video conferencing is available, at the time of hearing of the appeal by the Commission.

(3) The appellant or the complainant, as the case may be, may seek the assistance of any person in the process of the appeal, in the manner as may be provided therefor, while presenting his points and the person representing him may not be a legal practitioner.

21. Procedure for deciding appeals.-

(1) The Commission, while deciding an appeal may,-

(i) receive oral or written evidence on oath or on affidavit from concerned or interested person;

(ii) peruse or inspect documents, public records or copies thereof;

(iii) inquire through authorized officer further details or facts;

(iv) hear State Public Information Officer, State Assistant Public Information Officer or the First Appellate Authority, or such person against whose action the appeal is preferred, as the case may be ;

(v) hear third party; or

(vi) receive evidence on affidavit from State Public Information Officer, State Assistant Public Information officer, First Appellate Authority and such other person against whom the appeal lies or the third party or any other person concerned in relation to application.

(2) Where the Commission is satisfied that the circumstances exist due to which the appellant or the complainant, as the case may be, is being prevented from attending the hearing of the Commission, then, the Commission may afford the appellant or the complainant, as the case may be, another opportunity of being heard before a final decision is taken or take any other appropriate action as it may deem fit.

(3) Where the appellant or, as the case may be, complainant does not appear persistently either personally or online, when the second appeal or complaint is called on for hearing, the Commission may, after recording the reasons, apply the provisions of Rule 17 of Order XLI of the Civil Procedure Code, 1908 and make an order that the Appeal or complaint be dismissed for non- prosecution:

Provided that, where an appeal or complaint is so dismissed for non-prosecution under this sub-rule, the Appellant or complainant may apply, within a period of thirty days from the date of receipt of the order for dismissal, for an order to set the dismissal aside, and if the appellant or complaint satisfies the Commission that there was sufficient cause for his non-appearance, the

Commission may make an order setting aside the dismissal and shall appoint a day for proceeding with the appeal or the complaint:

Provided further that, no order shall be set aside on any such application as aforesaid unless notice thereof has been served on the opposite party.

(4) Notwithstanding anything contained in sub-rule (3), where the Commission is of the view that a substantial question regarding denial of information is involved, it may proceed to decide the matter on the basis of record available.

(5) Nothing in this rule shall prevent the Commission, in respect of the second appeal, from calling for the records or directing disclosure of information were warranted under the Act, irrespective of the presence of the appellant**.**

22. Burden of Proof.-

(1) Save as otherwise provided by or under the Act in case of appeal or complaint before the Commission, the burden of proof shall lie upon the party asserting a fact.

(2) In complaint under section 18 or appeal under section 19,-

(a) the complainant or appellant shall prove and establish the denial, delay, or incorrect information, or any other ground pleaded therein;

(b) the state public information officer, the First Appellate Authority or the public authority, as the case may be, shall justify its action as per sub-section *(5)* of section 19.

(3) The Commission shall decide the matters solely on the basis of pleadings, arguments and evidence placed on the record.

23. Withdrawal or abatement of appeal.-

(1) The State Information Commission may, on a written request made by the appellant, allow the appeal to be withdrawn:

Provided that, in case where the written request made by the appellant is received by the Commission after the notice for hearing is issued, the Commission may impose a reasonable cost to be paid by the appellant for wasting the resources of the Commission and its expenses and recover the same as an arrears of land revenue.

(2) As the right to information is available only to the particular applicant citizen of India who has requested the information, the proceedings pending before the State Information Commission in respect of second appeal filed by such person shall abate on the death of the appellant, where the respondent produces the evidence that the appellant is dead or the Commission comes to such conclusion on the basis of record available to it.

24. Order of the State Information Commission.- The order of the State Information Commission shall be in writing and issued under the seal of the Commission duly authenticated by any officer authorized by the Commission for this purpose.

25. Procedure for complaint - The provisions of above rules 17 to 24 shall mutatis mutandis apply for the complaint filed before the Commission under section 18.

26. Inherent procedural powers of the Commission.-

(1) Nothing in these rules shall be deemed to limit the power of the State Information Commission, while conducting an inquiry under section 18 or deciding a second appeal under sub-section *(3)* of section 19 of the Act, to pass such incidental or ancillary procedural orders, consistent with the provisions of the Act, after giving the reasonable opportunity of being heard to all the parties, as

may be necessary to secure the ends of justice or to prevent abuse of the process of the Commission.

(2) The Commission may, at any time, either of its own or on an application of any of the parties, correct any clerical or arithmetical mistake or any error arising from an accidental slip or omission in any order or record relating to a complaint under section 18 or a second appeal under sub-section *(3)* of section 19.

(3) Where any correction is made under sub-rule *(2)*, a copy of the corrected order shall be communicated to the concerned parties and uploaded on the website of the Commission.

27. **Presentation by the public authority.-** The public authority may authorise any representative or any of its officers to present its case.

By order in the name of the Governor of Maharashtra,

Dr. Atul Patane
Principal Secretary to the Government.

ANNEXURE "A"

(See Rule 3)

Format of application for obtaining information under the Right to Information Act, 2005)

To,

The State Public Information Officer,

(Name of the office with address)

1)	Full name of the Applicant -	
2)	Address of the Applicant -	
3)	Mobile No & Email-id	
4)	Particulars of information required -	
5)	Purpose of Information Sought -	
6)	Subject matter of information - (Use only 150 words)	
7)	The period to which the information relates -	
8)	Mode of required information - (In person / by registered post / by e-mail / in personal pen drive / through Online Portal-in case of online RTI)	
9)	Whether the applicant is below poverty line - (If yes, attach the photo copy of the proof thereof)	
10)	Proof of Identity-	

Date:-

Place :- Signature of the Applicant.

ANNEXURE "B"

(See Rule 13)

Appeal under under section 19 (1) of the Right to Information Act, 2005

To,

(Name/designation/address of the appellate authority)

1	Full name of the Appellant -	
2	Address of the Appellant -	
3	Mobile No & Email-id	
4	Name and address of the State Public Information Officer who gave reply to the Application -	
5	Particulars of the Application	
6	Particulars of the orders including number, if any, against which the appeal is preferred-	
7	Prayer or relief Sought	
8	Grounds for the prayer or relief -	
9	Any other information relevant to the appeal	
10	Proof of Identity- (proving citizenship)	

Date:-

Place :- Signature of the Appellant.

"ANNEXURE 'C"

(*See* rule 5(*2*))

Second Appeal under section 19 *(3)* of the Right to Information Act, 2005.

To,

Maharashtra State Information Commission,

Bench at ----------

Address:----------

(1) Full name of the Appellant :

(2) Address :

(3) Mobile number and Email address of Appellant :

(4) Whether the applicant is below poverty line

(if yes, attach the photocopy of the valid proof thereof.) :

(5) Particulars of concerned State Public Information Officer with address :

(6) Particulars of the concerned First Appellate Authority with address :

(7) Name and Address of the original Applicant, if appellant is Third Party :

(8) Details of the Application seeking information-

(a) Date of Application :

(b) Particulars of information- :

(i) Subject matter of information. :

(ii) The period to which the information relates :

(iii) Description of the Specific information required :

(c) Whether information is required by post or in person :

(d) In case by post (Ordinary, Registered or Speed) :

(e) Whether Application (Annexure-A) is given to Assistant Public Information Officer :

(f) Date of receipt of the Application by the Assistant Public Information Officer :

(g) Date of receipt of the Application by the Public Information Officer :

(h) Date of reply of the Public Information Officer :

(i) Date of receipt of reply of the Public Information Officer : Yes/No

(9) Details of the First Appeal to the First Appellate Authority-

(a) Date of First Appeal

(b) Date of receipt of the First Appeal by the First Appellate Authority

(c) Whether First Appeal (Annexure-B) is given to Assistant Public Information Officer : Yes/No

*(d)*The date of receipt of order of First Appellate Authority by Applicant :

(10) Last date for filing the appeal :

(11) The grounds for appeal :

(12) Prayer or relief sought :

(13) Grounds for prayer/relief sought for :

(14) *(a)* Personal Presence at hearing:- Yes/No

(b) (i) Online Presence at hearing:- Yes/No

(ii) If yes mention here email address or mobile number for online hearing:

(15) Details of complaint filed under section 18, if any :

Place :

Date : Signature of the Applicant.

Verification

I,_____ (Name of the appellant), son of / daughter of / wife of _____ resident of _____(address) hereby declare that the Information as provided above is true to the best of my knowledge and no second Appeal under section 19 (3) is filed before the State Information Commission regarding the same application and that I have not suppressed any material fact.

Place :

Date : Signature of Appellant.

अधिसूचना

सामान्य, प्रशासन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ३२,

दिनांक : एप्रिल २०२६.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५.

क्र. साप्रवि १२०२०/४/२०२५-माहिती (कार्या-६).- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) च्या कलम १८ च्या उपकलम *(३)* च्या खंड *(च)*, कलम १९ च्या उपकलम *(१०)* आणि कलम २७ च्या उपकलम *(२)* अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि या संदर्भात जारी करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे खालील नियम करीत आहेत :-

1. संक्षिप्त नाव आणि प्रारंभ.-

(१) या नियमांना महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ असे म्हणावे.

(२) हे नियम शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

२. व्याख्या.-

(१) या नियमांमध्ये, संदर्भाने अन्यथा अपेक्षित नसेल तर,-

(क) "अधिनियम" म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२);

(ख) "अपील" म्हणजे कलम १९ च्या उपकलम *(१)* आणि उपकलम *(३)* अन्वये अनुक्रमे प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याकडे आणि आयोगाकडे केलेले अपील;

(ग) "अपीलकर्ता" म्हणजे अपील दाखल करणारा व्यक्ती;

(घ) "प्राधिकृत प्रतिनिधी" म्हणजे आयोगासमोरील कार्यवाहीत त्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पक्षकाराने लेखी स्वरूपात प्राधिकृत केलेली व्यक्ती;

(ङ) "आयुक्त" म्हणजे कलम १५ च्या उपकलम *(३)* अन्वये नियुक्त करण्यात आलेले राज्य मुख्य माहिती आयुक्त किंवा, यथाप्रसंग, राज्य माहिती आयुक्त;

(च) "तक्रार" म्हणजे कलम १८ अन्वये केलेली तक्रार;

(छ) "तक्रारदार" म्हणजे कलम १८ अन्वये तक्रार केलेली व्यक्ती;

(ज) "विनियम" म्हणजे अधिनियमान्वये राज्य मुख्य माहिती आयुक्तांनी केलेले विनियम;

(झ) "राज्य माहिती आयोग किंवा आयोग" म्हणजे अधिनियमाच्या कलम १५ च्या उपकलम *(१)* अन्वये स्थापन करण्यात आलेला राज्य माहिती आयोग;

(ञ) "प्रथम अपीलीय प्राधिकरण" म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणातील असा अधिकारी जो अधिनियमाच्या कलम १९ च्या उपकलम *(१)* अन्वये अपील करण्यायोग्य राज्य जन माहिती अधिकाऱ्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा असेल;

(ट) "कलम" म्हणजे अधिनियमाचे कलम;

(ठ) "वैयक्तिक माहिती" म्हणजे अशी कोणतीही माहिती जी, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, एखाद्या ओळखण्यायोग्य व्यक्तीशी संबंधित असेल आणि जी स्वतः किंवा उपलब्ध असलेल्या किंवा उपलब्ध होण्याची शक्यता असलेल्या इतर माहितीच्या संयोगाने, अशा व्यक्तीची ओळख पटविण्यास सक्षम असेल.

(२) या नियमांमध्ये वापरलेले परंतु परिभाषित न केलेले शब्द व अभिव्यक्ती यांचे अर्थ अधिनियमामध्ये त्यांना अनुक्रमे नेमून दिलेले असतील तेच असतील.

३. माहिती मिळविण्याची कार्यपद्धती.-

अधिनियमाच्या कलम ६ च्या उपकलम *(१)* अन्वये माहिती प्राप्त करण्यासाठीची विनंती, परिशिष्ट "**अ**" मध्ये दिलेल्या नमुन्यात, साध्या कागदावर संबंधित राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे करण्यात येईल आणि त्यासोबत तीस रुपये अर्ज शुल्क भरावे लागेल.

४. माहिती पुरविण्यासाठी शुल्क.-

अधिनियमाच्या कलम ४ च्या उपकलम *(४)* आणि कलम ७ च्या उपकलम *(१)* व उपकलम *(५)* अन्वये माहिती पुरविण्यासाठी खालील दराने शुल्क आकारण्यात येईल :-

(क) ए-४ किंवा त्यापेक्षा लहान आकाराच्या कागदावरील प्रत्येक पानासाठी पाच रुपये;

(ख) मोठ्या आकाराच्या कागदावरील छायाप्रतीची प्रत्यक्ष किंमत किंवा मूल्य;

(ग) नमुने किंवा प्रतिकृतींसाठी प्रत्यक्ष किंमत किंवा मूल्य;

(घ) डिजिटल / स्कॅन प्रतींच्या प्रत्येक पानासाठी पाच रुपये;

(ङ) प्रकाशनासाठी निश्चित केलेली किंमत किंवा प्रकाशनातील उताऱ्याच्या छायाप्रतीसाठी प्रति पान पाच रुपये;

(च) अभिलेखाच्या पाहणीच्या पहिल्या एका तासासाठी कोणतेही शुल्क नाही आणि त्यानंतरच्या प्रत्येक तासासाठी किंवा त्याच्या अंशासाठी पन्नास रुपये शुल्क; आणि

(छ) पन्नास रुपये टपाल शुल्क किंवा माहिती पुरविण्यासाठी येणारा प्रत्यक्ष टपाल खर्च.

५. शुल्क भरण्यातून सूट.-

दारिद्र्यरेषेखालील कोणत्याही व्यक्तीकडून नियम ३ आणि नियम ४ अन्वये कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही, परंतु त्यासाठी संबंधित शासनाने या संदर्भात दिलेल्या प्रमाणपत्राची स्वयंप्रमाणित प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील:

परंतु, दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असल्यास, अशा माहितीची पहिली पन्नास पाने विनामूल्य पुरविण्यात येतील आणि उर्वरित पानांसाठी नियम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने शुल्क आकारण्यात येईल.

६. शुल्क भरण्याची पद्धत.-

या नियमांअन्वये शुल्क खालीलपैकी कोणत्याही प्रकारे भरता येईल :-

(क) सार्वजनिक प्राधिकरणाकडे रोखीने, रीतसर पावती घेऊन; किंवा

(ख) अर्जावर विहित रकमेचे न्यायालय फी मुद्रांक चिटकवून; किंवा

(ग) सार्वजनिक प्राधिकरणाच्या लेखा अधिकाऱ्याच्या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा बँकर्स चेकद्वारे किंवा भारतीय टपाल आदेशाद्वारे; किंवा

(घ) "००७०-इतर प्रशासकीय सेवा, ६०-इतर सेवा, ८०० - इतर जमा रक्कमा (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६१)" या लेखाशीर्षाखाली कोषागारात; किंवा

(ङ) ऑनलाईन आरटीआय अर्जासंदर्भात इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे किंवा युपीआयद्वारे; किंवा

(च) सार्वजनिक प्राधिकरणाकडे इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे शुल्क स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध असल्यास, सार्वजनिक प्राधिकरणाच्या लेखा अधिकाऱ्याकडे इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे किंवा युपीआयद्वारे.

७. अर्ज केवळ एकाच विषयाशी संबंधित असावा.-

अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहितीसाठी केलेला लेखी अर्ज एकाच विषयाशी संबंधित असावा आणि तो साधारणतः एकशे पन्नास शब्दांपेक्षा जास्त नसावा. एखाद्या अर्जदाराला एकापेक्षा जास्त विषयावर माहिती मागावयाची असल्यास, त्याने स्वतंत्र अर्ज करावेत :

परंतु, एखाद्या अर्जात एकापेक्षा जास्त विषयाशी संबंधित माहितीची मागणी केली असल्यास, जन माहिती अधिकारी केवळ पहिल्या विषयाशी संबंधित मागणीवर उत्तर देईल आणि इतर प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र अर्ज करण्याचा सल्ला अर्जदारास देऊ शकेल.

८. अभिलेखाच्या पाहणीसाठी प्रक्रिया.-

(क) कलम ६ च्या उपकलम *(१)* अन्वये अभिलेखाच्या पाहणीसाठी अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जाचा विचार केल्यानंतर, जन माहिती अधिकाऱ्यांना योग्य वाटल्यास, अर्जदारास अभिलेख पाहण्याची परवानगी दिली जाऊ शकते आणि अशी परवानगी दिल्यास, जन माहिती अधिकारी विभागाच्या संबंधित शाखेकडून अर्जदारास हवे असलेले अभिलेख मागवतील आणि ते कार्यालयीन वेळेत अर्जदारास किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीस त्यांच्या उपस्थितीत पाहणीसाठी देतील.

(ख) असे अभिलेख पाहताना, अर्जदारास केवळ पेन्सिलचाच वापर करण्यास परवानगी असेल आणि अर्जदारास हवी असलेली माहिती केवळ पेन्सिलनेच नोंदविता येईल; अर्जदाराकडे पेन्सिलव्यतिरिक्त अन्य कोणतेही लेखन साहित्य असल्यास, ते जन माहिती अधिकाऱ्याकडे जमा करावे लागेल आणि त्यानंतरच त्यास अभिलेख पाहण्याची परवानगी मिळेल. अर्जदाराने पेन्सिलने अभिलेखावर कोणतेही चिन्ह करू नये.

९. नागरिकत्व सिद्ध करणाऱ्या ओळखपत्राची आवश्यकता.-

प्रत्येक अर्जदारास अधिनियमाच्या कलम ६ च्या उपकलम *(१)* अन्वये केलेल्या अर्जासोबत नागरिकत्व सिद्ध करणाऱ्या छायाचित्र असलेल्या ओळखपत्राची स्वयंप्रमाणित प्रत जोडणे आवश्यक राहील.

ओळखपत्राशिवाय अर्ज प्राप्त झाल्यास, जन माहिती अधिकारी अर्जदारास आवश्यक ते पालन करण्यासाठी असा अर्ज परत करू शकेल.

१०. पुनरावृत्त अर्ज निकाली काढणे.-

अधिनियमाच्या तरतुदींखाली अर्जदाराने मागितलेली माहिती त्याच अर्जदाराला यापूर्वीच पुरविण्यात आली असल्यास, जन माहिती अधिकारी मागील पत्रव्यवहाराचा आणि आधीच पुरविण्यात आलेल्या माहितीचा संदर्भ देऊन असा पुनरावृत्त अर्ज निकाली काढू शकेल.

११. स्वयंप्रेरणेने माहिती प्रकटीकरणाची जबाबदारी.-

(क) स्वयंप्रेरणेने माहितीच्या प्रकटीकरणासंदर्भात अधिनियमाच्या कलम ४ च्या उपकलम *(१)* च्या खंड *(क)* आणि खंड *(ख)* मधील तरतुदींचे पालन सुनिश्चित करण्याची जबाबदारी, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालय प्रमुखावर असेल.

(ख) जेथे अधिनियमाखाली अर्ज प्राप्त झाल्यावर, जन माहिती अधिकाऱ्यांच्या मते मागितलेली माहिती ही अधिनियमाच्या कलम ४ च्या उपकलम (१) च्या खंड (ख) अन्वये स्वयंप्रेरणेने प्रकाशित करण्याच्या स्वरूपाची आहे, परंतु ती अद्याप प्रकाशित केलेली नाही, तेथे जन माहिती अधिकारी अधिनियमाच्या तरतुदींनुसार अर्जावर प्रक्रिया करण्याव्यतिरिक्त, असे पालन न झाल्याचे संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालय प्रमुखाच्या निदर्शनास आणून देतील.

(ग) उक्त तरतुदींखाली अनिवार्य असलेली माहिती प्रकाशित न करणे किंवा स्वयंप्रेरणेने जाहीर न करणे ही कर्तव्यातील कसूरी मानली जाईल आणि त्यासाठी कार्यालय प्रमुखावर जबाबदारी निश्चित केली जाईल; आणि ते त्यांना लागू असलेल्या सेवा नियमांनुसार शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असतील.

१२. अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध माहिती.-

अर्जदाराने मागितलेली माहिती शासनाच्या किंवा संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर आधीच उपलब्ध असल्यास, जन माहिती अधिकारी अर्जदारास ती माहिती थेट संकेतस्थळावरून मिळविण्यास सूचित करतील.

जन माहिती अधिकाऱ्यांना ऑनलाईन उपलब्ध अशा माहितीच्या साक्षांकनास नकार देण्याचाही अधिकार असेल.

१३. वैयक्तिक माहितीतून सूट.-

"अधिनियमाच्या कलम ८ च्या उपकलम *(१)* च्या खंड *(त्र)* नुसार, जी माहिती कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबधाशी संबंधित नसेल किंवा जेथे अशा माहितीचे प्रकटीकरण केल्यास संबंधित व्यक्तीच्या गोपनीयतेचे अनुचित उल्लंघन होईल अशी या नियमांमध्ये परिभाषित केल्यानुसारची वैयक्तिक माहिती या अधिनियमांतर्गत प्रकटीकरणातून मुक्त राहील:

परंतु, सक्षम प्राधिकाऱ्याची व्यापक सार्वजनिक हित अशा प्रकटीकरणाचे समर्थन करते अशी खात्री झाल्यास, अशी वैयक्तिक माहिती प्रकट केली जाऊ शकते आणि अशा समाधानाची कारणे लेखी स्वरूपात नोंदविली जातील.

परंतु आणखी असे की, असे व्यापक सार्वजनिक हित अस्तित्वात असल्याचे सिद्ध करण्याची जबाबदारी माहिती मागणाऱ्या अर्जदारावर असेल आणि केवळ सार्वजनिक हिताचे ठाम प्रतिपादन पुरेसे ठरणार नाही."

१४. इलेक्ट्रॉनिक संप्रेषणाची स्वीकार्यता.-

जन माहिती अधिकाऱ्यांनी ई-मेलद्वारे किंवा इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे केलेले कोणतेही संप्रेषण किंवा पुरविलेली माहिती, अधिनियमाखालील वैध संप्रेषण किंवा माहितीचे वितरण मानले जाईल.

१५. प्रथम अपीलीय प्राधिकरणाकडे अपील.-

(१) राज्य जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाने किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याने अर्ज निकाली न काढल्यामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, परिशिष्ट "**ख**" मध्ये दिलेल्या नमुन्यात, साध्या कागदावर कलम १९ च्या उपकलम *(१)* अन्वये प्रथम अपीलीय प्राधिकरणाकडे अपील दाखल करू शकेल आणि त्यासोबत नियम ६ मध्ये विहित केल्याप्रमाणे पन्नास रुपये अपील शुल्क भरावे लागेल.

(२) प्रथम अपीलीय प्राधिकरणाकडे केलेले अपील अर्जदाराने विधिवत प्रमाणित केलेले आणि सत्यापित केलेले असावे आणि त्यासोबत खालील स्वयंप्रमाणित कागदपत्रे जोडावीत:-

(एक) राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत,

(दोन) राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडून मिळालेल्या उत्तराची प्रत, असल्यास, आणि अर्ज सादर केल्याचा पुरावा,

(तीन) अपीलात उल्लेख केलेल्या कागदपत्रांची अनुक्रमणिका,

(चार) अर्जात उल्लेख केलेल्या आणि अर्जदाराने आधारभूत मानलेल्या इतर कागदपत्रांच्या प्रती.

१६. राज्य माहिती आयोगाकडे अपील.-

(१) राज्य माहिती आयोगाकडे कलम १९ च्या उपकलम *(३)* अन्वये केलेले अपील, परिशिष्ट "**ग**" मध्ये दिलेल्या नमुन्यात, साध्या कागदावर दाखल करावे आणि त्यासोबत नियम ६ मध्ये विहित केल्याप्रमाणे शंभर रुपये अपील शुल्क भरावे लागेल.

(२) राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील अर्जदाराने विधिवत प्रमाणित केलेले आणि सत्यापित केलेले असावे आणि त्यासोबत खालील स्वयंप्रमाणित कागदपत्रे जोडावीत :-

(एक) *(अ)* राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत;

(ब) अर्जात उल्लेख केलेल्या किंवा त्यावर अवलंबून असलेल्या कागदपत्रांच्या प्रती;

(दोन) संबंधित राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज सादर केल्याचा पुरावा;

(तीन) संबंधित राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडून मिळालेल्या उत्तराची प्रत, असल्यास;

(चार) प्रथम अपीलीय प्राधिकरणाकडे केलेल्या अपीलाची प्रत;

(पाच) प्रथम अपीलीय प्राधिकरणाकडे अपील सादर केल्याचा पुरावा;

(सहा) प्रथम अपीलीय प्राधिकरणाकडून मिळालेल्या आदेशाची प्रत, असल्यास;

(सात) अपीलात उल्लेख केलेल्या आणि अपीलकर्त्याने आधारभूत मानलेल्या कागदपत्रांची अनुक्रमणिका; आणि

(आठ) अपीलकर्त्याने अपीलात उल्लेख केलेल्या आणि त्यावर अवलंबून असलेल्या इतर कागदपत्रांच्या प्रती.

(३) राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील साध्या कागदावर नीटनेटके आणि सुवाच्यपणे लिहिलेले, टाईप केलेले किंवा मुद्रित केलेले असावे आणि अपील आणि त्यासोबत सादर करावयाची कागदपत्रे प्रतिवाद्यांसाठी तीन प्रतींमध्ये दाखल करावीत.

१७. अपील परत करणे.-

नियम १५ चा उपनियम *(२)* आणि नियम १६ चे उपनियम *(२)* किंवा उपनियम *(३)* मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कागदपत्रे अपीलासोबत नसल्यास किंवा अपील प्राधिकरणाला अन्य कोणतीही त्रुटी आढळल्यास, असे अपील अर्जदारास परत केले जाऊ शकते आणि त्यास त्रुटी दूर करून पत्र मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह अपील दाखल करण्यास सांगितले जाऊ शकते:

परंतु, अधिनियमात विहित केलेल्या कालावधीत राज्य जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर किंवा प्रथम अपीलीय प्राधिकरणाचा आदेश प्राप्त न झाल्यास, या नियमाखाली त्या कारणास्तव अपील परत केले जाणार नाही.

१८. आयोगाकडे अपीलाची प्रक्रिया.-

(१) आयोगाच्या अधिकाऱ्यास अपील अधिनियमाच्या, नियमांच्या आणि विनियमांच्या तरतुदींनुसार असल्याचे आढळल्यास, त्या अपीलास क्रमांक देण्यात येईल आणि त्या उद्देशाकरिता ठेवलेल्या नोंदवहीत त्याची नोंद करण्यात येईल आणि, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय

प्राधिकरणास, अपीलाचा संदर्भ देऊन, दिशानिर्देश मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत त्याच्याशी संबंधित सर्व कागदपत्रांच्या प्रतींसह लेखी निवेदन किंवा अहवाल सादर करण्यास निर्देशित करेल. अहवाल प्राप्त झाल्यावर किंवा उक्त कालावधीत अहवाल न मिळाल्यास, अपीलाच्या सुनावणीची तारीख निश्चित केली जाऊ शकते.

(२) अर्जदाराने अधिनियमाखाली उपलब्ध सर्व उपायांचा अवलंब केल्याची खात्री झाल्याशिवाय आयोग अपीलाचा विचार करणार नाही.

(३) उपनियम *(२)* च्या प्रयोजनार्थ, खालील परिस्थितीत एखाद्या व्यक्तीने अधिनियमाखाली उपलब्ध सर्व उपायांचा अवलंब केला असे मानले जाईल,-

(क) त्याने प्रथम अपीलीय प्राधिकरणाकडे अपील दाखल केले असेल आणि प्रथम अपीलीय प्राधिकरणाने त्यावर अंतिम आदेश दिला असेल; किंवा

(ख) प्रथम अपीलीय प्राधिकरणाने दाखल केलेल्या अपीलावर अंतिम आदेश न दिल्यास आणि ते अपील प्रथम अपीलीय प्राधिकरणाकडे प्राप्त झाल्याच्या तारखेपासून पंचेचाळीस दिवसांचा कालावधी उलटला असेल.

१९. अपील किंवा तक्रारीची नोटीस.-

(१) आयोग, अपील किंवा तक्रारीची नोटीस संबंधित व्यक्तींना खालीलपैकी कोणत्याही प्रकारे बजावू शकतो :-

(क) हस्ते पोहोच करून;

(ख) नोंदणीकृत डाकेने, स्पीड पोस्टने, टपाल पावतीखाली, कुरियरद्वारे किंवा अशाच इतर साधनाद्वारे;

(ग) ई-मेल पत्ता उपलब्ध असल्यास, ई-मेलद्वारे; किंवा कोणत्याही संदेश प्रणालीद्वारे भ्रमणध्वनीवर;

(घ) वृत्तपत्रात प्रकाशनाद्वारे; किंवा

(ङ) मुख्य माहिती आयुक्त सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाने निर्देशित करतील अशा इतर कोणत्याही प्रकारे.

(२) उपनियम *(१)* अंतर्गत उल्लेख केलेल्या कोणत्याही प्रकारे नोटीसची बजावणी करणे, ही वैध बजावणी मानली जाईल.

२०. अपीलकर्ता किंवा तक्रारदाराची वैयक्तिक उपस्थिती.-

(१) अपीलकर्ता किंवा, यथाप्रसंग, तक्रारदार यांना प्रत्येक प्रकरणात सुनावणीच्या तारखेपूर्वी किमान सात स्पष्ट दिवस अगोदर सुनावणीच्या तारखेची सूचना दिली जाईल.

(२) अपीलकर्ता किंवा तक्रारदार किंवा प्रतिवादी यांना आयोगाकडे अपील किंवा तक्रारीच्या सुनावणीच्या वेळी स्वतः किंवा त्यांच्या विधिवत प्राधिकृत प्रतिनिधीद्वारे उपस्थित राहण्याचा स्वेच्छाधिकार असेल :

परंतु, अपीलकर्ता किंवा तक्रारदार किंवा प्रतिवाद्यांनी सुनावणीच्या तारखेपूर्वी दोन दिवस आधी सर्व संबंधित कागदपत्रे सादर केल्यास आणि सुनावणीच्या वेळी आयोगाकडे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगची सुविधा उपलब्ध असल्यास, ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आपली बाजू मांडू शकतात.

(३) अपीलकर्ता किंवा, यथाप्रसंग, तक्रारदार, अपीलाच्या प्रक्रियेत त्याचे मुद्दे मांडताना, विहित केल्याप्रमाणे, कोणत्याही व्यक्तीची सहाय्यता घेऊ शकतो आणि त्याचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती कायदेतज्ज्ञ असणे आवश्यक नाही.

२१. अपील निकालात काढण्याची प्रक्रिया.-

(१) आयोग, अपील निकालात काढताना,-

(एक) संबंधित किंवा इच्छुक व्यक्तीकडून शपथेवर किंवा प्रतिज्ञापत्रावर तोंडी किंवा लेखी पुरावा घेऊ शकतो;

(दोन) कागदपत्रे, सार्वजनिक अभिलेख किंवा त्यांच्या प्रती तपासू किंवा पाहू शकतो;

(तीन) प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत अधिक तपशील किंवा तथ्ये चौकशी करू शकतो;

(चार) राज्य जन माहिती अधिकारी, राज्य सहायक जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय प्राधिकरण यांचे किंवा ज्याच्या कृत्याविरुद्ध अपील दाखल आहे त्याचे, यथाप्रसंग, म्हणणे ऐकू शकतो;

(पाच) तृतीय पक्षाचे म्हणणे ऐकू शकतो; किंवा

(सहा) राज्य जन माहिती अधिकारी, राज्य सहायक जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय प्राधिकरण आणि ज्याच्याविरुद्ध अपील दाखल आहे अशी अन्य व्यक्ती, तृतीय पक्ष किंवा अर्जाशी संबंधित अन्य कोणत्याही व्यक्तीकडून प्रतिज्ञापत्रावर पुरावा घेऊ शकतो.

(२) ज्या कारणांमुळे अपीलकर्ता किंवा, यथाप्रसंग, तक्रारदारास आयोगाच्या सुनावणीस उपस्थित राहता आले नाही अशी परीस्थिती अस्तित्वात होती, अशी आयोगाची खात्री झाल्यास तेथे आयोग

अपीलकर्ता किंवा, यथाप्रसंग, तक्रारदारास अंतिम निर्णय घेण्यापूर्वी सुनावणीची आणखी एक संधी देऊ शकेल किंवा योग्य वाटेल तशी कोणतीही अन्य कारवाई करू शकेल.

(३) जेथे अपीलकर्ता किंवा, यथाप्रसंग, तक्रारदार, द्वितीय अपील किंवा तक्रार सुनावणीसाठी आल्यावर, वारंवार वैयक्तिकरित्या किंवा ऑनलाईन उपस्थित राहत नाही, तेथे आयोग कारणे नोंदवून, नागरी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश ४१ च्या नियम १७ च्या तरतुदी लागू करू शकतो आणि अपील किंवा तक्रार अभियोजन शून्यतेमुळे फेटाळण्याचा आदेश देऊ शकतो:

परंतु, जेथे या उपनियमाखाली अपील किंवा तक्रार अभियोजन शून्यतेमुळे फेटाळण्यात आली असेल, तेथे अपीलकर्ता किंवा तक्रारदार फेटाळण्याचा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत फेटाळणी रद्द करण्यासाठी अर्ज करू शकतो आणि अपीलकर्ता किंवा तक्रारदाराने त्याच्या अनुपस्थितीसाठी पुरेसे कारण असल्याचे आयोगाला पटवून दिल्यास, आयोग फेटाळणी रद्द करण्याचा आदेश देऊ शकतो आणि अपील किंवा तक्रार पुढे चालविण्यासाठी दिवस नियोजित करू शकतो :

परंतु आणखी असे की, अशा अर्जावर विरोधी पक्षाला नोटीस बजावल्याशिवाय कोणताही आदेश रद्द केला जाणार नाही.

(४) उपनियम *(३)* मध्ये काहीही असले तरी, जेथे आयोगाच्या मते माहिती नाकारण्याशी संबंधित एखादा महत्त्वपूर्ण प्रश्न अंतर्भूत आहे, तेथे आयोग उपलब्ध नोंदींच्या आधारे प्रकरण निकालात काढण्याची कार्यवाही करू शकतो.

(५) या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे आयोगाला, द्वितीय अपीलाच्या संदर्भात, अपीलकर्त्याच्या उपस्थितीची पर्वा न करता, अधिनियमाखाली आवश्यक असेल तेथे, अभिलेख मागविण्यापासून किंवा माहितीचे प्रकटीकरण निर्देशित करण्यापासून प्रतिबंध होणार नाही.

२२. पुराव्याचा भार.-

(१) अधिनियमाखाली आयोगासमोरील अपील किंवा तक्रारीत अन्यथा तरतूद केली असल्याशिवाय, पुराव्याचा भार तथ्य प्रतिपादन करणाऱ्या पक्षावर असेल.

(२) कलम १८ अन्वये तक्रारीत किंवा कलम १९ अन्वये अपीलात,-

(क) तक्रारदार किंवा अपीलकर्त्याने माहिती नाकारणे, विलंब होणे, किंवा चुकीची माहिती देणे किंवा तक्रारीत नमूद केलेला अन्य कोणताही आधार सिद्ध करावा आणि प्रस्थापित करावा;

(ख) राज्य जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय प्राधिकरण किंवा, यथाप्रसंग, सार्वजनिक प्राधिकरण यांनी कलम १९ च्या उपकलम *(५)* नुसार त्यांच्या कृत्याचे समर्थन करावे.

